# अंकुश शिंगाडे

# आधार



**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# आधार

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# आधार

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# आधार

लेखक : अंकुश शिंगाडे
फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा, कळमना मार्केट रोड,
नागपूर. महाराष्ट्र
ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

**e**sahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: ८ एप्रिल २०२४

©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# आधार या पुस्तकाविषयी थोडंसं

आधार नावाच्या शिर्षकातंर्गत लिहिलेली ही पुस्तक. बऱ्याच दिवसांपासून या शिर्षकाची पुस्तक लिहायचं ठरवलं होतं. परंतु ना कथानक सापडत होतं. ना लिहिता आलं होतं. तशी यापुर्वी आयुष्य नावाची एक पुस्तक लिहिली आणि ठरवलं की आपण आधार नावाची पुस्तक लिहायची व लवकरच तिही पुर्ण झाली.

आधार नावाची ही पुस्तक. पुस्तकाचं कथानक हे पाच पात्रांना धरुन आहे. गुरु, आरती, सुरेखा, किर्ती व ज्योती. त्यात आणखी एक पात्र आहे. ते म्हणजे सायली. सायली यातील पाहूण्याचं पात्र वठवते. तेही अगदी दमदारपणे. तसं पाहिल्यास या पुस्तकाला लिहायला काही सामान्य अडथडे आलेत. काही भावनाही आल्यात की ज्यातून माहिति मिळत नव्हती. माहिती संप्रेषण करणारे घटक हे कामात व्यस्त होते. काही काल्पनिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यालाही घटकांचा विरोध असायचा. माहिती ही सत्यच हवी. तरीही भविष्याचा वेध घेवून बरेच जीवनपैलू काल्पनीक टाकलेत. त्यामुळंच ही पुस्तक वाचनीय झालेली आहे.

या पुस्तकाची नायिका ज्योती. खरं तर ज्योती हे पात्र म्हणजे यल्गार आहे. ते पात्र दिशा देत असतं तत्वज्ञानाच्या. दुःख तर येणारच. ते आपल्या प्रारब्धानंच येतं. परंतु त्याचा बाऊ करुन आपण त्याला घाबरत रडगाणं गात बसणं, हे भेकडपणाचं लक्षण. हे तत्वज्ञान ज्योती हे पात्र प्रसवतं आणि ती गोष्ट इतरांनी शिकण्यासारखीच आहे. ही पुस्तक एक प्रकारचा बोध देवून जाते.

या पुस्तकात ज्योतीव्यतिरीक्त इतरही काही पात्र आहेत. त्यांचा जीवनप्रवास आहे. परंतु तो मी मांडत नाही वा त्यांचं कथानक यात सांगत नाही. ते आपल्याला पुस्तक रुपानं वाचावं लागेल. शिवाय ज्योतीचं शेवटी काय झालं? गुरुचं शेवटी काय झालं? किर्तीचा जीवनप्रवास कसा राहिला? तद्वतच सुरेखाचे उत्तरदायित्व काय? सायलीनं पाहूणीची

भुमिका कशी व्यक्त केली? इत्यादी प्रश्नही अनाकलनीय आहेत. ते पुस्तक वाचूनच समजेल.

मी यापुर्वी एकोणनव्वद पुस्तकांची निर्मीती केली. ही नव्वदवी पुस्तक आपणा वाचकांच्या सेवेत ठेवत आहे. आपण ही पुस्तक वाचावी व जसं माझ्या इतर पुस्तकांचं स्वागत केलं. तसंच याचंही स्वागत करावं ही विनंती.

मी ज्योती, किर्ती आणि इतर काही यात अभिव्यक्त झालेल्या घटकांचे आभार मानतो की त्यांनी काही माहिती सांगून माझ्या लिहित्या हाताला प्रेरणा दिली नव्हे तर बळच. कधी गंमतीदार प्रसंग लिहितांना काहींच्या भावनाही दुखावल्या असतील. त्याबद्दल क्षमाही मागतो. ही पुस्तक काल्पनीक कमी आणि वास्तविकतेचा खजिना आहे. त्यामुळंच कंटाळवाणेपणा नाही आणि कंटाळा सुरुवातीलाच येणार असेल तर कृपया ही पुस्तक वाचूच नये. मी ई साहित्य प्रतिष्ठानचेही आभार मानतो. कारण त्यांनी जर माझ्या पुस्तका ई साहित्य स्वरुपात प्रकाशीत केल्या नसत्या तर आज माझ्या नव्वद पुस्तका झाल्या नसत्या. शेवटी एवढंच म्हणेल की आपण वाचक या नात्यानं ही पुस्तक वाचावी व वाचून झाल्यावर मला एक फोन अवश्य करावा ही विनंती..

धन्यवाद!.

आपला नम्र.

**अंकुश शिंगाडे, नागपूर , ९३७३३५९४५०**

ही कादंबरी

संकटांशी झुंज देणाऱ्या सर्व भगिनी मातांना

आदरपूर्वक समर्पित

# आधार

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

.

आधार कादंबरी भाग एक

अंकुश शिंगाडे

शाळा शिक्षण मिळण्याचे केंद्र आहे. त्या शाळेतून शिक्षण शिकविलं जातं. त्याचबरोबर संस्कारीत मुल्यही. जे संस्कारीत मुल्य आपल्या आईवडिलांचा आदर करायला शिकवितात. तसाच आदर करायला शिकवतात गुरुंचा आणि त्याचबरोबर आदर, आपल्या परीसरातील लोकांचाही आदर करायला शिकवतात. परंतु आज तसं नाही. आज मात्र आपल्या आईवडिलांचा कोणी आदर करीत नाहीत. मग आपल्या गुरुंचा आदर कसा करतील? त्यानंतर आपल्या परीसरातील लोकांचाही आदर कसा करतील? आज तसा आदर कुणातच उरलेला नाही. कारण आज संस्कारच उरलेला नाही. जसा संस्कार काल होता.

काल लोकं पायी चालायचे. ते पायी चालत असतांना त्यांना तहान लागायची. त्यानंतर ते एखाद्या घरी प्यायला पाणी मागायचे. तसं पाणी मागताच

प्यायला पाणी मिळायचं. त्यात अस्पृश्यांना सोडून. शिवाय काही ठिकाणी विहिरी असायच्या व त्या विहिरीवर एक बादली राहायची.

विहिरीवर बादली राहायची. परंतु त्या विहिरीला हात लावायची परवानगी नसायची. त्यातच अशा वेळेस एखादा व्यक्ती जर तो स्पृश्य असेल तर तो पाणी पाजायचा. शिवाय प्रवासाची साधनं नव्हतीच. त्यामुळं लांब अंतरावरुन प्रवास करतांना लोकं चारपाच दिवसाचं स्वयंपाकाचं साहित्य घेवून निघत. जे सुक्या अवस्थेत राहायचं. परंतु जेव्हा ते एखाद्या ठिकाणी प्रवासाला थांबायचे व त्यांना दम लागायचा. तेव्हा त्यांना चांगलं वाटावं यासाठी लिंबू व मीरच्या सहज लोकांना उपलब्ध होत. त्या लिंबू मीरच्या प्रत्येक दारात अडकविलेल्या असायच्या. लोकं सर्रासपणे त्या दारावर अडकविलेल्या लिंबूमीरच्या कोणालाही, लिंबू मीरच्या घेवू का? असे न विचारता घेत असत. कारण सर्वांना माहीत होतं की त्या लिंबूमीरच्याची प्रवाशी लोकांना मदत व्हावी म्हणूनच बांधलेली असायची.

आज मात्र तसं नाही. आज त्या लिंबूमीरचीत अंधश्रद्धाळूपणा शिरला. आज लोकं लिंबू मीरची तर लावतात आपल्या दारासमोर. परंतु ते कोणाची दृष्ट लागू नये म्हणून. आज जर त्या पुर्वीच्या पद्धतीनं चालून कुणाच्या दारासमोरची लिंबूमीरची घेतली तर बस. भांडण झाल्याशिवाय राहणार नाही. पुर्वी तीच लिंबूमीरची अनोळखी व्यक्तीही काढून घ्यायचा अन् आज तीच लिंबूमीरची ओळखीचा व्यक्तीही काढून घेवू शकत नाही.

महत्वपुर्ण बाब ही की आज काही काही शाळेतूनही अशाच अंधश्रद्धा प्रसवल्या जातात की काय असंच वाटायला लागलं आहे एकीकडे, तर दुसरीकडे

पाश्चात्य विचारसरणी जोर धरीत आहे. एकीकडे काही शाळेत अभ्यासक्रमात असलेली संतवाणी भजनाचं स्वरुप वाटतं. तर दुसरीकडे अभ्यासक्रमातून अंधश्रद्धेचा नाईनाट करणारी प्रकरणं समाविष्ट असतात. ज्यातून गाडगेबाबांनी सांगितलेलं तत्वज्ञान प्रसवलं जातं. आज मदतीची भावना लोप पावलेली आहे आणि संस्काराच्या नावावर वेगळंच काही सांगीतलं जातं की जे मनाला आणि तनालाही कधीच पटत नाही.

महत्वाचं सांगायचं झाल्यास एकीकडे देवाला मानणारं तत्वज्ञान, तेही शालेय अभ्यासक्रमात. संतवाणीच्या स्वरुपात जरी नसलं तरी शाळेतील शिक्षक त्याला धार्मीक रंग देण्याचा प्रयत्न करतात तर दुसरीकडे देवाला न मानणारं तत्वज्ञान, जे मदतीची भावनाच अंतर्मनातून उध्वस्त करुन टाकते. त्यामुळंच की काय, मुलं शिकतात. कोणी डॉक्टर, इंजिनिअर बनतात. कोणी इतर काही. परंतु संस्कार दिसत नाही त्यांच्यात. ती मुलं आपल्याच स्वतःच्या आईवडीलांना विसरतात व त्यांची रवानगी वृद्धापकाळी वृद्धाश्रमात करतात. ते शिक्षकांनाही विसरतात. थोडेसे मोठ्यापणी शिकवणारे शिक्षक लक्षात राहतात. कारण त्यावेळेस समजदारीपणा आलेला असतो. परंतु ते त्या शिक्षकांना विसरतात की ज्यांनी त्यांना समज नसतांना, अगदी बोट धरुन लिहायला, वाचायला शिकवलं. तोच आजचा समाज ज्या आईवडीलांना विसरतो, तोच आजचा समाज ज्या शिक्षकांना विसरतो. तोच समाज खरं तर आपल्या शेजाऱ्यांना कसा विसरणार नाही? तो त्यांनाही विसरतोच. फक्त मतलबीपणासारखा वागतो तो समाज. यावरुन शिक्षणाला जरी बाबासाहेबानं वाघिणीचं दूध जरी म्हटलं तरी आजचं शिक्षण हे वाघिणीचं दूध नाही की जे गुरगुरेल. ते मेंढीचं दूध आहे. कारण आजचं शिक्षणरुपी दूध पिणारी माणसं आपल्याच

पत्नीसमोर मेंढ्यासारखं काम करीत असतात. सारखी खाली मान घालून राहात असतात. ती म्हणेल तशी वागत असतात. खरं शिक्षण ह्या महिलाच घेत आहेत की ज्या महिला आज वाघिणीसारख्याच नाही तर सिंहासारख्या असतात. त्या शिकतात. म्हणूनच त्या सिंहासारख्या वागतात आणि मुलं तिच्यावर फिसलून तिच्या मतानुसार वागत असतात. तिचंच ऐकून तिच्या मनानुसार आपल्याच मायबापाला वृद्धाश्रमात टाकत असतात. येथूनच संस्कारीत मुल्य तुटली असून ती मुल्य समजून घेण्याची गरज आहे.

महत्वाचं म्हणजे कालच्या पती नावाच्या पुरुषांच्या जोखडातून आज स्वतंत्र झालेली स्री, आज पुरुषांना दाबून त्यांना शेळया, मेंढ्यांसारखी वागणूक देत असते. विशेष सांगायचं झाल्यास काल ज्या संस्कारीत मुल्यानुसार पुरुषांचा वरदहस्त वा धाक असल्यानं कालची स्री पुरुषांच्या मायबापाची नाही तर पुरुषांकडील पाहुण्यांचा आदर करायची. तेवढीच सरबराई देखील करायची. आज मात्र तसं नाही. आजची स्री सांस्कृतीक मुल्यानं स्वतंत्र तर झाली. परंतु जुनी सांस्कृतीक मुल्य विसरली व विसरली ती आपल्याच मायबापाचे संस्कार, त्यातच विसरली आपल्या गुरुंनी दिलेले संस्कार, विसरली ती आपल्या परीसरातील लोकांनी दिलेले संस्कार आणि तेवढीच विसरली चांगल्या सुसंस्कारीत मित्रांनी दिलेले संस्कार आणि भलत्याच मित्रांच्या नादात लागून चांगल्या संस्काराची राखरांगोळी करायला लागली. याला जबाबदार कोण? आईवडील की जे लहानपणापासून मोठे करतात, शिकवतात. गुरु की जे सुसंस्कार शिकवतात. आजुबाजूचा समाज की जो कुसंस्कार देत नाही. तसेच मित्र की जे चांगलंच ज्ञानामृत पाजतात. मग असं का होतं? काही मुली एकदम लांडग्यासारख्या का वागतात? त्या उदार मनानं का वागत नसाव्यात? याला

जबाबदार कोणी आईवडील, गुरु, मित्रमंडळ, समाज जबाबदार नाही तर जबाबदार आहोत आपण. आपली बुद्धीमत्ता आणि आपले विचारच तुच्छ असतात आणि त्याच तुच्छ विचारात व मनात मंथरेसारख्या कुत्सीत बुद्धीची माणसं आणखीनच तुच्छ विचारांची भर घालतात. मग रामायण घडतं. राम सीतेसारखे मुलांचे आईवडील वनात जातात. अर्थात वृद्धाश्रमात जातात.

विशेष म्हणजे आजच्या काळातील महिलांनी असा विचार करावा की आपण तसं वागू नये. आपले मायबाप जसे देव, तसेच आपले सासू सासरेही देवच असतात याचं भान त्यांनी ठेवावं. जेणेकरुन त्यांना म्हातारपणी त्रास होणार नाही व त्यांना त्यांच्या अखेरच्या काळात वृद्धाश्रमात जावं लागणार नाही. यात शंका नाही. यात सांगायचं झाल्यास आज मुली स्वतंत्र झाल्या. त्यांना त्यांच्या मनासारखं वागता येतं. परंतु याचा अर्थ असा नाही की त्यांनी सासूसासऱ्याला वृद्धाश्रमात टाकावं आणि आपण आज वाघीण बनलो म्हणून त्यांचं स्वातंत्र्य हिरावून घ्यावं. हे सत्य समजण्याची आज तरी तुर्तास महिलांना गरज आहे. त्यांनी या संस्कारीत गोष्टी समजून घ्याव्यात. अन् त्या गोष्टी समजून घ्यायच्या नसतील तर विवाहच करु नये म्हणजे झालं.

ज्योती...एक शाळेतील मुलगी. तिच्या आयुष्यात आज फारच बदल झाले होते. आज तिला मिळालेला पती सालस स्वभावाचा होता व तो रात्रंदिवस काम करीत होता. तिही घरी शिवणकाम करुन पतीला आर्थिक बाबीत मदतच करीत होती. आज ती पाश्चात्य विचारसरणीची बनली होती व तिला वाटत होतं की जग कवेत घेवू की काय? तिला फिरणे फार आवडायचे व ती आपल्या पतीसोबत फिरायला जायची काश्मीरपर्यंत. त्यातच ती कपडे परिधान करतांना अंगावर कमी

कपडे वापरायची. कधी वाईनही घ्यायची व म्हणायची की वाईन घेणं हे आज सामान्य झालेलं आहे. तिला बाईक चालवता येत असे, व्यतिरिक्त कारही.

ज्याप्रमाणे ज्योतीला कमी कपडे वापरणं आवडत होतं. त्याप्रमाणेच तिला तिची केससज्जा खुली ठेवणं आवडत होतं. मॉडर्न संस्कृती तिच्या नसानसात भरल्यासारखी वाटायची तिचे फोटो पाहून.

आज तिला काहीसा राग आला होता. जेव्हा गुरु तिच्याशी बोलत होता. गुरु तिच्या बालपणाचा मित्र होता. गुरुनं तिला विचारलं होतं,

"ज्योती, तुझं कोणावर प्रेम वैगेरे होतं का गं बालपणात."

तो त्याचा प्रश्न. तसा तो प्रश्न तिला काही आवडला नाही व ती मौन झाली. तिच्या मौनाचं कारण होतं तिनं बालपणात कोणावरही न केलेलं प्रेम. तशी ती पाहायला छान होती आणि त्याच काळात ती एखाद्या राजकन्येसारखी दिसायची. वागायची, बोलायची. तिचं बोलणं, वागणं यावरुन अंदाज येत होता की भविष्यात ही एखादी अभिनेत्रीच बनेल आणि आपल्या मायबापाचं नाव चमकवेल. परंतु तसं काही घडलं नव्हतं. कारण तसं घडायला ते एक तात्कालिक कारण घडलं की तिला अभिनेत्रीपणाच्या लालसेपासून दूर जावं लागलं.

ज्योती जेव्हा बारावीला गेली होती. तेव्हा ते बालपणच होते. दुधाचे ओठ सुकले नव्हते. व्यवहारीक गोष्टी कळत नव्हत्या. त्याच काळात तिचे वडील गेले. मग काय छत्र हरपलं आणि आभाळ कोसळल्यागत तिची अवस्था झाली होती.

********** ********

आई... आईवडिलांची लाडाची मुलगी ती. ती सर्वात लहान होती. तशी ती जास्त आईची लाडाची होती वडीलांपेक्षा. आई तिची प्रेरणा होती तर वडील तिचे आधारस्तंभ. मग काय साऱ्या समस्याच समस्या.

तो वसंत फुलला होता. नव्या दमाने त्याचं आगमण झालं होतं. शिशिर नुकताच संपला होता. झाडाचे पानं गळले होते आणि आता झाडावर नवी पालवी आली होती. त्यातच ज्योती एका झाडाखाली बसली होती. आज ती तब्बल पन्नास वर्षाची झाली होती. तिनं भरजरी कपडे वापरले नव्हते तर तिच्या अंगावर कमी रुंदीचे कपडे होते. तशी एक वाऱ्याची झुळूक आली. ती तिला स्पर्शून गेली. तसं तिला आठवलं तिचं तरुणपण.

आज ज्योती तरुण झाली होती. तशी ती फार मोठी झाली नव्हती. वर्ग आठवीत गेली असेल बहुतेक. अचानक काय झालं ते तिलाही कळलं नव्हतं. दैवानं नव्हे तर नशिबानं घात केला होता. कोणत्यातरी कारणानं तिच्या आईच्या डोळयानं दिसणं कमी झालं होतं. मग काय वडीलांसह संपुर्ण परीवारावर फार मोठं संकट कोसळलं.

ज्योतीला एक बहिण होती. तिचं नाव पुजा होतं. पुजा एक आंतरराष्ट्रीय खेळाडू होती. ती खेळ खेळण्यासाठी बाहेर बाहेरच असायची. मग काय घरची कामं आईच्या डोळयाला दिसत नसल्यानं ज्योतीवरच आली. आता ज्योती घरची सर्व कामं, त्यातच स्वयंपाक, भांडी घासणं, अंघोळ करणं व झाडलोट करत असे. शिवाय शाळाही. तेव्हा ती कामं करतांना तिला वैताग येत असे. कारण घरी ती एकटीच

नव्हती तर तिच्यासोबत तिचे तीन भाऊ, तिचे वडील आणि तिची आईही असायची. त्या सर्वच्या सर्व सहा लोकांची कामं करतांना अति त्रासच व्हायचा. तसं पाहिल्यास तिला घरकामात तिचे तीनही भाऊ मदत करीत असत. परंतु ती मदत तुटपुंजी असायची. शिवाय तिला आपल्या आंधळ्या आईलाही औषधपाणीही द्यावं लागायचं. तेही एक काम होतंच.

ज्योती साधारण हुशार होती. तशी ती अभ्यासात साधारणच होती. ती सुंदर होती. तशी ती आधीपासूनच पाश्चात्य विचारसरणीची. तिला घरी अतोनात दुःख होतं. परंतु ती जेव्हा शाळेत यायची. त्या शाळेत तिच्या चेहऱ्यावर कोणतंच असं दुःख जाणवायचं नाही. असं वाटायचं की ती अतिशय आनंदी आहे व जगात तिच्यासारखा कोणीच आनंदी नाही.

भाऊ तिच्यापेक्षा मोठे असले तरी ते वयानं लहानच होते. कधी भाऊ घरी राहायचे आईची सेवा करायला. तसंच औषधपाणी द्यायला. ते तीनही भाऊ तिच्यापेक्षा मोठे होते. त्यांचही शिक्षण होतंच. परंतु ते घरी राहात होते आणि ज्योतीला शाळेत पाठवत होते. तिच्या शिक्षणाला खंड नको असा त्यांचा विचार होता. त्यामुळंच ज्योती शाळेत तरी गैरहजर नसायची. जरी तिच्या आईच्या डोळ्याला दिसत नसलं तरी.

आईच्या डोळ्याला दिसणं बंद झालं होतं. तिच्या औषधाला पै पै पैसा लागत होता. एक वडीलच होते की जे कमावते होते. आता घर चालवणं कठीण झालं होतं अगदी. कारण वडीलांचा पैसा पुरत नव्हता औषधपाण्यामुळं आणि परीवारही मोठाच होता. अशातच तिच्या बहिणीचा म्हणजे पुजाचा ॲथलेक्टीक्स मध्ये

राज्यातून दुसरा क्रमांक आला व तिला आंतरराष्ट्रीय खेळ खेळण्यासाठी फ्रान्सला पाठवायचं ठरवलं.

पुजाची फान्सला जाण्याची फार इच्छा होती आणि तिला विश्वासही तेवढाच होता की ती फ्रान्सला जावून तिथंही नंबर मारुन येईल.

पुजा ज्योतीची बहिण. आई आंधळी झालेली. तिच्या औषधाला पैसा लागत असलेला. घरी खाणारी तोंडही जास्तच. शिवाय त्यांच्याही कपड्यालत्त्याला पैसा लागतच होता. त्यामुळंच तिच्याजवळही पैसा नव्हता. शिवाय महत्वाकांक्षा अपार होती. गुणांची काही कमी नव्हती व त्याच गुणांच्या भरवशावर पुजा फ्रान्समध्ये जावून आली. तिनं स्पर्धेत भागही घेतला. परंतु प्रारब्धच ते. ती त्या स्पर्धेत टिकून शकली नाही व ती बाद ठरली.

पुजा फ्रान्समधून परत आली होती. तिच्यावर तशी जबाबदारीच होती. ती मोठी होती वयानं. ती सर्वात मोठी होती. ती पाहात होती की आई आंधळी झालेली आहे. शिवाय भाऊ सर्व लहान. त्यातच ती सर्व परिस्थिती पाहून वडीलांचंही मानसिक संतुलन बिघडलेलं. त्यांची बुद्धीच काम करीत नव्हती व तेच घडलं.

डोळयातून पाणी येईल अशीच नियती वागत होती. मग काय वडीलांनी नियतीसमोर हार मानली व आपलंच जीवन संपवून टाकलं. सर्वांना आश्चर्याचा धक्का देत.

पाच भावंडं. त्यात सर्वात मोठी पुजा आणि लहान असलेली ज्योती. मग काय, नियतीसोबत युद्ध सुरु झालं अस्मितेचं. शाळा, खेळ सांभाळून पुजा वागत होती. नशीब परीक्षा घेत होतं. पुजाला त्याची जाणीव होती. खेळण्याचा छंद संपुष्टात

आला होता. संपूर्ण आशा संपल्या होत्या. जीवनात वसंत. परंतु जगण्यात काहीच उरलं नाही असं पुजाला वाटत होतं. शिशीरच वाटत होता आयुष्य जगतांना. परंतु तिला ना धड जगता येत होतं, ना तिला धड मरताही येत नव्हतं.

वडील मृत झाले होते. आईही आंधळी होती. संसाराचा गाडा चालवायचा होता. काय करावं सुचत नव्हतं. आता शिक्षण सोडून कोणतंतरी काम शोधणं बाकी होतं. त्यामुळं पुजा प्रयत्न करीत होती काम शोधण्याचा. अशातच तिला धावपटूच्या दर्जावर दहाव्या वर्गात असतांनाच नोकरी लागली व सर्वांना हायसं वाटलं. आता थोडासा पैशाचा प्रश्न मिटला होता. परंतु घरच्या कामाचं काय? घरच्या कामाचा ताण ज्योतीवर आला होता. कारण पुजाला दिवसभर नोकरी करावी लागायची. त्यातच ती शिकतही होती उच्च शिक्षण. तसं ते शिकण्याचं वयच होतं.

पुजाला सरकारी नोकरी लागली होती. एक प्रकारचा आधार निर्माण झाला होता. नियतीनं जरी डोळयातून पाणी आणलं असलं तरी नियतीवर पुजानं विजय मिळवला होता व स्वतः जबाबदारी स्विकारुन ती ते शिवधनुष्य पेलवत होती.

पुजानं आर्थिक भार उचलला होता. तिला नोकरी करावी लागायची पैशासाठी. कारण पैसा ही त्यांचं पोट भरण्यासाठी अतिशय महत्वाची गोष्ट होती. ती घरच्या कामात जास्त हातभार लावायची नाही. त्यामुळंच घरच्या कामाची सर्व जबाबदारी ज्योतीवर आली.

ते प्रेम करण्याचं वय. पुजा तेवढी दिसायला सुंदर नव्हती. त्यातच तिचं संपूर्ण लक्ष तिच्या खेळात होतं. त्यामुळंच ती कोणाला भाव देत नव्हती. परंतु ज्योती पाहायला सुंदरच होती. ती कुरळया केसाची असून त्या केसाची केससज्जा ही

रोमांचकारी होती. अर्थात बापकट होती ती. तिनं लहानपणी विचार केला होता की आपण तरुण होताच चांगली मौजमजा करु. परंतु प्रारब्धच ते. कसली मौजमजा करणार? शेवटी तो मौजमजेचा विचार त्यागून तिला आपलं पुर्ण लक्ष घरच्या कामात गुंतवावं लागलं आणि बस. ते लक्ष गुंतवीत असतांना तिचं प्रेमाकडे लक्ष गेलं नाही. ती विचलीत झाली व ठरवलं की आपण प्रेम करावं तेही विवाहानंतरच.

पुजा...ज्योतीची मोठी बहिण. ती अंगावर जबाबदारी झेलून घराचा सांभाळ करीत होती. त्यातच आपला छंदही जोपासत होती. तिच्या छंदाला काही लोकं प्रतिसाद देत होते. त्यात काही समवयस्कही होते तर काही वयोवृद्ध तर काही लहान मुलंही होती.

पुजाच्याही अवतीभवती काही समवयस्क मित्रमंडळ फिरत होतं. जसे फुलाभोवती भुंगे फिरतात तसे. परंतु पुजा त्या भुंग्यांना दाद देत नव्हती. कारण तिच्यावर जबाबदारी होती. ते तीन भाऊ आणि तिची लहान बहिण ज्योती. तशी ती तेवढी पाहायला सुंदरही नव्हतीच. परंतु ज्योती सुंदर असल्यानं पुजाचे समवयस्क मित्र पुजाला सोडून ज्योतीच्याच अवतीभवती फिरायला लागले होते. त्यांना कदाचीत असं वाटत असेल की पुजाचं जावू द्या. ती आपला छंद जोपासते. तिला काबूत करणं कठीण. कारण ती छंदावर प्रेम करते. त्यामुळं आपल्यावर करणार नाही. तसं पाहिल्यास पुजाचं वागणंही साधंच होतं. त्यामुळंच ते तरुण समवयस्क भुंगे ज्योतीच्या मागं लागले होते. जणू त्यांना वाटत असेल की पुजा नाही तर काय झालं, ज्योती तरी आपल्याला भाव देईल. परंतु तिथंही गणित चुकत होतं. ज्योती जरी सुंदर वाटत असली आणि ती जरी पाश्चात्य पद्धतीनं जीवनशैली जगत असली तरी तिलाही कळत होती घरची परिस्थिती. ती कशी काय तिच्या मागं लागणाऱ्या भुंग्याना भाव

देणार. तिला त्या गोष्टीचा रागच यायचा आणि राग यायचा प्रेम या गोष्टीचा. शिवाय तिला प्रारब्धावरही रागच यायचा. वाटायचं की काय हे प्रारब्ध. हे प्रारब्ध माझ्याच वाट्याला यायचं होतं काय?

पुजाचं काम करणं. घरची जबाबदारी असल्यानं एका पुरुषांसारखी नोकरी करणं व आईसह सर्व भावंडांना सांभाळणं. हे त्यावेळेस वाखाणण्याजोगच होतं. तद्वतच ज्योतीचं घरदार सांभाळणं. पैशाचा व्यवहार करणं. त्यातच शिक्षण करणं. हे एक कसबच होतं. कारण पुजा पुरुषासारखी कमवीत जरी असली तरी ती व्यवहार करण्यासाठी पैसे ज्योतीजवळच द्यायची. त्यामुळंच ज्योतीची सगळी त्रेधातिरपीट उडायची. मग काय? आईचं औषध व व्यवहारीक खर्च करतांना जी ज्योतीची तारांबळ उडत होती. ती वाखाणण्याजोगीच होती. कधीकधी तर तिला रडूच कोसळायचं.

ती तिची रडण्याची गोष्ट. ती समजून घ्यायची तिची बालमैत्रीण. जी तिच्यासोबत असायची तिच्या खांद्याला खांदा लावून. तिचं नाव होतं सुरेखा.

********** ***************

सुरेखा ही तिची पाचवीपासून तर दहावीपर्यंतची मैत्रीण. त्या मैत्रीणीला ज्योतीच्या घरची परिस्थिती थोडीफार माहीत होती. जेव्हापर्यंत ती सोबत होती. तिच्या आईचं आंधळेपण. त्यावर तिनं काळजी घेणं. हे सारं काही माहीत होतं तिला. ती सांगत नव्हती घरची परिस्थिती. तरीही सुरेखा तिची सतत चौकशी करायची. तसे

तिचे वडील नशेच्या आहारी असल्यानं तिलाही आर्थिक हलाखीच्या परिस्थितीला तोंड द्यावं लागलं. तिच्या देखील घरात सुखशांती नव्हतीच. तिचेही वडील तसं पाहिल्यास मदिराप्राशन करायचे. त्यामुळंच परिस्थितीला तोंड द्यायचं धाडस तिच्यात निर्माण झालं होतं.

ज्योती दहावी झाली. तेव्हा तिची बहिण पुजा सरकारी नोकरीला लागली होती. त्यातच तिनं आपल्या बहिणीला म्हटलं,

"ताई, मी विज्ञान शाखेत प्रवेश घेवू इच्छिते. तुझं काय म्हणणं आहे?"

ज्योती आपल्या बहिणीला तसं बोलताच बेताची परिस्थिती असूनही पुजानं तिला विज्ञान शाखेत प्रवेश घेण्याची परवानगी दिली व तिनं दुरच्याच महिला महाविद्यालयात प्रवेश घेतला. मात्र सुरेखाच्या वडीलामुळं तिची परिस्थिती एकदमच नाजूक असल्यानं तिनं एका साध्या महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिनं त्यावेळेस कला शाखेत प्रवेश घेतला होता.

ज्योतीचं आता महाविद्यालय वेगळं होतं. तसं सुरेखाचंही महाविद्यालय वेगळच होतं. दोघींच्या प्रवेश शाखाही वेगळयाच होत्या. त्यातच आता त्यांना नव्या महाविद्यालयीन मित्र मैत्रीणी मिळाल्या होत्या. त्यात त्या अगदी नित्यनेमानं रमत असत. आता दहावीपर्यंत असलेल्या मित्र मैत्रीणीची आठवण येत नसे. ज्योतीला तर मित्र वा मैत्रीणी ठेवणं आवडत नव्हतं. तिला वाटायचं की जर मी मैत्रीण ठेवलीच आणि तिला घरी आणलं तर तिला आपल्या घरची परिस्थिती माहीत होईल. मग मित्रत्व तुटेल. हीच भीती सतावत होती ज्योतीला आणि आपल्या घरी जर आपण मैत्रीण आणली तर आपल्या वडीलांची नशा आपल्या मैत्रीणीला दिसेल या भीतीने

सुरेखाही मैत्रीपासून दूर जात होती. सुरेखा तसेच ज्योती ह्या जरी दहावीपर्यंत चांगल्या जीवलग मैत्रीणी असल्या तरी आता ना सुरेखाची भेट होत होती ज्योतीशी. ना ज्योतीची भेट होत होती सुरेखाशी. अशातच सुरेखा शिकत असतांना तिचा विवाह करायचं ठरवलं तिच्या घरच्या लोकांनी. मग सुरेखाला मनोमन आनंद झाला. विचार होता की परमेश्वरा. मला फक्त निर्व्यसनी आणि सांभाळणारा पती मिळू दे आणि परमेशानं तिची गोष्ट निश्चितच ऐकली व तिला निर्व्यसनी पती मिळाला. तेवढाच सांभाळणाराही.

सुरेखाचा जेव्हा विवाह झाला. तेव्हा तिला तिच्याच शहरात देण्यात आलं होतं. ती भरल्या कुटूंबातच पडली होती. आता तिच्या शिकण्यावर प्रश्नचिन्हंच उभं झालं होतं. वाटत होतं की मी पतीच्या घरी उच्च शिक्षण घेईल. परंतु ते तिला करता आलं नाही. लवकरच नोकरी निमित्त्याने सुरेखाच्या पतीने तिला दुसऱ्याच शहरात नेले. तिथं ती एकटीच राहिली.

नवंनवं शहर होतं ते. तिथं करमत नव्हतं तिला. वाटत होतं की आपण आपल्याच शहरात खुश होतो. आपला बाप जरी मदिराप्राशन करीत असला तरी आपला बाप का बाप होता की ज्यानं लहानपणापासूनच आपल्याला त्याच शहरात वाढवलं. दूर जावू दिलं नाही आणि आता आपला पती...आपल्या पतीनं तर आपल्याला न विचारता इथं आणलेलं. ना इथं मैत्रीची माणसं. ना इथं मायाळू माणसं. त्यातच तिचा पती जेव्हा कामावर जायचा. तेव्हा तिला करमत नव्हतं. ती एक खंतच होती. असाच तो एक दिवस उजळला की त्या दिवशी ती भाजीपाला घ्यायला बाजारात गेली. त्यातच तिची भेट एका म्हातारीशी झाली.

ती म्हातारी. त्या शहरात ती भाजीपाला विकायची. सुरेखानं भाजी घेतली आणि भाजीपाल्याचे पैसे त्या आजीबाईला देवू केले. तोच ती आजीबाई म्हणाली,

"बेटा या शहरात नवी आली हाय का?"

"होय. का बरं?"

"सहज इचारलं बेटा. येत जा अशीच माह्याचजोवर भाजीपाला घ्याले."

सुरेखाला म्हातारी माणसं आवडायची. त्यातच त्या म्हातारीचं ते कनवाळू बोलणं. तेही तिला पसंत पडलं होतं. तशी ती तिच्याकडं आता दररोज भाजीपाला घेण्यानिमीत्यानं जायला लागली. तसं त्या म्हातारीनं एक दिवस म्हटलं,

"बेटा, मलेबी एक पोरगी होती. ते मरण पावली. नवरा बी गेला. आतं मी एकटी हाय. मन उदास वाटत होतं. म्हून हा धंदा टाकलाय. करमत नव्हतं नं घरी."

म्हातारीनं म्हटलेले ते शब्द. ते शब्द कानावर पडताच सुरेखा म्हणाली,

"आजी, मलाही करमत नाही. मी काय करु?"

आजीनं सुरेखाचं बोलणं ऐकलं व म्हटलं,

"तू...तू या शयरात नवकरी कर. अगं काम अंगाशी असलं तं गमतं सगळं."

ती म्हातारी...ती म्हातारी बोलून गेली खरी. परंतु ते शब्द सुरेखाला बरंच काही शिकवून गेले. करमत नाही म्हणून तिनं लागलीच आपल्या पतीला सायंकाळी घरी आल्यावर म्हटलं,

"मला घरी करमत नाही. मला नोकरी करायचीय. जरा काम लावून द्या."

सुरेखाचं ते बोलणं. त्यावर विचार करुन लागलीच तिच्या पतीनं तिला काम लावून दिलं. आता सुरेखाही नोकरी करायला लागली होती.

सुरेखानं अशीच नोकरी केली काही दिवस. ती तिच्या पतीच्या खांद्याला खांदा लावून. अशातच ज्योतीचा विवाह जुळला. ती तिची जीवलग मैत्रीण होती. तिच्या विवाहाची पत्रीकाही सुरेखाला होती. परंतु ती तिकडेच अडकल्यानं तिला तिच्या विवाहाला येता आलं नाही. ती खुश होती आपल्या परीवारात. लवकरच तिला पुत्ररत्न प्राप्त झाले व तिला संपुर्ण मित्र मंडळींचा विसर पडला. आता आठवत नव्हते ते कोणीच दहावीचे मित्र. फक्त आठवत होती सर्व सासरची मंडळी. त्यातच काही माहेरची मंडळी. विचारही केला नव्हता की गतकाळातील तिची मैत्रीण ज्योती तिला भेटेल. विचारही केला नव्हता की गतकाळातील ते सर्व दहावीचे मित्र मैत्रीणी भेटतील. जे मित्रमंडळ दहावीनंतर भटकलं होतं. गतकाळाच्या आठवणीत हरवून गेलं होतं.

सुरेखाला नोकरी होती. सुरेखाला नोकरी होती, तेव्हापर्यंत काही नाही. तिला कोणताच फरक पडला नव्हता. परंतु जसं तिच्या पतीचं स्थानांतरण झालं. ती राहात असलेल्या शहरात. तेव्हा मात्र निश्चितच फरक पडला होता. आता गतकाळ आठवत होता आणि आठवत होत्या त्या गतकाळातील आठवणी. तसाच आठवत होता तिला भूतकाळ. त्या भूतकाळात तिला आठवत होती तिची बालमैत्रीण ज्योती. ज्योती कशी असेल? का असेल? सारेच प्रश्न तिच्यासमोर आ वासून उभे होते. त्यातच तिला आठवत होती तीच दहावीपर्यंतची दुसरी मैत्रीण जया आणि ते सर्व मित्रमंडळ.

तिला जसा गतकाळ आठवायला लागला. तसं वाटायला लागलं की आपण त्या बालमैत्रीणीची भेट घ्यावी. त्यामुळंच ती अतिशय आशेनं यायची त्यांची भेट घ्यायला. परंतु ती त्यांची भेट तरी कशी घेणार? सोबत पती असायचे आणि ती मुलं. त्यांनाच सांभाळता सांभाळता दिवस जात होते. शिवाय तो पती कितीही चांगला असला तरी त्यांच्या मर्जीच्या बाहेर जाता येत नव्हतं सुरेखाला. मग ती कशी जाणार. त्यांच्या मर्जीच्या बाहेर. शेवटी तिला आपल्या गतकाळातील आठवणी पुसाव्या लागल्या व आपल्या परीवारातच हरवून जावं लागलं.

सुरेखाची मुलंबाळं लहान होती. वेळ कसलाही मिळत नव्हता. काढणार तरी कसा? अशातच एक दिवस वेळात वेळ काढून ती जयाच्या आईकडे गेली. परंतु माहीत झालं की जया त्या शहरात नाही. ती कुणातरी सोबत पळून गेली आहे. तिचा थांगपत्ताही घरच्यांना नाही. ती कुठं राहते. कुठं नाही. जीवंत आहे की नाही हेही माहीत नाही असं तिच्या आईनं सांगीतलं होतं. त्यानंतर तिचा तिनं फोन क्रमांक मागितला. परंतु तोही मिळाला नाही. शेवटी तिचा भ्रमनिराश झाला. त्यानंतर ती ज्योतीच्याही घरी गेली व कळलं की ज्योतीचाही विवाह झालेला असून ती त्या शहरात राहात नाही व ती नोकरी करीत असते. मग काय, ते माहीत होताच तिनं त्यांचा नाद सोडला व ती सुखकारक जीवन जगू लागली होती.

काही दिवस असेच निघून गेले होते. सुरेखानं नोकरी सोडली होती. ती कायम स्थिरावली होती शहराच्या भुमीत. ज्या भुमीत तिचं बालपण गेलं होतं. तसाच तिचा जन्मही झाला होता. संकटं येत होती. परंतु ती तेवढी मोठी नव्हती. तिच्या बालपणात जी संकटं होती. तिचा आता लवलेशही नव्हताच. शिवाय ती खुश होती. त्याचं कारण होतं तिचा पती. ती त्रस्त होती, आपल्या विवाहापर्यंत बालपणापासून. कधी

पेन्सिल मिळायची तिला तर कधी पेन. कधी स्कर्ट तर कधी फ्रॉक. कारण वडीलाला सरकारी नोकरी असूनही त्यांच्या मदिराप्राशनच्या नादात सारा पैसा जात होता आणि तिचं संपूर्ण आयुष्यही जात होतं. परंतु आता पतीचा आधार होता. पती हा मदिराप्राशन करणारा नसल्यानं.

सुरेखाला आठवत होता तिच्या भविष्याचा काळ. ज्या काळात तिला रंगारंग खायला मिळत नव्हतं. ज्या काळात तिला शिकता आलं नव्हतं. ज्या काळात तिच्या आईला कामावर जावं असं वाटत होतं. परंतु इच्छा असूनही तिची आई कामावर जावं शकत नव्हती. कारण ती एका सरकारी कर्मचाऱ्याची पत्नी होती नव्हे तर समजायची. त्यामुळंच तिला बाहेरची कामं करायला लाज वाटायची. तसं त्या काळात पत्नीनं बाहेर कामाला निघणं म्हणजे वाईट प्रथाच समजली जायची. त्यामुळंच सुरेखाच्या आईनं सगळं सहन केलं. परंतु ती कामावर गेली नाही.

सुरेखा कामावर जात नव्हती. तिचा पती दररोज नित्यनेमाने कामावर जायचा. ती मात्र घरीच राहायची. सर्व मुलं शिक्षणाची झाली होती. ती शाळेत जात होती. आता पुन्हा पुर्वीसारखंच कंटाळवाणं वाटायला लागलं होतं. त्यात तिला घरची आठवण यायची. तेव्हा ती गाडीनं घरी जायची. परंतु विरंगुळा तरी ती कितीसा करणार! तिला कंटाळवाणं जीवन जगावं लागत होतं. अशातच तिला आठवत होता कधीकधी तिचा भूतकाळ. त्या भूतकाळात आठवत होतं ते महाविद्यालयातील जीवन. परंतु दहावीचा काळ तिच्या आयुष्यातून कोरडा पाषाणागत झाला होता. ते ठसे पुसले गेले होते कोरड्या पाषाणागत. त्या आयुष्याच्या कोरड्या पाषाणावर कोणत्याही प्रकारच्या आठवणीच्या हिरवळीच्या छटा नव्हत्याच. त्या आठवणी कोरड्याच्या कोरड्याच झाल्या होत्या.

आज सुरेखा एकटीच होती घरी. तशी ती दररोजच घरी एकटीच असायची. परंतु दररोज तिला गतकाळ आठवायचा नाही. कधी गतकाळ आठवलाच तर आठवायचं ते महाविद्यालयीन जीवन. ज्या जीवनात तिचा विवाह शिकत असतांनाच तिच्या मायबापानं अकालीच लावून दिला होता व तिच्या शिकण्यावर बंधन आणलं होतं. परंतु तसं जरी बंधन आलं असलं तरी तिनं आपल्या पतीला म्हटलं की मला शिकायचंय. मग बस तिच्या पतीनं तो चांगला असल्यानं तिला तथास्तू म्हटलं व ज्योतीरावाच्या सावित्रीबाई सारखं तिच्याही शिक्षणाची दारं उघडली.

सुरेखा जास्त शिकली होती. परंतु ती काही नोकरी करण्याच्या फंदात पडली नाही. ती घरीच होती. अशातच तो एक दिवस उजळला व ती एकटीच घरी होती. सर्व मुलं शाळेत गेली होती. ती आता मोठी झाली होती. त्यांना आता न्यायला आणायला जावं लागत नव्हतं. ती स्वतःच येत जात होती. तसा तिला आठवत होता तो बालपणातील काळ. ते दहावीचं मित्र मंडळ. ज्या मित्रमंडळात काही अभागी मुलंही होते.

गुरु व चारु...त्या बालपणीच्या मित्रमंडळात गुरु नावाचे दोन मुलं होते. गुरु हुशार होता अभ्यासात. तर चारु तेवढा नव्हता.

गुरु आणि चारु आठवत होता सुरेखाला. त्यांचा व्यवहार आठवत होता तिला. त्याचबरोबर आठवत होतं ते सारं मित्रमंडळ आणि ते गुरु आणि चारुचं असलेलं एकतर्फी प्रेम. बिचारे वेडे झाले होते की काय? ते दोघंही कुणावरही नजर टाकत असावेत असंच वाटत होतं तिला.

सातवीपर्यंतचा काळ. सातवीपर्यंत गुरु तिच्या वर्गात होता. त्यावेळेस ती ज्योतीच्या घरी जायची. तिथं सर्व मित्रमंडळ गोळा होत होतं. तिथं खेळत होतं मित्रमंडळ. ज्यात गुरुही असायचा. परंतु तेव्हा संदर्भ वेगळेच होते. प्रेम, माया या गोष्टी आठवायच्या नाहीत तिला. त्यावेळेस चारु नव्हताच. परंतु जशी ती आठवीत गेली. त्यावेळेस चारु नावाचा एक मुलगा शाळेत प्रवेशला. तो दिसायला देखणा होता. शिवाय पैशानंही चांगला. त्याचे वडीलही सरकारी नोकरीच करायचे. शिवाय ते पीत नसल्यानं त्यांच्याकडे पैसे भरपूरच असायचे. मात्र गुरु हा एका शेतकऱ्यांचा मुलगा होता. त्याचेकडे तेवढे पैसे नसायचे.

गुरु आठवीत गेला होता. तो सातवीपर्यंत मुलींशी बोलत होता. परंतु जसा तो आठवीत गेला. तसे सारे संदर्भ बदलले. गुरुला आता प्रेम, माया या सर्व गोष्टी कळायला लागल्या होत्या. शिवाय बालपणातील प्रेम आणि तरुणपणातील प्रेम यात बरंच अंतर होतं.

ज्योती व सुरेखा या जीवलग मैत्रीणी. त्यांच्यासोबत सातवीपर्यंत गुरु बोलत होता. परंतु जसा गुरु आठवीत आला. तेव्हा तो थोडासा तरुण झाला होता व तरुणपणातील प्रेम आणि माया त्याला कळायला लागल्या होत्या. तसं त्याला आता त्याच्या वडीलांच्या तोंडचे वाक्य आठवायला लागले होते की मी तुला शहरातील शाळेत टाकतो. परंतु त्या वातावरणात आम्ही सोबत नाही. चांगलं राहायचं. वाकडं पाऊल टाकायचं नाही आणि वडील भाटव्यानं म्हटलं होतं की मुलींवर प्रेम करायचं नाही. मुलींवर प्रेम केल्यानं जीवन बरबाद होतं. पहिलं आपलं करीयर पाहायचं. मगच प्रेम करायचं. जर तुला नोकरी लागली ना. तर शेकडो मुली तुझ्या मागं लागतील. परंतु तू का जर वाकडं पाऊल टाकलं तं याद राख. मी तुझी पावलंच तोडून

तुझ्या हातात देईल आणि जेथून तुला शिकायला शहरात आणलं. तिथंच पाठवून देईल.

ते संस्कार. ते वडीलांचं म्हणणं. त्यातच वडील भाटव्याचंही म्हणणं. ते आता तो तरुण झाल्यानं त्याला आठवत होतं. त्यामुळंच त्यानं आठवीत आल्यावर विचार केला होता की कालपर्यंत ठीक होतं मुलींशी बोलणं आणि त्यांचे डबे खाणं. आता आपण तरुण होत आहोत. आता काही डबे खाणं बरोबर नाही. त्यातच मुलींचे डबे खाणंही. त्यानं आठवीत येताच मुलींशी बोलणं बंद केलं होतं व तो मुलींशी बोलत नव्हता. मात्र याउलट चारुचं होतं. तो मुलींशी बोलायचा. त्यांना चॉकलेट वा खाऊ चारायचा. त्यावरच काही मुली भाळल्या होत्या. प्रेमाचे संदर्भ म्हणून नाही तर खाऊ खाण्यासाठी. ज्यात सुरेखा आणि ज्योतीचाही त्यात समावेश होता. परंतु त्या गोष्टी काही चारुला कळत नव्हत्या.

ज्योती आणि सुरेखाचा स्वभाव प्रेमळच नाही तर फ्री होता. त्या कुणाशीही मनात आढेवेढे न ठेवता बोलत असत. त्यामुळंच त्यांच्याकडं पाहून वाटायचं की त्यांचं कुणावर प्रेम नक्कीच असावं. परंतु तसं काही नव्हतं.

गुरु आज बोलत नव्हता ज्योती आणि सुरेखाशी. कारण त्याला प्रेम व माया तसेच बालपणातील प्रेम आणि तरुणपणातील प्रेम याचा अर्थ कळला होता म्हणून. तेच हेरलं त्या दोन्ही मैत्रीणींनी. त्यांना गुरुचा स्वभाव माहीत होता. गुरुच्या घरची परिस्थितीही त्यांना माहीत होती. त्याची परिस्थिती काहीशी त्यांच्याच घरच्या परिस्थितीशी मिळती जुळतीच होती. शिवाय गुरुचा स्वभाव त्यांना माहीत असल्यानं गुरुवर त्या प्रेम करीत नसल्या तरी गुरु आवडत होता त्यांना. कारण त्यांनी पाहिलं

होतं की सातवीपर्यंत त्यांनी ज्याही गोष्टी शेअर केल्या होत्या, त्याच्यासोबत. त्या गोष्टीवर गुरुनं त्यांना समजावून सांगून चांगलेच सल्ले दिले होते. समजावून सांगीतल्या होत्या त्या गोष्टी. विवाहापुर्वीचं प्रेम हे सगळं थोतांड असतं हे त्याच काळात गुरुनं सांगीतलं होतं त्यांना त्या इवल्याशा वयात आणि आता तो गुरुमंत्र देवून तो स्वतःच इयत्ता आठवीत जाताच दूर गेला होता. अशातच तो त्यांच्याशी बोलत नसल्यानं एक दिवस तो नववीत असतांना सुरेखा आणि ज्योती त्याचेजवळ आल्या. त्यातील सुरेखा म्हणाली,

"गुरु, तू जसा सातवीपर्यंत आमच्याशी बोलत होता. तसा आता का बोलत नाहीस?"

ते सुरेखाचे शब्द. ते त्याच्या हृदयाला टोचून गेलेत. तसा तो म्हणाला,

"अं, सहजच."

"सहज म्हणजे?"

"मला आता बोलावंसं वाटत नाही मुलींशी. आता आपण थोडे मोठे झालोत."

"मोठे वैगेरे काही नाही. तू बोलत जा आमच्याशी."

सुरेखा जशी बोलली. तशी ज्योतीही तशीच त्याचेशी बोलून गेली. तसं पाहिल्यास चारु हा आठवीत शाळेत आला असला तरी त्यानं चांगलाच जम बसवला होता. तो सर्वांना खाऊ चारत असल्यानं तो सर्वांचा लाडका बनला होता. त्याचेशी सर्व मुली बोलत होत्या. परंतु गुरु आता कुणाशी बोलत नसल्यानं त्याच्याशी आता कोणीच मुली बोलत नव्हत्या. शिवाय गुरुच्या न बोलण्याशी एक

तात्कालिक कारणही घडलं होतं. ते म्हणजे मुलांचं त्याला समजावणं. तो सातवीत असतांना त्याचे विचार मुलींना पटत होते. म्हणूनच मुली बोलत होत्या त्याचेशी हे पाहून काही मुलं त्याची वाढती बोलाचाली पाहून म्हणायचे की एवढा मुलींशी बोलू नकोस. एवढं बोलणं बरोबर नाही. ते तुझ्यासारख्याला शोभत नाही.

ते त्याला काही मुलांचं सांगणं. ते प्रतिष्ठेला शोभत नाही म्हणणं. हे त्याकाळात काही समजत नव्हतं गुरुला. ते का तसे बोलत असावेत. तेही कळलं नाही. त्यातच तो तसं न बोलण्यानं त्यालाच फायदा झाला. तो अभ्यास करु लागला. प्रेमाच्या चक्करमध्ये पडलाच नाही व तो पुढील काळात अर्थपुर्ण जीवनाचा साक्षीदार ठरला होता.

********** ***************

गुरु आणि चारु हे दोन मित्र. ते सुरेखा आणि ज्योतीच्या शाळेत शिकत होते. शिवाय ते त्या शाळेत शिकत असतांना गुरु बोलत नव्हता मुलींशी. खास करुन सुरेखा व ज्योतीशी. ज्योती आणि सुरेखाची परिस्थिती दयनीय. तशी गुरुचीही. मग गुरु सातवीपर्यंत जसा बोलत होता आपल्याशी तसाच आताही बोलायला हवा. म्हणूनच त्यांनी प्रयत्न चालवले होते व एक दिवस त्याच्याजवळ येवून सुरेखा बोलून मोकळी झाली होती. त्या दिवसापासून सुरेखाशी व ज्योतीशीच नव्हे तर तमाम मुलीशी तो बोलायला लागला होता.

गुरु आता मुलींशी बोलायला लागला होता. तसा तो एक दिवस उजळला. त्या दिवशी शाळेची सहल गेली होती. तसा गुरु बोलत होताच मुलींशी. परंतु

आताही तो मोकळ्या मनानं बोलत नव्हता. कमी बोलत होता. तसा तो सहलचा दिवस. त्या दिवशी गुरुही सहलीला गेला होता. तसं सगळ्या सहलीत सर्वांनी छान मजा केली व आता बस माघारी फिरली होती. तोच एका तालुक्याच्या ठिकाणी बस थांबली व बसच्या बाहेर केळेवाला केळी विकायला आला. तशी ज्योती व सुरेखा त्याचेजवळ आली. म्हणाली,

"गुरु, केळी चार ना केळी."

गुरुला त्यांनी म्हटलेले शब्द. तसा गुरु गरीबच होता त्यावेळेस. त्यांना वाटत होतं की गुरु काही केळी घेणार नाही. परंतु ते मुलींचं बोलणं. मुलीच त्या. त्यांची गुरुला दया नाही येणार तर कोणाला? शेवटी गुरुनं म्हटलं,

"घ्या केळी."

ते गुरुचं बोलणं. त्यावर ज्योती म्हणाली,

"आम्हाला एक डझन नाही पाहिजेत. तीन डझन केळी हवीत."

"तीनही डझन केळी घ्या."

"मग पैसे कोण देणार?"

"मी देतोय ना सर्व पैसे." गुरु म्हणाला. तसे त्यानं सर्व तीन डझन केळीचे पैसे दिले. त्यानंतर मुलींनी गुरुला केळी खायला दिलीत. त्यावर गुरुनं एक केळ घेतलं व तो म्हणाला,

"मला केळी आवडत नाहीत. तुम्ही खा. मी तुमच्यासाठीच घेतली केळी."

त्यावर सुरेखा म्हणाली,

"जर तू खाणार नसेल केळी तर आम्ही का बरं खावी?"

"तसं नाही गं. मला केळी अजिबातच आवडत नाहीत. तू आधी ही अर्धी केळी घे. बाकीची आम्ही खातोय."

"नगं मला."

"हे बघ, तू खाणार नसेल तर ही संपूर्ण केळी घेवून जा आपल्या घरी." सुरेखा म्हणाली.

सुरेखा म्हणाली. तसा गुरुला विचार आला. काय करावं? ही एवढी केळी घरी नेवून काय करावं. तसा तो म्हणाला,

"मी यातील दोन केळी आणखी घेतो. बाकीची तुम्ही खा."

"आम्ही एवढी कशी खाऊ?"

"मग घरी न्या."

गुरुचं ते शेवटचं उत्तर. त्यानंतर त्या दोन्ही मुलींनी अर्धी अर्धी केळी आपापल्या घरी नेली. ते पाहात त्याला अगदी हायसं वाटत होतं.

गुरुला आठवत होता तो दहावीचा वर्ग की ज्या वर्गातील तो शेवटचा दिवस होता. निरोप समारंभ पुरता पार पडला होता व आता तो निघणार होता आपल्या घरी. सर्व विद्यार्थी निघून गेले होते त्या शाळेतील. फक्त सुरेखा थांबली होती. ती गुरुची वाट पाहात होती. काय कारण होतं ते गुरुलाही माहीत नव्हतं. तसं चारुनं सांगीतलं की सुरेखा थांबली आहे तुझ्यासाठी. तिला काहीतरी बोलायचं आहे तुझ्याशी."

चारु तसा मुलींना भडकविणारा मुलगा होता. त्याला काय वाटत होतं कुणास ठाऊक. परंतु त्याचा प्रत्यय गुरुला बरेचदा आला होता. आता मात्र गुरु घाबरला होता सुरेखाला. ती काय बोलणार याचा त्याला विचार होता. हिंमत होत नव्हती तिच्याशी बोलायची. परंतु हिंमत करुन तो तिच्याशी बोलायला गेला. कारण त्यावेळेपुर्वी सुरेखाशी एका व्यवहारीक प्रकरणावरुन भांडण झालं होतं.

तो शेवटचा दिवस. त्या दिवशी सुरेखा आणि ज्योती उभ्या होत्या. ज्योती सुरेखाची वाट पाहात होती. तसा वाट पाहात असलेल्या सुरेखाजवळ भीतभीतच गुरु गेला आणि भीतभीतच म्हणाला,

"बोल सुरेखा, काय झालं? कशी काय थांबली? काय बोलायचंय तुला?"

"सहज गुरु. मला यासाठी थांबावं लागलं की..."

ती बोलत होती. परंतु तिला बोलणं अडखळत होतं. बोलणं होत नव्हतं. तसं तिनं डोळ्यातून पाणी काढलं आणि म्हणाली,

"गुरु, मला माफ कर. मी फार त्रास दिला तुला. खरं तर मी तुला त्रास द्यायला नको होतं."

सुरेखानं म्हटलेले ते शब्द. तिनं ते शब्द का म्हटले हे गुरुला कळेना. त्यामुळंच त्याला ती तशी बोलताच काही कळेनासं झालं होतं. परंतु मनोमन तो विचार करु लागला. म्हणाला,

"सुरेखा, तुझं काहीही चुकलेलं नाही आणि आता माफीही मागण्याची गरज नाही."

ते त्याचं शेवटचं बोलणं. तशी ती निघून गेली पाठीमागं पाहात. आज ती बऱ्याच वर्षानंतर भेटली होती. गुरुला. जुन्या आठवणी एकेक डोळ्यासमोरुन तरळत होत्या. ती संसारात खुश होती. तिला काहीच आठवत नव्हतं. परंतु त्याला सर्व आठवत होतं. कुणी त्याला प्रेम म्हणत होतं. परंतु ते प्रेम नव्हतं तर तो एक प्रकारचा जिव्हाळा होता. ते तरुण तरुणीचं प्रेम नव्हतं तर ते आपलं समजून घेणाऱ्या माणसाचा कनवाळूपणा होता. ते मित्रत्वाचं नातं... आज तेच मित्रत्वाचं नातं आठवत होतं त्याला. तो चारुही आठवत होता. ती सुरेखाही आणि त्यासोबतच आठवत होती ती ज्योतीही.

गतकाळ मागे गेला होता बराच लांब. त्याला परत कधीच आणता येत नव्हते. त्यातच आता आयुष्याच्या वळणावर गुरु आणि ज्योती व सुरेखाची भेट झाली होती. त्याचबरोबर भेटले होते ते सर्व मित्र. आताही त्यांच्यात पाहिजे त्या प्रमाणात तोच जिव्हाळा होता. ते तरुणपणाचं प्रेम नव्हतं. गुरु फार आनंदीत झाला होता आज. आज तो आपल्या जुन्या मैत्रीणीशी बोलत होता. कारण त्याला विशेष जिव्हाळा होता त्यांच्यात. ज्याप्रमाणे एखादी अधरवेल एखाद्या आंब्याच्या झाडाला लटकते. तसं नातं त्यांच्यात आजही निर्माण झालं होतं. ते नातं घट्ट होतं. परंतु आज त्याचे बंध सैल झाले होते. कारण त्या दोघींचेही विवाह झाले होते व त्यांना पतीही चांगले मिळाले होते. ते त्यांचेवर अतिशय प्रेम करीत होते नव्हे तर जीव ओवाळून टाकत होते. तरीही आनंद झाला असल्यानं गुरु बोलत होता त्यांचेशी. त्यावेळेस ती गोष्ट एका मित्राला माहीत झाली व तो म्हणाला,

"प्रिय गुरु, तू समाजसेवक आहेस, शिक्षक आहेस, मुख्याध्यापकचा पण प्रभार बघितला आहे तू. तूझं काम, लिखाण हे कौतुकास्पद आहे, यात शंका नाही.

परंतु नुकत्याच भेटलेल्या मैत्रीणीशी इतके वेळ संभाषण करणे हे तुझ्यासारखा व्यक्तीला शोभून दिसत नाही. यामुळे हेच दिसत आहे की तुझ्याकडे खूप फावला वेळ आहे. मित्रा, आपली प्रतिष्ठा आपण जपलीच पाहिजे, त्यासोबतच आपण त्यांच्याशी हितगुज करीत असताना आपल्या शब्दांचा वापर हा आपल्या प्रतिष्ठेनुरूप करायला हवा. आपल्या शाळेतील अनेक मित्र मैत्रिणी भेटतील यापुढे आणि आज बऱ्याच वर्षानंतर भेटल्या, नक्कीच बोलायला हवं. परंतु सतत चिल्लर गोष्टीमुळे भेटण्याचा उद्देश दिसून येत नाही. निव्वळ टुकार गोष्टीमुळे होवू शकते की आपण आज भेटलेलो आहोत, ते उद्या सोडून जातील. मग ते कधीच भेटायला येणार नाहीत. तेव्हा आशा आहे की मी जो काही मुद्दा मांडलेला आहे, तो तुला समजला असेल.

यामध्ये कुणाच्याही भावना दुखवायचा माझा उद्देश नाही."

तो मित्र बोलून गेला. तसा दुसऱ्या मित्रानं ते ऐकलं व म्हटलं,

"मी तुझ्याविषयी बोलतोय. पोरी बद्दल नाही. आतातरी सुधर. तुझ्या डोक्यात वाईट विचार आणि तुझी नजर वाईट आहे."

ते मित्रांचं बोलणं. त्यानंतर गुरु काय समजायचं ते समजला व त्यानं म्हटलं की मी भान ठेवील याचे. त्यानंतर त्यानं त्या मुलींशी बोलणं बंद केलं होतं.

गुरु विचार करीत होता त्याच्या चुकण्यावर. काय चुकलं होतं ते कळेना. तो काळ ठीक होता की त्या काळात याच मुलांनी गुरुला मुलींशी बोलण्यास मनाई केली होती. त्याचा फायदाच झाला होता त्याला. त्या मुलींशी न बोलण्यानं त्याचं जीवन सुधारलं होतं. परंतु आज? आज का बरं त्या मित्रांनी मुलींशी बोलणं बंद करायला

लावलं होतं, ते त्याला कळेना. त्या बोलण्यावर तो बराच विचार करीत होता. तसा बराच विचार त्यानं केला. कारण कळत नव्हतं. शेवटी विचारांती त्याला समजलं. ते कारण होतं त्यांचा विवाह. आज त्यांचा विवाह झाला होता. पती होता त्यांना आणि मुलंही. त्या संसारात खुश होत्या आणि तेवढ्याच आनंदीही. त्यामुळंच त्या मित्रांना वाटत होतं की त्या मुलींचा संसार तुटू नये. कदाचीत गुरुच्या जास्त बोलण्यानं त्या मुलींचे पती नाराज होतील. त्यांची मुलंही नाराज होतील व ते आपल्या बालमैत्रीणींना त्रास देतील.

ते मित्र. ते मित्र असे होते की त्यांनी त्या बालवयातील काळात त्याला मुलींशी बोलण्यापासून अडवून त्याला जाग्यावर बसवलं होतं. हे सर्व त्या काळात घडलं होतं आणि आता त्याच मित्रांनी गुरुला मुलींशी बोलण्यापासून अडवून मुलींचा संसार वाचवला होता. कारण त्या मित्रांना ही देखील शंका होती की एखाद्याचा पती संशयी राहू शकतो.

मित्रांचं ते विचार करणं बरोबर होतं. कारण आजच्या काळात व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती होत्या. लोकं वेगवेगळ्या विचाराचे होते व ते लोकं आपल्या मनात वेगवेगळ्या शंका ठेवू शकतात याची स्पष्ट आणि पुरेशी जाणीव असणारे ते मित्र आज गुरुला कौतूकास्पद वाटत होते. त्याच मित्रांनी गतकाळात गुरुला सावध केलं होतं. त्यामुळंच आज तो घडला होता आणि आजही तेच मित्र गुरुला सावध करीत होते आणि त्यालाच नाही तर त्या मैत्रिणींच्या संसाराला तुटण्यापासून वाचवीत होते.

********* **************

ज्योती...ज्योतीचा विवाह झाला होता. तिलाही सुरेखासारखाच चांगला पती मिळाला होता. सुरेखाचा पती तिच्यावर प्रेम करीत होता. तिला विवाहापुर्वी प्रेम मिळालं नव्हतं. आज तिला तसं प्रेम मिळालं होतं.

पुजा सरकारी नोकरीवर होती. तिच्यावर जबाबदारी होती घरची. तिची बेताची परिस्थिती. त्यानंतर तिनं त्या परिस्थितीवर मात करुन घरची परिस्थिती सावरली होती. त्यातच तिला वाटत होतं की आपण विवाह केल्यास आपला तर विवाह होईल. परंतु आपला विवाह झाल्यानंतर आपल्या बहिणीचा विवाह आपल्याला करता येणार नाही. कारण आपला विवाह झाल्यावर आपल्याला आपल्या पतीच्या मर्जीनंच चालावं लागेल.

ज्योती महाराणीच वाटायची आता एखाद्या राजवाड्यातील. जर ती महाराणी सारखा वेष परीधान करायची तर कधी ती एखाद्या लहानशा दहावीतील मुलींसारखी वाटायची. तिचं बोलणंही तसंच बदललेलं असायचं. ज्यावेळेस ती एखाद्या महाराणीसारखा वेष धारण करायची. तेव्हा तिचं वागणं, तिचं बोलणं एखाद्या महाराणीला लाजवेल असंच असायचं. तशीच ती जेव्हा एखाद्या वेळेस स्कर्ट वा शालेय वस्त्र परिधान करायची. तेव्हा ती एखाद्या शाळेतीलच मुलीसारखी वाटायची. तेव्हाही तिचं वागणं आणि बोलणं देखील बदललेलंच असायचं.

ज्योतीला वेगवेगळे वस्त्र परिधान करण्याची सवय होती. त्यात तिला आनंदच वाटत होता. तसाच वातावरणीय बदल जेव्हा जेव्हा होत असे. तेव्हा तेव्हा तिचे

कपडे घालण्याची सवय बदलत असे. ती कधीकधी तर हॉट वस्त्रही परिधान करीत असे व हॉट वस्त्रातही ती अगदी शोभून दिसत असे.

ज्योतीला केवळ महाराणीय संस्कृतीच आवडत नव्हती तर तिला विलासी जीवन व तसंच जगणंही आवडत होतं. त्यातच तिच्या वागण्यावर तिच्या पतीचाही आक्षेप नव्हताच.

ज्योती वाढली होती एका कंटाळवाण्या वातावरणात की जिथं मायेचा ओलावा जरी असला तरी एक प्रकारचं संतापाचं वातावरण होतं. ती जरी लहानपणापासून एका चैन वातावरणात जगली असली तरी तिचा विलासीपणा तिला जास्त काळ भोगता आला नाही. परिस्थितीनं अशा वळणावर आणलं होतं तिला की ज्या वळणावर केवळ काटेच काटे होते. ते काटे बोचत होते तिला. एवढे बोचत होते की जीवन जगणं असह्य वाटत होतं. ती असहायता सहन करीत करीत ती बारावी झाली होती. बहिण तिला शिकवीत होतीच.

ज्योतीला आवडत होतं महाराणीसारखं वागणं. एकदा तिनं महाराणीसारखा वेष धारण केला होता व बसली होती घरच्या सोप्यावर. तो सोपाही महाराजा सोफाच होता. मग तिनं आपल्याच मैत्रीणींना म्हटलं,

"काढा गं माझा फोटो?"

मैत्रीणींनी तिचा फोटो काढला. त्यानंतर ती सुखावली व तिला आनंद वाटला.

ज्योतीचे वाईट दिवस जात होते. अशातच तिच्यासाठी मुलीही बघणं सुरु होतं. ती तरुण झाली होती. त्यामुळं मुलं शोधणं आलंच.

ज्योतीवर तिच्या बहिणीचा मित्र असलेला माधव नावाचा एक मुलगा प्रेम करीत होता. ज्योतीची बहिण पुजा जिथं सराव करायची. त्याच मैदानात तोही पोलिसांच्या प्रशिक्षणाचा सराव करायचा. तो तिला सतत पत्र लिहित असे व आपलं प्रेम व्यक्त करीत असे. तशी ज्योतीही त्याला पत्र लिहित असे व तिही आपलं प्रेम व्यक्त करीत असे. तो निरतिशय प्रेम करायचा तिच्यावर. तसा तो प्रेमात अतिशय वेडाच झाला होता. इतका वेडा झाला होता की त्यानं एकदा तर तिला रक्तानंच चिठ्ठी लिहिली होती.

तो तिला म्हणत असे की तिनं त्याचेशी विवाह करावा. परंतु ती त्याला होकार देणार कशी? ती म्हणत असे की आपण विवाह कसा करावा? पुजाताई आहे. ती काय म्हणेल. त्यावर तो म्हणत असे. पुजाला जावू दे. आपण पळून जावू.

पळून जावून विवाह करणे. ज्योतीच्या ते रक्तातही नव्हतं. तसा पळून जाणे हा शब्द माधवनं वापरताच तिच्याही तळपायाची आग मस्तकातच गेली होती. तरीही त्यावर नियंत्रण ठेवत तिनं त्याला म्हटलं,

"मी पुजाताईला विचारल्याशिवाय आपला विवाह करु शकत नाही. तिला विचारावं लागेल आणि तुला जर वाटत असेल की या ज्योतीनं तुझ्याशी विवाह करायला हवा तर तू तिला विचार त्याबद्दल."

ते ज्योतीचे शब्द. ते शब्द त्यानं ऐकले. तसा त्यानं काही प्रतिसाद तिला दर्शवला नाही. मात्र तिला आठवत होती तिची पुजाताई. ज्या पुजाताईनं तिला सावरलं होतं. तिनं केवळ ज्योतीलाच सावरलं नव्हतं तर सर्व कुटूंबांना सावरलं होतं तिनं. तिचे ते वडील मरण पावताच ती वडीलाची जागा तिनं घेतली होती. ती

जबाबदारी पेलून तिनंच पुरुषांसारखीच पुरुषांना लाजवेल अशीच कामगीरी केली होती. तिचेच उपकार होते की ती शिकली होती संगणक आणि ब्युटीपार्लरचा अभ्यासक्रम. जो अभ्यासक्रम पुढील जीवनात तिच्या कामात येणार होता. पुजाताई तिच्यासाठी सर्वश्रेष्ठ होती. त्यामुळंच ती पुजाताईला विचारल्याशिवाय विवाहाचा निर्णयही घेवू शकणार नव्हती.

ते दिवसच वाईट होते ज्योतीसाठी. अतिशय वाईट दिवस जात होते ज्योतीचे आणि त्याला छेद देत देत ती आपलं जीवन उभारत चालली होती. ते रक्ताचं पत्र आज कालबाह्य झालं होतं. पुजाताईला आपल्या विवाहाबद्दल विचारणा कर असं माधवला ज्योतीने म्हणताच माधवची हिंमत झाली नाही व तो माघारी फिरला.

संकटांनी पुजाचा आणि ज्योतीचा पिच्छा सोडलाच नव्हता. ती संकटं वारंवार येतच होती. तसं एक संकट आलंच आणि तेही संकट एवढं तीव्र होतं की ते अवकाळी पावसासारखंच वाटत होतं. तो एकदाचा प्रसंग तिला आठवत होता. तो तिच्या महाविद्यालयीन जीवनातील प्रसंग नव्हता. कारण महाविद्यालयीन काळ नुकताच पुर्ण झाला होता. ती आता संगणकाचा जाब करीत होती.

तिचं महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण झालं होतं. काही खाजगी शिकवण्या लावल्या होत्या. ज्यात ब्युटीपार्लर व संगणकाचं प्रशिक्षण ती देत होती. अशातच ती एक घटना घडली. तिची आई कोमात गेली होती. मग काय, पुन्हा एक फार मोठा गंभीर प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला. तिची आई तब्बल पाच सहा महिने तरी कोमात राहिली होती. काही दिवसांनी ती दैवयोगानं शुद्धीवर आली. परंतु अशा परिस्थितीत त्या दरम्यानचा काळ कसरतीतच गेला.

सारेच संकटं. एक एक घटना घडत होती आणि एका एका घटनेला तोंड देणं सुरु होतं. ती वैतागली होती अशा सतत समोर येत असलेल्या संकटांना. मग सवयच पाडली तिनं. ठरवलं की आता कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही संकटांना घाबरायचं नाही. संकटं तर येणारचं. ते आपलं प्रारब्धच. त्याचा बाऊ करायचा नाही. हिंमतीनं सामोरं जायचं. त्यानंतर एक तरुण आला तिच्या जीवनात व पुजाच्या पहिलंच ज्योतीचा विवाह थाटामाटात पार पडला.

काळ सपाट्यानं सरकत होता. अशातच विवाहानंतर तिचं जीवन थोडंसं सुधारलं. तिला पती चांगला मिळाला. परंतु तिनं ठरवलं. आपण सतत माहेरी संकटांचा सामनाच केला. आता जगायचं. संकट येतही असतील, तरी त्या संकटांना घाबरुन जायचं नाही. जे काही होते, ते चांगल्या साठीच होते. असंही ठरवलं ज्योतीनं मनात. मग निर्णय घेतला की आता काहीही का असेना. काल आपल्याला आपल्या माहेरी फार त्रास झाला. आर्थिक अडचण फार जाणवली. कारण खाणारी तोंड जास्त होती आणि कमविणारे हात कमी. आता आपण हे कमविणारे हात वाढवायचे. खाणारी तोंड कमी करायची. शिवाय ऐषआरामाचं जीवन व्यथीत करायचं.

ज्योतीचा तो विचार. अशातच ती गरोदर होती. घरात आनंदीआनंद होता. गरोदर असतांना तिचे फारच लाड पुरवले जात होते. मुलगाच होईल असं वाटायला लागलं होतं. सारेच नातेवाईक मुलगाच होईल, अशा प्रकारचं भाकीत करीत होते. अशातच सातवा महिना उजळला.

सातवा महिना उजळला व तिचा सातवा महिना साजरा केला. तसं तिला औक्षण घातलं व त्यानंतर तिच्यासमोर एका ताटात काही प्लेटा आणण्यात आल्या.

त्या झाकून होत्या. मग तिला सांगण्यात आलं की तिनं त्यातील एखादी प्लेट उचलावी.

ज्योतीनं प्लेट उचलली. त्याखाली एक कचोरी होती. त्या कटोरीत एक पेढा होता. तो पेढा निघताच काही नातलग म्हणाले,

"हिला मुलगाच होणार."

ज्योतीला मुलगाच होणार. सर्वांना आनंद झाला. घरी पतीलाही आनंद झाला. त्याचबरोबर आनंद झाला तिला. कारण तिलाही मुलगाच हवा होता. तो पेढा तिच्या पतीनं काहीसा तिला भरवला. काहीसा आपण खाल्ला आणि सातवा महिना साजरा झाला. काही जणांनी तिला मुलगा होईल असं मीच म्हटलं होतं याची पुष्टीही केली.

आज नववा महिना लागला होता. अशातच तो दिलवरीचा काळ आला व तिला प्रसूतीसाठी रुग्णालयात भरती करण्यात आलं आणि दिलेवरी झाली. ज्योतीनं एका सालस कन्येला जन्म दिला होता. मुलगी गोंडस होती. सुंदरही होती.

पेढा...मुलगी होताच काहींना तिचा सातवा महिना आठवला. तिनं पेढा उचलला होता व पेढा उचलताच भाकीतही करण्यात आलं होतं की तिला मुलगी नाही तर मुलगाच होणार आहे. अन् आता मुलगी? हे कसं काय घडलं? सारी निसर्गाचीच करणी. विधात्याची लीला. आता मुलगी काय आणि मुलगा काय? पुढं पाहू. दुसऱ्या बाळाला जन्माला घालू. मुलगा होईल.

ते दिलेवरीचे दिवस. ते दिवस पुरते निघून गेले होते. काही दिवस असेच निघून गेले व पती पत्नीत चर्चा झाली. पतीचं बोलणं. आपण दुसरं अपत्य ठेवायचं. पहिलं

अपत्य मुलगी झाली. आता मुलगा हवाय. मग काय तसा विचार मनात करताच ज्योतीनं विवाहानंतर निर्णय घेतला होताच की तिला आर्थिक परिस्थितीचा फार त्रास झाला होता. आता आपण ऐषआरामात जगायचं. तसं पतीनं तिला दुसरा मुलगा हवाय म्हणताच ती म्हणाली,

"मला आता नकोय मुलगा आणि मुलगी. मला माझी बाळी एकटीच हवी."

तिचा तो विचार. तसा तिचा पती सुंदरच विचारांचा होता. त्यानं तिच्या निर्णयावर जबरदस्ती केली नाही. तसं तिला झालेल्या त्या मुलीला तिनं आज लहानाचं मोठं केलं होतं. आज तिची ती मुलगी तरुण झाली होती. परंतु आज तिला तिचा निर्णय फसलेला वाटत होता. कारण तिची मुलगी आज मोठी जरी झाली असली तरी ती एकलकोंडी बनली होती व तिला कोणीच भाऊ वा बहिण नसल्यानं ज्या पुजानं तिला मदत केली होती आई आंधळी झाल्यावर. तसं आपल्याला काही झाल्यास आपली बाळी काय करेल? कोण तिला आधार देईल? याचाच ती विचार करीत होती. यासाठी ती पश्चाताप करीत होती.

तिच्या जीवनात दुःख होतं. ते दुःख असलं तरी स्वतःला ती दुःखी समजत नव्हती. तिला एकच मुलगी असल्याचंही दुःख नव्हतंच तिला. ना तिनं कधी नियतीलाही दोष दिला होता. ते दुःख तर तिनं आपल्या अंतर्मनात गाडून टाकलं होतं. हे असंच चालायचंच. संसारच आहे तो. असे ती समजत असे. तशी ती कोणालाही आनंदीत असल्याचं सांगत असे. तसंच ती आपल्याला एकच मुलगी हवी होती असंही सांगत असे. तसा काळ सरकलाच होता व अशा बदलत्या काळात तिची भेट तिचाच बालमित्र असलेल्या गुरुशी झाली. जो तिचा बालपणीचा मित्र

होता. त्यानं तिचं अंतर्मन ओळखलं होतं. ती सुखी असली तरी गुरुला ती दुःखीच वाटत होती. कारण ती त्याचेशी सतत संवाद करीत असे. त्याला कधीकधी आपल्या लहानपणापासून आपल्यासोबत घडलेल्या घटना सांगत असे आणि आता आपल्याला त्या संकटांची सवय झाली आहे असंही ती सांगत असे आणि आपणच एकमात्र नियतीचे शिकारी नाही तर असे बरेच जण आहेत, असंही कधीकधी ती म्हणत असे.

ते तिचं बोलणं. तिचं बोलणं नियतीला दोष देणारं नव्हतं. तिला वाटत होतं की आपलेच काही कर्म असतील की आपल्याला हे भोग भोगावे लागले.

ते तिचं बोलणं. ते जरी नियतीला दोष देणारं नसलं तरी ते तिला पश्चाताप करणारंच असावं असंही गुरुला वाटू लागलं होतं. तसा तो तिला एक दिवस म्हणाला,

"बघ, असं सांगून चालत नाही. ती वास्तविकता आहे आणि ती वास्तविकता आपण टाळू शकत नाही. याबाबतीत आपल्याच शाळेतील एका मित्राचं उदाहरण देतो की ज्याची नियतीनं क्रूर थट्टा केली."

गुरु तिच्यासोबतच शिकला होता. त्याला त्या शाळेतील प्रसंग आठवत होते. त्यातीलच तो एक किस्सा होता.

"कोणाचं उदाहरण? कोणता असा मुलगा होता आपल्या शाळेत की ज्याची नियतीनं क्रूर थट्टा केली."

"ऐक तर. मी त्याचं नावही सांगतो आणि तुला कळेलही ते."

असं म्हणत तो तिला सांगू लागला त्या वर्गमित्राची कहाणी. ज्या कथेला वास्तवाची जोड होती.

किर्ती... गुरुच्या वर्गात असलेली एक मुलगी. तिचा पती शाळेतीलच एक वर्गमित्र होता. दोघांचंही प्रेम होतं बालपणापासूनच. तो पती दिसायला सुंदर होता.

किर्तीही पुजासारखीच मैदानावर धावपटूचे खेळ खेळायची. तिचीही इच्छा होती की तिनं मोठी धावपटू बनावं. परंतु ते स्वप्न तिचं पुर्ण झालं नाही. शिवाय ते स्वप्न सोडून तिनं पुढील काळात आपल्या अभ्यासाकडे लक्ष दिलं व ती शिकत गेली. ती बहुतेक अठरावीपर्यंत शिकली होती.

सागर तिचा पती. तो फक्त बारावीच शिकला होता. त्यानंतर तो कामाला लागला होता. तो पुढं शिकू शकला नाही. कारण त्याचं अभ्यासात मन लागत नव्हतं. मन लागलं देखील नाही. परंतु त्यानं किर्तीचा पिच्छा सोडला नव्हता.

किर्तीवर सागरचं अतिशय प्रेम होतं. तो बारावी जरी शिकला असला तरी त्यानं किर्तीचा पिच्छा सोडला नव्हता. अशातच किर्ती व त्याचा विवाह थाटामाटात पार पडला. तो आंतरजातीय विवाह होता.

आंतरजातीय विवाह...तो तिनं का केला? त्यामागील कारण होतं तिला वडील नसणं. तिचे वडील ती दुसरी तिसरीत असतांनाच मरण पावली होती. आईही फारशी कामाला निघाली नव्हती. तेही चार भाऊबहिणच होते. अशातच वडीलाचं छत्र हरवलं व ते संपुर्ण कुटूंब देशोधडीला लागलं. अशातच सागरचा प्रवेश झाला.

सागर ती शाळेत असतांनाच तिच्या घरी यायचा. हालचाल विचारायचा. कधी तिला तर कधी तिच्या आईला मदत करायचा. तसे त्याचे वडीलही नोकरीवर होतेच. त्यांना बक्कळ पैसा होताच. तो कधी कधी किर्तीला पैशाचीही मदत करीत असे.

किर्तीचीही एक मोठी बहिण होती. तिनं आजही विवाह केलेला नव्हता. तिनं आपलं शिक्षणही केलं नाही. ती मोठी असल्यानं वयात येताच तिनं घरची जबाबदारी सांभाळली. बहिणीला मदत केली. तिला शिकवलं. लहानाचं मोठं केलं. त्याचबरोबर तिनं आपल्या भावांनाही शिकवलं. त्यांनाही लहानाचं मोठं केलं. त्यांचेही विवाह करुन दिले. अशातच सागरनं हिंमत करुन किर्तीच्या बहिणीला म्हणजेच उर्मीलेला किर्तीशी विवाह करण्याची मागणी घातली.

ती त्याची विवाहाची मागणी. ती त्याची हिंमत. ती हिंमत पाहताच उर्मीलेनं आपल्या बहिणीच्या जीवनाचा विचार केला. तसं तिला आठवलं. तिचं शिक्षण. किर्ती उच्च शिकली होती आणि सागर? सागर काही शिकला नव्हता. तो फक्त बारावीच होता. एक घर होतं आणि तेही घर त्याच्या वडीलांचंच होतं. शिवाय त्याची अशी फारशी मिळकत नव्हतीच. मग काय, विचार आला. विचार आला उर्मीलेला की आपल्या बहिणीचा विवाह सागरशी करायचा कसा? तो तर शिकलेला नाही. तसा दुसरा विचार आला.

उर्मीला विचारच करीत होती दोघातील शिक्षणाचा की तिच्या मनात दुसरा विचार आला. सागर तिला लहानपणापासून मदत करायचा. मदत करीत आला होता. त्यानं हेही पाहिलं नव्हतं की किर्ती त्याला मिळेल की नाही. तो फक्त आपलं कर्म करीत होता. फळाची अपेक्षा करीत नव्हताच तो. अशातच उर्मीलेनं किर्तीला बोलावलं. तशी किर्ती आली व तिला उर्मीलेनं म्हटलं,

"मला तुझ्या विवाहाबद्दल होकार द्यायचा आहे. सागरनं तुझ्याशी विवाह करण्याचा प्रस्ताव ठेवलेला आहे. तुला सागर पसंत आहे काय?"

किर्तीनं उर्मीलेचे ते शब्द ऐकले. तशी ती ओशाळली. तिला थोडीशी लाज वाटली. तिला काय उत्तर द्यावं तेच कळेना. तशी ती खाली मान घालूनच बसली होती. मौन बाळगून होती. काही वेळ शांतता होती. स्मशान शांतता. ती स्तब्धता भंग करीत उर्मीला पुन्हा म्हणाली,

"अगं किर्ती, तू माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलेलं नाही."

उर्मीलेचं ते बोलणं. ते बोलणं पुर्ण होताच ती म्हणाली,

"ताई, तू जेही काही करशील. ते मला मान्य असेल. जर तू म्हणशील की सागरशी विवाह कर. तर मी सागरशीही विवाह करेल व तू नकार देशील तर मी सागरलाही नकार देईल. तू ज्याचेशी माझा विवाह लावून देशील. त्याचेशी मी विवाह करेल."

किर्ती आपलं अंतर्मन व्यक्त करीत होती आपल्या मोठ्या बहिणीजवळ, उर्मीलेजवळ. तसं मधातच ते बोलणं तोडत उर्मीला म्हणाली,

"अगं किर्ती, मी जर म्हटलं विहिलीत उडी मार तर मारशील काय? हा तुझ्या विवाहाचा प्रश्न आहे. तुझ्या जीवनाचा प्रश्न आहे. तू शिकलेली आहेस. तुझं उच्च शिक्षण झालेलं आहे आणि सागर शिकलेला नाही. तो फक्त बारावीच आहे आणि आता बारावीला अंगुठाछापच म्हटलं तरी चालेल. एवढं सगळं असतांना मी तुला डोहात तरी कशी ढकलू? म्हणूनच मी तुझं मत मागीतलं तर तुही मला काही सांगू शकत नाहीस."

ते उर्मीलेचं बोलणं. त्यावर पुन्हा किर्ती चूपच बसली. तोच उर्मीला परत म्हणाली,

"किर्ती, मी तुझा विवाह सागरशीच लावून दिला तर तुला कसं वाटेल. आता सांग की तू खुश आहेस का?"

ते उर्मीलेचं बोलणं. तसं तिचं बोलणं होताच किर्तीचे डोळे पानावले व ती आपल्याच मोठ्या बहिणीजवळ ढसाढसा रडायला लागली. त्याचं कारणही तसंच होतं. ते कारण म्हणजे उर्मीलेनं वडीलांची भुमिका पार पाडली होती.

किर्तीला रडतांना पाहून उर्मीलेनं तिचं डोकं आपल्या दोन्ही हातात घेतलं. ते आपल्या छातीला लावलं व तिच्या पाठीवरून ती हात फिरवू लागली व म्हणू लागली,

"किर्ती, मी तरी काय करु? कुठून आणू तुझ्यासाठी विवाहयोग्य वर शोधून. अगं, आपले बाबा गेलेत. तेव्हापासून नियतीनं आपल्याकडं पाठच फिरवली. कोणताच नातेवाईक आपल्याकडं फिरकत नाही. ना कोणी शब्दानंही विचारत नाही. कसे आहोत. कसे नाही. याचं कोणालाच सुतोवाच नाही. काय करु मी. अगं, तू सागरशीच विवाह कर. सागर एक चांगला मुलगा आहे. तो आपल्याला अगदी लहानपणापासूनच मदत करीत आला आहे. तुला खरंच सुखी ठेवेल तोच. तू सुखी राहशील त्याच्या घरी. विश्वास ठेव. मी काही असा व्यर्थ निर्णय घेणार नाहीच."

उर्मीलेचं ते बोलणं. त्यावर किर्तीनं विश्वास ठेवला. तसं पाहता तिचं प्रेम होतंच सागरवर. मग काय? सागरशी तिचा ती एवढी शिकलेली असतांनाही उर्मीलेनं तिचा विवाह पार पाडला. तिनं प्रसंगी आपला विवाह केला नाही.

आज किर्ती सुखी होती. ती आपल्या बहिणीला अंतर देत नव्हती. तिच्या बहिणीनंही आगामी काळात सर्वच भावाबहिणीचे विवाह केले होते. परंतु स्वतःचा

विचारही केला नव्हता विवाहासाठी. आपली इच्छा...आपलं अंतर्मन कशीतरी दाबून उर्मीला जगत होती रामायणातील त्याच उर्मीलेसारखी. जी लक्ष्मणाची पत्नी होती. ती होती म्हणूनच रामाला रावणावर विजय मिळवता आला होता व आज ही कलियुगातील उर्मीला होती म्हणूनच किर्ती आणि सागरचा विवाह पार पडला होता. तोही थाटामाटात. तसाच तोही चौदा वर्षानंतर. जणू त्यांना त्यांच्या प्रेमाला जाहीर करायला चौदा वर्षच लागले होते.

सागर आणि किर्तीचा विवाह थाटामाटात पार पडला होता. परंतु विवाहानंतरही किर्ती खुश नव्हती. कितीतरी वर्षापासून तर त्यांना भाग्याचं पुत्ररत्नच दिलं नव्हतं. अन् शेवटी एक मुलगी झाली, तिही दिव्यांगणाच. ती दिव्यांगणा नव्हतीच. कारण चांगली खेळायची. नृत्य करायची. पाहुण्यांचा आदर सत्कार करायची. कोणाला चुकीनं जरी तिचा पाय लागला तर नतमस्तक व्हायची. स्वारी म्हणायची. परंतु थोडी गतीमंद होती.

तिचं नाव सोनू होतं व सोनू नृत्य अतिशय सुंदर करीत होती. शिवाय ती कला काही तिला कोणं शिकवली नव्हती. तरीही तिला नृत्य अस्खलीतपणानं जमत होतं. तसंच तिच्या वडीलांनाही पेंटींग. ते कधीकधी बाहेरगावी देवांच्या मुर्त्या रंगवायला जात असत.

सोनू जेव्हा लहान होती. तेव्हा तर ती तीन वर्षपर्यंत चालूच शकली नाही आणि चार वर्ष बोलूही शकली नव्हती.

सोनू एकुलती एक मुलगी होती सागर आणि किर्तीची. ती देव देव करता झाली होती. त्यासाठी तब्बल चार वर्ष वाटही पाहावी लागली होती. शिवाय ती

झाल्यावर ती दिव्यांग निघाली. थोडासा त्यांना पश्चाताप झाला. परंतु त्यांनी निर्णय घेतला. आपण तिच्यासाठीच जगावं. तिला अपार सुख द्यावं. तिला प्रेमाची कमतरता पडू देवू नये. जर आपण दुसरं अपत्य होवू दिलं तर आपलं प्रेम विभागल्या जाईल व आपण तिला प्रेम देवू शकणार नाही.

त्यांचा तो निर्णय. तसा तो निर्णय रास्त होता. त्यांनी असा निर्णय घेतला होता की जो निर्णय त्या मुलीला तिच्या अखेरपर्यंतच्या काळापर्यंत सुखच देणार होता. तो भविष्यातील निर्णय होता. जे भविष्य अंधारलेलं असलं तरी त्या भविष्यात असीम उज्वलता भरलेली होती. ज्या भविष्यानं हृदयातील अंधारलेल्या ग्रहांना निश्चितच प्रकाश मिळणार होता व त्या प्रकाशानं ते तारे तेजोमय होणार होते.

अंधारलेलं सोनूचं आयुष्य. ते आयुष्य जरी अंधारलेलं असलं तरी त्या आयुष्याला प्रकाशाची झालर होती. ती झालर प्रतिबंधित झाली होती. तो प्रकाश अंधार देणारा नव्हता तर उजेडच देणारा होता. असं वाटत नव्हतं की काय हे आयुष्य. या आयुष्यात काही आनंदच नाही.

आनंद जरी नसला त्यांच्या आयुष्यात, तरी ते आयुष्य अनमोल होतं. ते आयुष्य अनमोल बनलं होतं. जेव्हा कळलं होतं त्याही आयुष्यात. जेव्हा सोनू दिव्यांगणाच नाही तर नृत्यांगणा बनली होती. ती चांगलं नृत्य करीत होती नव्हे तर आज त्यांच्या मायबापाला तिचा अभिमान वाटत होता. शिवाय महत्वाची गोष्ट म्हणजे ती मोठमोठ्या कार्यक्रमात विशेष प्रावीण्य पटकावीत होती. त्यामुळंच ती दिव्यांग असली तरी तिच्या दिव्यांग पणाचे काहीच दुःख नव्हते तिच्या परीवारात. ना किर्तीच्या परीवाराला दुःख होतं.

आजचा दिवस किर्ती आणि सागरसाठी महत्वाचा दिवस होता. आज सोनूला नृत्यात मानाचा पुरस्कार मिळाला होता. त्यात तिच्या आईवडीलांचाही सत्कार केल्या गेला होता. तसाच सत्कार केला जात असतांना सागरला आठवला तो त्याचा भुतकाळ. ज्या काळात त्याचा विवाह झाला होता व त्याच्या विवाहाला जवळपास एकच वर्ष झाला होता. त्याला अपेंडीक्सचं फोड झालं होतं व ते फोड पोटातच फुटलं होतं. वेदना तीव्र होत होत्या. अशातच त्यानं आपली पत्नी असलेल्या किर्तीला फोन केला. ती विवाह झाल्यापासून नोकरी करीत होती.

सागरचा आलेला तो फोन. तो फोन येताच किर्ती लगबगीनं घरी आली. तिनं त्याला लगबगीनंच भर्ती केलं. त्याला खर्च लागत असल्यानं तिनं त्याला सरकारी रुग्णालयात भरती केलं. परंतु ते सरकारी रुग्णालय. तिथं डॉक्टर त्याचेवर उपचार करायला तयार नव्हते. ते दिरंगाई करीत होते. शिवाय ते दिरंगाई करीत असतांना किर्तीनं पाहिलं. तशी ती त्या रुग्णालयातील डॉक्टरवर ओरडली. मग डॉक्टर धावून आला व वेळीच ऑपरेशन करुन त्यांनी त्याचा प्राण वाचवला. शिवाय त्यात महत्वाची भुमिका केली, ती त्याची पत्नी असलेल्या किर्तीनं. त्यानंतरही त्याचं ऑपरेशन झाल्यावर त्याच्या शरीराला धाग्याचे टाके सहन होत नसल्यानं त्याचं बिनटाक्याचं ऑपरेशन झालं व त्या दरम्यान ते टाके सुकवीत असतांना किर्तीनं त्याची अतिशय काळजी घेतली होती की ती वाखाणण्याजोगीच होती. किर्ती कधीही न कंटाळता त्याची रोज बँडेजपट्टी करीत असे. त्यामुळंच तो वाचला होता आणि आज तो दिसत होता जीवंत. तो जीवंत होता किर्तीच्याच कृपेनं. ती जर नसती तर तोही आज जीवंत नसता आणि त्यातच सोनूचाही जन्म झाला नसता. ना सोनू असती ना आज तिला पुरस्कार मिळाला असता. आज त्याला पुरस्काराबाबत

अभिमान वाटत होता. तेवढाच अभिमान त्याला सोनू आणि किर्तीबद्दलही वाटत होता.

आज किर्ती आधार ठरली होती सागरची. दोघांची मन एकवटली होती. तशीच ती गुंफली होती एकमेकात. त्यांना ना सोनूच्या दिव्यांगपणाचं दुःख वाटत होतं. ना त्यांना स्वतःला दुसरं मूल नाही याचं दुःख होत होतं. ते आपल्या मुलीसाठी खपत होते दिवसरात्र नव्हे तर ते तिला प्रेमच देत असत.

ज्योतीचंही अगदी तसंच होतं. तिही आज खुश होती आपल्या आयुष्यात. दोघांचीही जीवनगाथा मिळतीजुळतीच होती. ज्योतीचा आधार तिचा पती बनला होता. तो तेवढ्याच ताकदीनं तिला आनंदी ठेवत होता नव्हे तर मार्गदर्शनही करीत होता. त्या दोघींमध्ये मिळतेजुळतेपणाच होता. ज्योतीचे वडील ती बारावीत असतांना गेले तर किर्तीचे वडील ती दुसरीत असतांनाच गेले. ज्योतीलाही एकच मुलगी होती आणि किर्तीलाही एकच मुलगी होती. तसंच दोघींचंही पालनपोषण त्यांच्या मोठ्याच बहिणीने केलं होतं. दोघीही स्वतःला दुःखी समजतच नव्हत्या. ना त्या दोघीही नियतीला दोष देत होत्या. तेच आठवत होतं आज गुरुला. तशी त्याला आपली जीवनगाथा आठवली. ती त्यानं किर्तीला शेअर केली होती. त्याचीही जीवनगाथा मिळतीजुळतीच होती त्यांचेशी. त्यालाही त्याच्याच मोठ्या बहिणीनं लहानाचं मोठं केलं होतं. तो मात्र स्वतः स्वतःला दुःखी समजत होता. तसाच तो नियतीला दोष देत होता. तो नियती मानत होता. परंतु अंधश्रद्धेपासून तो कोसो दूरच होता. तो विज्ञानवादी दृष्टिकोनातून जगायचा. विज्ञानवाद त्यानं स्विकारला होता व त्याचा त्याला फायदाही झाला होता. त्यालाही एकच मुलगी होती की जिला एकेकाळी कमी ऐकू येत होतं. परंतु त्यानं विज्ञानवादी दृष्टिकोन अंगीकारुन एका

डॉक्टरकरवी उपचार केला. आज त्याच्या मुलीला चांगलं ऐकायला येत होतं व आज ती ठणठणीत बरी झाली होती. त्यामुळंच तो कोणतेही आजार हे आनुवंशिक असतात. यावर विश्वासच ठेवत नव्हता.

दिव्यांग असणं हा काही गुन्हा नाही. तसाच दिव्यांग दोष असणं हे काही पाप नाही. तसेच दिव्यांग असणं हा काही गुन्हाही नाही. तरीही बरीचशी मंडळी कोणी दिव्यांग असेल तर त्याची हेळसांड करीत असतात, असे पाहण्यात आले आहे. परंतु तशी हेळसांड करण्याऐवजी त्यांनाही आधार द्यायला हवा की जेणेकरुन त्यांनाही आत्मबळ मिळेल व तेही आपल्या स्वतःचा विकास करु शकतील. जो विकास देशहिताला तारक ठरु शकेल.

दिव्यांगपणा... हा अलिकडील काळातील शापच समजला जातोय. कारण जो व्यक्ती आजच्या काळात दिव्यांग दिसला की त्याच्याकडं लोकांची पाहण्याची दृष्टी ही बरोबर राहात नाही. मनात किंतु परंतु सारखे शब्द उपस्थीत होत असतात.

दिव्यांगपणा हा अलिकडील काळात अवयवात येणारा विद्रुपपणा. जर कोणी पाहायला विद्रूप असेल. ज्यांच्या शरीराची ठेवण व्यवस्थीत नसेल वा ज्याला कमी ऐकायला येत असेल, ज्याला प्रमाणापेक्षा कमी दिसत असेल, ज्याला बुद्ध्यांक कमी असेल, ज्याला बरोबर चालता येत नसेल, अशांना दिव्यांग समजलं जातं.

काही लोकं म्हणतात की मागील जन्मात ज्यानं पाप केलं, त्याला दिव्यांग मूल जन्मास येतं वा या जन्मात ज्यानं पाप केलं, त्यास दिव्यांग मूल जन्मात येतं. परंतु तसं काही नसतं. त्यामुळंच उचलली जीभ आणि लावली टाळूला असं कोणीही करु नये.

दिव्यांग व्यक्तीचा जन्म कसा होतो वा दिव्यांग मुलं का जन्माला येत असतील? असा प्रश्न कोणालाही पडू शकतो. त्याची बरीच कारणं आहेत. पहिलं कारण म्हणजे आनुवंशिकता. जर आधीच्या पिढीतील एखादा व्यक्ती दिव्यांग असेल तर पुढच्या पिढीतील व्यक्ती दिव्यांग नक्कीच जन्मास येवू शकतो. दुसरं कारण आहे, जर गर्भधारणेच्या वेळेस गर्भ नको असे वाटून गर्भनिरोधक गोळया खाल्ल्या तर त्याचाही परिणाम गर्भावर होवून जन्मास येणारं मुल हे दिव्यांग बनू शकतो. तिसरं कारण म्हणजे सतत गर्भ राहूच नये म्हणून घेतलेल्या गर्भनिरोधक गोळया वा रसायने बाळ गर्भात असतांना त्यावर परिणाम करुन जातात. चवथं कारण म्हणजे गर्भ ज्यावेळेस गर्भपिशवीत समावतो. तेव्हा जास्त उत्तेजक पेय पिणे, मादक, नशा येणारे पेय पिणे, पदार्थ खाणे. या गोष्टीही दिव्यांग मुलाच्या जन्मास कारणीभूत ठरतात. पाचवं कारण आहे कुपोषण. जर गर्भार मातेला गर्भधारण केलेला असतांना चांगलं सात्वीक अन्न खायला मिळालं नाही तरही दिव्यांग व्यक्ती जन्मास येत असतो. शिवाय गर्भार व्यक्ती गर्भ पोटात असतांना आजारी पडणे, गर्भार व्यक्तीने अति प्रमाणात एखादी वस्तू खाणे, झोप येत नसल्याने झोपेच्या गोळया घेणे, एखाद्या वेळेस गर्भाला प्राणवायूचा पुरवठा न होणे, रक्तात आयोडीनची योग्य मात्रा नसणे, गर्भाची एक्सरे चाचणी वारंवार करणे, गर्भ असतांना स्त्रिया पडल्याच तर त्यांना मार लागत असतांना गर्भालाही मार लागणे, वजनदार वस्तू उचलल्यास त्याचा गर्भावर परिणाम होणे, वेळेआधी प्रसुती होणे, परिसरातील मोठा आवाज ऐकणे, नात्यातील व्यक्तीसोबत विवाह होणे, वाढलेल्या वयात विवाह होणे, प्रदुषण असणे इत्यादी बरीच कारणं दिव्यांग व्यक्तीच्या जन्मासाठी आवश्यक आहेत.

दिव्यांग व्यक्ती जन्मास येण्याचं महत्वपुर्ण कारण म्हणजे गर्भ लवकर न थांबणे. याला जबाबदार असतात गर्भनिरोधक गोळया वा आपलं खानपान. आपलं खानपान जर व्यवस्थीत असेल, आपण गर्भ निरोधक गोळया घेत नसेल तर गर्भ व्यवस्थीत टिकत असतो. तो गर्भपिशवीत लवकर थांबतही असतो. परंतु जर आपले खानपान व्यवस्थीत गर्भाक्षयास अनुकूल नसेल वा आपण गर्भनिरोधक गोळया घेतल्या असतील तर गर्भपिशवी आंकृचन पावते. ज्यातून गर्भ लवकर थांबत नाही. तसाच कदाचीत थांबलाच तर दिव्यांग मुलं जन्मास येवू शकतात. म्हणूनच आपलं खानपान व्यवस्थीत असावं. गर्भनिरोधक गोळयांचा अतिवापर टाळावा किंवा मुल जन्मास घालण्यापुर्वी त्याचा वापरच न केलेला बरा.

दिव्यांग व्यक्ती सुधारु शकतात काय? कोणालाही असा पडलेला प्रश्न. याचंही उत्तर नाही असंही येईल आणि हो असंही येईल. त्याचं कारण आहे त्या दिव्यांग व्यक्तीची टक्केवारी. जर तो दिव्यांग टक्केवारीच्या कमी टक्केवारीत बसत असेल, तर तो पुर्णपणे बरा होवू शकतो. त्यावर औषधीशास्रात औषधी उपलब्ध असतात. साधारणतः कर्णबधीर असलेली, वाचादोष असलेली, दृष्टीदोष असलेली, गतीमंद असलेली, मतीमंद असलेली दिव्यांग मुलं औषधानंही बरी होवू शकतात. त्यामुळंच घाबरण्याचं कारण नाहीच. मग कोणी कितीही भीती दाखवत असला तरी. कारण दिव्यांग व्यक्तीबद्दल बरेच समज गैरसमज समाजात रुढ आहेत. शिवाय जरी अनुवंशशास्रानुसार आनुवंशिकता हे जरी दिव्यांग व्यक्ती जन्माचं एकमेव कारण असलं तरी आताच्या पाश्चात्य काळात ते कारण होवू शकत नाही. कारण अलिकडील काळात वातावरणाचा अभ्यास केल्यास वा लोकांच्या जीवनशैलीचा अभ्यास केल्यास दिव्यांग व्यक्ती जन्माला जबाबदार असलेले आनुवंशिकता वा

इतर काही कारणं. ही कारणं केव्हाच कालबाह्य झालेले आहे. आता नवी कारणं पुढे आलेली आहेत. ती कारणं आहे आपलं खाणपान. आज आपलं खाणपान बरोबर नाही. चीनसारख्या इतरही प्रगत देशात कोणते कोणते प्राणी खातात यावर बंधन नाही. साप, गोम, पाली इत्यादी. अलिकडील काळात तर विवाह सोहळ्यात लोकांना स्वादिष्ट वाटावं म्हणून केमीकल टाकली जातात. मुलं वा मुली बर्गर, पिज्जा आवडीने खातात. न्युडल्स, मंचुरियन हेही पदार्थ आवडीने खाल्ले जातात. शिवाय चिकन फॉक्स सारखे पदार्थही खाल्ले जातात. असे पदार्थ बनवितांना जे केमीकल वापरले जाते. ते केमीकल शरीराला व्याधीकारक असते. असे पदार्थ खाल्ल्यानंतर ते पदार्थ गर्भाला हानीच पोहोचवत असतात. ज्यातून दिव्यांग जीवही जन्मास येवू शकतात ही शक्यता नाकारता येत नाही. मोठमोठ्या रेस्टॉरेंटमध्ये खाल्ले जाणारे मांस हे काही ताजं नसतं. ते फ्रीजमध्ये केमीकल लावूनच टिकवलं जातं व जशी त्या डिशची आर्डर मिळाली. तसं ते बाहेर काढलं जातं. आपल्याला ते माहीत नसतं व आपण आवडीनं खातो. त्यानंतर ते रक्तात मिसळतं. रक्ताद्वारे गर्भातही जातं व गर्भाला नुकसान करीत असतं. ज्यातून दिव्यांग लोकांचा जन्म होवू शकतो. आता कोणी म्हणतील की गर्भ जेव्हा पोटात होता. तेव्हा तर आम्ही काहीच खाल्लं नाही. परंतु त्यापुर्वी तसे पदार्थ लहानपणापासूनच खाल्ले जातात व ते पदार्थ लहानपणापासूनच गर्भपिशवी बनत असतांना त्यावर परिणाम करुन जात असतात हे विसरता कामा नये.

महत्वाची गोष्ट ही की आपल्या घरी एखादा विकलांग व्यक्ती जन्माला येत असतांना आपल्याला दुःख होते. त्यानंतर आपण आपल्या नशिबाला दोष देत असतो. कोणी त्याला आनुवांशिक भोग समजतात तर कोणी त्याला आपण केलेल्या

कर्माची फळं समजतात. परंतु हे तेवढंच खरं जरी असलं तरी शंभर प्रतिशत ते खरं नाही. कारण त्याला जबाबदार असतं आपण घेतल्या गर्भनिरोधक गोळया व गर्भ राहण्यापुर्वीचा काळ. गर्भ जर पोटात गर्भधारणेच्या अनुकूल काळात म्हणजे वयाच्या अठरा ते पंचवीस दरम्यान राहात असेल तर बाळ सुदृढ राहीलच यात शंका नाही. कारण तेव्हा गर्भाच्या वाढीस अनुकूल वातावरण शरीरात असतं. ते वातावरण गर्भाला विकलांग होण्यापासून कदाचीत वाचवत असतं. एरवी विकलांग वा दिव्यांग न बनविण्याला पोषक असतं असंच म्हणता येईल. यात शंका नाही.

दिव्यांग मूल जन्मास येतं हा दोषच आहे. परंतु तो दोष टाळता येवू शकतो. आपण आपलं खानपान व्यवस्थीत केलं तर... गर्भाक्षयाला न पटणारे पदार्थ आपण त्याज्र करायला हवेत. शिवाय अन्नात मांस वा पिज्जा बर्गर घेण्याऐवजी हिरव्या पालेभाज्या, कडधान्ये यांचा समावेश केलेला बरा. तसाच मुलींचा विवाहही एकवीस ते पंचवीस या दरम्यानच करायला हवा. जेणेकरुन विकलांगतेला पोषक वातावरण निर्माण होवू शकणार नाही. हे तेवढंच खरं.

गुरुचा तो मित्र. त्याची मुलगी जरी दिव्यांग असली आणि त्याला जरी तिचा जन्म आनुवंशिक वाटत असला तरी तो तिचा जन्म त्याचं खानपान व उशिरा राहिलेला गर्भ. यातून झालेला होता. गर्भ न राहण्याचं कारण असेल गर्भनिरोधक गोळया. कारण त्यांचं बऱ्याच दिवसांपासून प्रेम होतं एकमेकांवर. त्यावेळेस कधीकाळी गर्भनिरोधक गोळयांचा वापर झालाच असेल ही शक्यता नाकारता येत नव्हती. शिवाय त्या गर्भनिरोधक गोळयांचं तत्व रक्तात मिसळलंच असेल आणि रक्ताद्वारे गर्भपिशवीत. ज्यातून पुढील काळात गर्भपिशवी आंकृचन पावली असेल व तशी संतती जन्मास आली असेल. शिवाय त्यांचा विवाह झाल्यानंतर दोन तीन

वर्ष त्यांनी तंग वातावरणात घालवलीत. जेव्हा त्याला अपेंडीक्स झालं होतं. त्या काळात चिंताच होती. शिवाय अपेंडीक्स सुधारणा जेव्हा झाली, तेव्हा त्याच्या पत्नीचं वय गर्भधारण करण्याचं नव्हतंच. त्यामुळंच गर्भाला अनुकूल असणारं पोषक वातावरण किर्तीला मिळालं नसेल व त्याचा परिणाम म्हणून किर्तीला दिव्यांग मुलगी जन्मास आली असेल. ही शक्यता नाकारता येत नाही.

किर्ती व सागरला जरी दिव्यांग मुलगी जन्माला आली असली तरी सागर आणि किर्ती दुःखी नव्हतेच. ते खुशच होते. कारण त्यांची मुलगी नृत्यांगणा बनली होती. त्यामुळंच किर्तीची व सागरची ती अवस्था पाहणारा गुरु. त्याला आपली जीवनगाथा आठवली व तोही आपल्या जीवनगाथेचा एकेक पैलू आठवू लागला होता.

आधार कादंबरी भाग दोन

गुरुला आठवत होता तो गतकाळातील प्रसंग. ज्यावेळेस त्यानं विनोद केला होता व त्यानंतर त्याच्याच जीवनाचा विनोद झाला होता. कारण तसा विनोद जरी त्यानं कोणाला उद्देशून केला नसला तरी ती गोष्ट ज्या मुलीसोबत केली होती. तिचं मन दुखावलं गेलं होतं. ज्यातून ती त्याला वाईटच बोलली होती.

विनोद हा कोणाला केव्हा दुखवेल ते काही सांगता येत नाही. विनोद जो करतो, त्याचा कोणाला दुखविण्याचा हेतू नसतोच आणि तो कुणाला दुखवत नाहीच. त्याचा एकमात्र उद्देश असतो, ते केवळ इतरांचं मनोरंजन करणं. परंतु नाण्याला जशा दोन बाजू असतात. तशाच दोन बाजू विनोदाच्याही असल्यानं ज्याच्याशी विनोद केला जातो. त्याच्या मनात नक्कीच संभ्रम निर्माण होतो व संबंध तुटू शकतात. म्हणूनच कोणताही विनोद न केलेला बरा.

विनोदाचे अनेक प्रकार आहेत. शाब्दिक विनोद (कोट्या), शारीरिक विनोद (अंगविक्षेपातून होणारे), प्रासंगिक विनोद वगैरे वगैरे. विनोदबुद्धी कमी असण्याला दोन कारणे आहेत. एक म्हणजे वाचनाचा अभाव आणि दुसरे म्हणजे समोरच्या

व्यक्तीच्या बोलण्याकडे झालेले पूर्ण दुर्लक्ष. यातूनच विनोदातून समस्या निर्माण होत असतात.

विनोद...विनोद करणं काही वाईट नाही. विनोदात एवढी ताकद आहे की विनोदानं बऱ्याचशा आजारावर नियंत्रण करता येवू शकतं. तसंच आजाराचं पानीपत करता येवू शकतं. त्यातच दुःखावर मात करुन विजयही मिळवता येवू शकतं. याबाबतीत एक प्रसंग सांगतो.

गुरु...गुरु आजपर्यंत तरी गंमत करीत करीत जीवन जगत आला होता. त्याला कळलं नव्हतं की जीवनात विनोदाला किंचीतही स्थान नाही. जो विनोद करतो. त्याचाच विनोद होवून जातो.

त्याला एक प्रसंग आठवत होता. तो प्रसंग होता. त्यानं एका मुलीशी विनोदी शैलीत बोलणं. त्याला वाटत होतं की आपण जर विनोदी शैलीने बोललो तर दुसऱ्यांना मजा येते व तेवढाच आनंद मिळतो. त्यालाही आणि आपल्यालाही. परंतु तो त्याचा भ्रम होता. त्याच्या विनोदीपणाचा दुसऱ्यांना रागच येत होता. काय कारण होतं त्यात. ते त्याला कळत नव्हतं.

गुरुचीही ती एक मैत्रीण होती की जी पार्लर चालवत होती. तिला त्यानं विनोदी शैलीने म्हटलं होतं की किती नवरदेवांना आज सजवून दिलं. त्यावर तिला राग आला होता व एवढा राग आला होता की ती म्हणाली होती,

"आता आपले विद्यार्थी जीवन राहिलेले नाही. आता आपण पालक झालो आहोत आणि आपली मुलं ही आता विद्यार्थी आहेत. म्हणून मेसेज करतांना मर्यादेच भान ठेवावे. जसे मेसेज मला करतो ना, तसे तू वहीनीशी बोल किंवा मेसेज कर. तुला

गृहस्थ जीवन चांगल कळेल. मी काही नवरदेवच सजवत असते का? या तुझ्या बोलण्यावरुन तुझी काय मानसिकता आहे हे समजायला येते."

विनोद...विनोद हा कधी कधी अंगाशी येत असतो याचं ते उदाहरण आहे. महाभारतात असाच विनोद झाला. त्या घटनेला विनोदच म्हणता येईल. कोणी त्याला विनोद मानत नाहीत. परंतु तो प्रसंग म्हणजे एक प्रकारचा विनोदच होता.

महाभारताचं युद्ध सुरु होतं. सर्वच रथी महारथी एकमेकांवर बाणांचा वर्षाव करीत होते. प्रत्येकजण आपल्या आपल्या परीने एकमेकांशी युद्ध लढत होते. कोणीही कमजोर वाटत नव्हता व कोण युद्ध जिंकेल हेही काही सांगता येत नव्हतं. गुरु द्रोण तर एवढे शक्तीशाली वाटत होते की ते जर जीवंत राहिले तर उद्या आपला निश्चितच पराभव होईल. असं पांडवांना वाटत होतं. अशातीलच तो महाभारतातील एक प्रसंग. महाभारतात एक प्रसंग असा की त्या प्रसंगात पांडवांनी एक योजना बनवली व योजनेनुसार ठरवलं. आपण विनोद करायचा. विनोद हा की आपण अश्वत्थामा मारला गेला हे ओरडून सांगायचं. मग गुरु द्रोण शस्त्र टाकेल. त्यानंतर तो जेव्हा शस्त्र टाकेल. तेव्हा त्यांची हत्या करायची.

तो विनोदच होता. परंतु त्या विनोदात युद्धाच्या योजनेची झालर होती. अश्वत्थामा मारला गेला हे कळताच गुरु द्रोणाचार्यनं आपले शस्त्र त्यागले व ते प्रत्यक्ष सत्य बोलणाऱ्या युधिष्ठिराकडे आले व त्यांना विचारलं की प्रत्यक्ष कोण मरण पावलं. माझा मुलगा अश्वत्थामा की प्रत्यक्ष हत्ती अश्वत्थामा? तद्नंतर युधिष्ठिर बोलले, 'नरो वा कुंजरवा' अर्थात नर आहे की कुंजर आहे हे मला माहीत नाही. परंतु अश्वत्थामा मरण पावला ही बाब सत्य आहे. मग काय, गुरु द्रोणांना वाटलं की प्रत्यक्ष

माझाच मुलगा मरण पावलेला आहे. आता शस्त्र हातात ठेवून काय उपयोग? ते शस्त्र हातात न घेता विलाप करीत राहिले. त्याच संधीचा फायदा घेवून पांडवाच्या पक्षातील धृष्टधुम्ननं गुरु द्रोणाचार्यची हत्या केली. यात महत्वाची गोष्ट ही की विनोदानं नेमकं काय होवू शकतं याची कल्पनाच येते.

विनोद हा आनंददायी जीवन जगण्याची शैली आहे. विनोद जर जीवनात नसेल तर आनंद मिळवता येत नाही. आनंदानं जगता येत नाही. परंतु कधी कधी त्याचा एवढा अनर्थ होतो की अर्थाचे बेअर्थ होतात. विनोद करणाऱ्याला काय बोललो ते कळत नाही. मग चांगले नातेही संपुष्टात येतात. चांगले मित्र तुटतात. कारण त्यांना रागच आलेला असतो. कोणाची विनाकारण हत्याही होते. एकंदरीत सांगायचं झाल्यास माणसाची अवस्था नरो वा कुंजरवा अशीच होवून जाते. कारण एकाच शब्दाचे दोन अर्थ निघत असतात. जसे नभ या शब्दाला अनेक अर्थ आहेत. नभाला कोणी ढगही म्हणू शकतात. कोणी त्याला आभाळही म्हणू शकतात. धरणीला कोणी धरा, कोणी जमीन, कोणी पृथ्वी देखील म्हणतात. तसंच विनोदाचं आहे. विनोदाचेही असेच अनेक अर्थ निघू शकतात. समोरचा जसा अर्थ काढेल तसा. मग त्यावर पुढच्यानं जरी तशा अर्थानं विनोद केला नसेल, तरी ज्याचेवर तो विनोद केल्या गेला, तो त्याला असलेला अपेक्षीत अर्थ काढून संतापतो. तो विनोद न समजल्यानं त्याचा परिणाम मग जो विनोद करतो, त्याची गाथापेढी काढण्यात होतो.

विशेष सांगायचं म्हणजे विनोद हे आपल्या जगण्याची जीवनशैली आहे. ते आपल्या जीवनात मनोरंजन निर्माण करीत असतं. मनोरंजन करण्यासाठी आपण टिव्ही पाहतो. मोठमोठ्या हास्याच्या कार्यक्रमाला जातो. कितीतरी पैसा खर्च करतो

असा विनोद ऐकण्यासाठी व आपलं मनोरंजन करुन घेण्यासाठी. परंतु कधीकधी निःशुल्क मिळत असलेले विनोद आपल्याला पचत नाही व त्याचा बाऊ होतो. ज्यातून नातं संपतं. कारण जो विनोद निर्माण होतो. त्यात काही असेही शब्द असतात की जे शब्द...त्याचे दोन अर्थ निघत असल्यानं ते बोचतात किंवा बोचू शकतात.

महत्वपुर्ण गोष्ट ही की विनोद हा समजून घेण्याची गरज आहे. तो समजून घ्यावा व त्यानुसार आपण वागावं. त्याचा बाऊ करु नये. तरच सुखशांतीनं जगता येवू शकतं. नाहीतर विनोद न समजल्यानं आपल्याच मनात संभ्रम निर्माण होवून आपलंच सुख हरवतं. तसं होवू नये म्हणून विनोदाशी संगत केलेली बरी. विनोदात्मक जगलेलं बरं. तसंच विनोदातूनच स्वतःच मनोरंजन केलेलं बरं. कारण तसं केल्यानं जे सुख प्राप्त होतं. ते सुख मोजता येत नाही. तेच सुख आपल्याला अनेक असाध्य अशाच रोगांपासून वाचवत असते. हे तेवढंच खरं आहे. म्हणूनच विनोदावर विश्वास केलेला बरा. त्याला गुन्हा ठरवू नये व तो करणाऱ्यालाही गुन्हेगार ठरवू नये. याचाही विचार करण्याची गरज आहे. विशेष म्हणजे विनोद हे एकप्रकारे जगण्याचं साधनच आहे नव्हे तर तत्वज्ञानच. याबद्दल न बोललेलं बरं. ते तत्वज्ञान समजून घेण्याची गरज आहे व अंगीकारण्याची गरज आहे यात शंका नाही.

ज्योतीचं जीवन. किर्तीचं जीवन तसंच गुरुचं जीवन यात काहीशी समानता होती. ज्योतीला एकच मुलगी होती. ती एकच मुलगी त्यांनी स्वखुशीनं ठेवली होती. दुसरं अपत्य त्यांनी होवूच दिलं नव्हतं. ती सक्षम व सशक्त होती. किर्तीची मुलगी दिव्यांग होती आणि गुरुचीही. तिलाही प्रॉब्लेमच होताच.

त्या मुली. ज्योतीची एक मुलगी सोडली तर बाकी दोघांच्याही मुली समस्याग्रस्तच होत्या. तरीही त्यांनी एकच अपत्य ठेवून नियतीचं स्वागतच केलं होतं. नियतीला दोष दिला नव्हता तर एकाच अपत्याला सर्वतोपरी सुख मिळालं या भावनेनं त्यांनी एकच अपत्य ठेवलं होतं आणि हे एकच अपत्य ठेवत असतांना त्यांनी भविष्याचाही विचार केला होता. भविष्यात त्यांनाही दुःख वाटू नये तर त्यांच्याही वाट्याला अपार सुख यावं असंच वाटत होतं त्यांना.

ज्योतीला तिच्या बालपणात झालेल्या वेदना, किर्तीला तिच्या बालपणात झालेल्या वेदना ऐकून गुरुला आठवत होतं त्याच्या पत्नीचं जीवन. त्याची पत्नीही त्या दोघींसारखीच बदनशिबीच होती. त्याच्या पत्नीचं नाव आरती होतं.

आरती जेव्हा दहावी झाली, तेव्हा तिच्या आईची दृष्टी गेली होती. ती आंधळी झाल्यावर तिच्याही डोक्यात फरक पडला होता. वडीलही अपंगच होते. ते चालक होते व त्याच दरम्यान एकदा झालेल्या अपघातात त्यांच्या पायाला लागलं होतं. ते जास्त गाडी चालवू शकत नव्हते.

आईची दृष्टी जाणं, त्यातच बाबांचा झालेला अपघात. शिवाय सुदैवानं दहावी पास होणं. परंतु जवळ पैसा नसल्यानं काय करावं हा विचार आरतीला होता. घरात एक मोठा भाऊही होता. त्याचा विवाह झाला होता व आलेली गंभीर परिस्थिती पाहून तो आपली पत्नी व मुले घेवून किरायाच्या घरी राहायला गेला होता. अशातच घरी उपासमार होत होती व ती उपासमार पाहून आई बडबड करायला लागली होती.

आरती ही मधली मुलगी होती त्या घरातील. अशातच मोठ्या भावानं वेगळी चूल मांडल्यानं घराची सर्व जबाबदारी आरतीवर येवून ठेपली. त्यातच लहान बहिण.

ती बहिण नुकतीच आठवीत गेली होती. तिचंही शिक्षणपाणी होतंच. शिवाय घरात खायला लागणारा पैसा. त्यातच घरातील कपडे लत्ते.

ज्योतीचं ठीक होतं. कारण तिच्या बहिणीला म्हणजे पुजाला दहावीतच असतांना रेल्वेमध्ये सरकारी नोकरी लागली होती. किर्तीच्याही घरी तिची आई कामाला जात असे. त्यातच आता बहिणही. परंतु आरतीच्या घरी मात्र कामाला जाणारं कोणीच नव्हतं. अशातच ती दहावीही पास झाली होती.

आरतीचे मायबाप दोघंही जिवंत होते. परंतु दोघंही घरीच बसलेले होते. अशातच आरती हिंमत हारली नाही. ती लढत होती परिस्थितीशी. त्यानंतर तिनं तिच्याच वडीलाच्या एका मित्राच्या एसटीडी वर नोकरी पकडली.

आरतीनं एस टी डी वर नोकरी पकडली. त्यानंतर तिनं अकरावीचा फॉमही भरला व तिनं महाविद्यालयात जाणं सुरु केलं. मात्र या धुमश्चक्रीत तिला फारच त्रास झाला. आता ती सकाळी स्वयंपाक करुन दिवसभर महाविद्यालय करीत असे व रात्रीला एस टी डी वर राहात असे. त्यानंतर एस टी डी वरुन घरी येवून स्वयंपाक करीत असे. कधीकधी सायंकाळचा स्वयंपाक तिची बहिण करुन घेत असे.

आरती दिवसरात्र खपत असे. कधीकधी तिला रडूही कोसळत असे. परंतु ती आपलं रडू कोणाला दाखवत नव्हती. ती शोषत होती त्या वेदना. परंतु ना कोणासमोर हतबल होत होती. कधीकधी तिला एस टी डीत नोकरी देणारा तिच्या वडीलाचा मित्र तिला मदत करीत असे. तो तर एवढा तिचा बॉडीगार्ड बनला होता की तिच्या तारुण्यावर कोणी शिंतोडेही उडवू शकत नसत.

सहा महिने झाले होते. वडील कसेबसे दुरुस्त झाले. त्याचबरोबर ते थोडेसे चालायला लागले होते. घाव पुर्ण भरले नव्हतेच. अशातच त्यांनी गाडीवर जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी एक गाडी पाहिली व ते एका ट्रकवर आरुढ झाले.

आरतीचे वडील पुर्ण बरे झाले नव्हतेच. अशातच त्यांनी एका गाडीवर नोकरी पकडली. त्याचं कारण होतं घरची नाजूक परिस्थिती. त्या परिस्थितीनं त्यांना कामासाठी मजबूर केलं होतं. अशातच ते आपल्या पायाच्या जखमेला बँडेज करीत व कामाला जात असत.

त्या सर्व भानगडी पोटासाठीच होत्या. त्याचा परिणाम हा झाला की ते घाव पुर्णतः बरे होण्याऐवजी ते चिघळत गेले. परंतु आरतीच्या वडीलांनी त्याची तमा बाळगली नाही. अशातच आरतीच्या आईला एका गंभीर आजारानं घेरलं. परंतु त्याही परिस्थितीत आरती शिकत होती आणि तिची बहिणही शिकत होती. घरची सर्व कामं करुन. आरती आताही एस टी डी वर जात होती.

आरती शिकत होती. हळूहळू आरती शिकून शिक्षीका बनली व एका शाळेत रुजू झाली. परंतु दैव काही तिचं खुललं नव्हतं. शाळेच्या संस्थाचालकानं आश्वासन दिलं होतं की तो तिला सरकारी नोकरी देणार. परंतु सरकारी नोकऱ्या काही झाडाला लागल्या असतात का की तिला लगेच नोकरी मिळेल.

आरती ज्या शाळेत लागली. तिथं तिला फक्त पाचशेच रुपये वेतन मिळायचं. ज्या वेतनातून तिचा स्वखर्च चालायचा. अशातच काळानं गिरकी घेतली व पुन्हा तिच्या वडीलांच्या पायाची जखम मोठी झाली. आता वडील कोणतंच काम करु शकत नव्हते.

वडील कोणतंच काम करु शकत नव्हते. आता पुन्हा एकदा सर्व जबाबदारी आरतीवर आली. घरची परिस्थिती पुन्हा एकदा नाजूक झाली. पोटाचा प्रश्न खऱ्या अर्थानं निर्माण झाला. पोटासमोर आईच्या औषधाचा खर्च बंद झाला. मग काय, जे व्हायचं तेच झालं. औषध न मिळाल्यानं एक दिवस आई मरण पावली व आरतीसह संपुर्ण परीवारावर दुःखाचा डोंगर कोसळला. याच दरम्यान आरतीची बहिण स्टॉप नर्सच्या प्रशिक्षणाला लागली होती. तिला महाविद्यालयात स्टॉयफन मिळत असे व तिच्या शिक्षणाचा खर्च त्यावर भागत असे.

आरतीची आई मरण पावली होती. लाचार असलेली आरती आपलं दुःख कोणाला सांगू शकत नव्हती. काळजावर तिच्या पहाडच कोसळला होता. परंतु त्या दुःखाचा तिनं बाऊ केला नाही. अशातच तिची मुलाखत गुरुशी झाली.

गुरु तिच्याच शाळेत असलेला एक गृहस्थ. तोही शिक्षक होता. सर्वसाधारण कुटूंबातून आलेला गुरु. गुरुला सुरुवातीला तिची परिस्थिती दिसलीच नाही. परंतु तरीही त्यानं तिला विवाहासाठी ऑफर दिली होती. परंतु ती आपला विवाह कसा करणार? तिला प्रश्न होता की येणारा तिचा पती तिच्या वडीलाची सेवा करेल काय? तसा प्रश्न तिनं ना गुरुशी बोलून दाखवला. फक्त एवढंच म्हटलं की मी सध्याच विवाह करु शकत नाही आणि गुरुही किती दिवस तिची वाट बघणार. त्यानं आपला विवाह केला होता व तो मोकळा झाला होता.

गुरुचे काही दिवस बरे गेले. काही दिवसानंतर गुरुच्या संसारात वितुष्ट आलं. त्याची पत्नी म्हणजे मायबापाची लहान कन्या. तशा त्या मुलीच होत्या. शिवाय ती सर्वात लहान असल्यानं जास्त लाडाची. मग काय, तिचं म्हणणं होतं की तिच्या

सासूला वृद्धाश्रमात टाक व तिच्या माहेरी राहायला चाल. तशी ती भलतीच अट. मग काय, गुरुनं ते ऐकलं नाही. त्यामुळंच की काय, ती त्याला सोडून गेली व इथंच गणित जुळलं.

गुरु आपल्या पत्नीला आणण्यासाठी बराच प्रयत्न करु लागला. परंतु ती येईल तेव्हा ना. तशी त्याला तिची फारच आठवण यायची. जीव कासावीस व्हायचा. परंतु उपाय नव्हता. अशातच तीन चार महिने गेले.

ते तीन चार महिने झाले असतील. पत्नी जी माहेरी जावून बसली. ती यायला खाली नव्हती. गुरुनं सारे प्रयत्न करुन पाहिले. परंतु सारे व्यर्थ गेले. ते पाहून गुरुला अचानक आठवली आरती. जिला त्यानं विवाहापुर्वीच विवाह कर म्हटलं होतं. तशी तिची परिस्थितीही आठवायला लागली होती. ती मृत झालेली आई व तो लंगडा असलेला बाप. ती दयनीय परिस्थिती. त्यातच भाऊ भावजेचं तिला सोडून जाणं. सारं काही आठवत होतं. शेवटी त्यानं उपाय काढला व एक दिवस हिंमत करुन गुरु तिच्या घरी गेला.

गुरु आरतीच्या घरी गेला होता. त्यानंतर त्यानं तिची विचारपुस केली व आपलं रडगाणं सांगीतलं व म्हटलं की त्याला आता सारखी त्याच्या पत्नीचीच आठवण येते. घरी करमत नाही. घर खायला धावते. काय करावे.

आरतीही तेच बोलत होती. शेवटी आरती म्हणाली,

"नसेल करमत तर याल माझ्या घरी. मलाही घरी करमत नाहीच."

आरती व गुरु. दोघंही दुःखीच होते. तसं दोघांचंही सुत जुळलं होतं. मग काय, गुरुला तिची गरज वाटली व तिला गुरुची गरज वाटली. त्यानंतर गुरु तिच्या घरी

यायला लागला. तिला मदत करायला लागला. तिही त्याचे घरी जायला लागली व तिही त्याला मदत करायला लागली व अचानक त्यांच्यात प्रेम निर्माण झालं. मग प्रश्न निर्माण झाला विवाहाचा. विवाह करणार कसा? आपला तर घटस्फोटच झालेला नाही. शेवटी ठरवलं की लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायचं.

लिव्ह इन रिलेशनशीप. विवाह न करता? ते शक्य वाटत नव्हतं. शिवाय प्रश्न होता की तिच्या वडीलाला पोषणार कोण? गुरुनं पोषण्याचं आश्वासन दिलं. परंतु तरीही लिव्ह इन रिलेशनशीप मंजूर नव्हती तिला. जर विवाह न करता मुलं झाली तर...त्याला समाज कसा स्विकार करेल. प्रश्न मोठा गंभीर होता. राजरोषपणानं विवाह करताच येत नव्हता. शेवटी ठरलं, लपूनछपून विवाह करायचा. मग लपूनछपून विवाह झाला. परंतु आता विवाह झाला असला तरी प्रश्न संपलेला नव्हता. प्रश्न होता गुरुच्या आईचा. कारण गुरुची आई सध्या जिवंत होती व ती असतांना आरतीचे वडील त्याच्याकडे येवून राहायला तयार नव्हते. काय करावं हा विचारच होता. अशातच गुरुची पहिली पत्नीही त्याचेवर पाळत ठेवून होती व एक दिवस तिला कळलं. तिला कळलं की गुरुनं दुसरा विवाह केलाय. मग काय, तिची तारांबळ उडाली. ती विचलीत झाली व विचार करु लागली की मी असतांना हा विवाह झालाच कसा? तशी ती त्याचेकडे आली. म्हणाली,

"आपण विवाह केलात."

"होय."

"मी असतांना?"

"तुला यायला कोणं मनाई केली?"

"म्हणजे?"

"म्हणजे आताही तू येवू शकतेस."

"तू छप्पन बायका केल्या तरीही."

"छप्पन काय, तू सत्तावनवी समज."

"तेच काम आहे का?"

"मग नसेल जमत तर जा इथून. सुरुवात काय मी केली होती का. तुला मी जा म्हटलं होतं काय?"

शब्दावर शब्द वाढत जात होते. अशातच शेवटी ती म्हणाली,

"मला आता तुमच्याकडे राहायचं नाही. मला घटस्फोट हवाय."

"ठीक आहे. तू जसं म्हणशील तसं."

तिनं घटस्फोट मागीतला व रितीरिवाजानुसार गुरु तिच्या बंधनातून मोकळा झाला. परंतु दुर्भाग्यानं गुरुला सोडलं नाही. दुर्भाग्य असं की ते त्याच्या मुलीच्या जीवावर बेतलं. घटस्फोटाच्या पुर्वीच त्याला मुलगी झाली होती. ती जेव्हा गर्भात होती. तेव्हा नाना तऱ्हेचे विचार त्याच्या मनात होते. त्यातच काही विचार त्याच्या पत्नीच्याही मनात असतीलच. तेच विचार शुभद्रेच्या गर्भात असलेल्या अभिमन्यूसारखे आरतीच्या पोटात असलेला गर्भ ऐकत होता. तसं पाहता शाळेतील मुख्याध्यापकही बरोबर नव्हता. त्यानं आरतीला आरामाची संधीच दिली नव्हती. त्यामुळंच संपुर्ण नऊ महिने आरामच झाला नव्हता.

आरतीची नोकरी सुरुच होती. अशातच एके दिवशी पोट दुखून आलं व तिला मुलगी झाल्याचं डॉक्टरांनी सांगीतलं. परंतु काही क्षणातच दिसलं की तिची आतडीच तिच्या छातीच्या कप्प्यात गेलेली आहे व तिला श्वास घ्यायला अडचण येत आहे. मग काय, वेळीच ऑपरेशन केलं तर ठीक. नाहीतर ती केव्हाही प्राणास मुकू शकते.

विचारांचा अवकाश. तो काळ असा होता गुरुसाठी की त्याचेजवळ पैसाच नव्हता. लोकं म्हणत होते की खाजगी इस्पितळात ऑपरेशन करावं. परंतु कमीतकमी दोन लक्ष तरी रक्कम लागेल. साळभाऊ म्हणत होता. घर विकून टाक. परंतु सगळा विचार गुरु करीत होता. प्रसंगी घरही विकलं आणि नाहीच वाचली मुलगी तर...तेलही गेलं, तूपही गेलं आणि हाती धुपाटणं यायचं. नाही, नाही. आपण सरकारी रुग्णालयात हिचं ऑपरेशन करायचं.

गुरुनं ऑपरेशनची दिशा ठरवली. सरकारी रुग्णालयात ऑपरेशन करायचं ठरवलं. परंतु ते सरकारीच रुग्णालय. तिथं लवकर उपचार होईल तेव्हा ना. त्याला दिरंगाई लागत होती. डॉक्टरांचं म्हणणं होतं, एवढं लहान वय. वय नव्हे तर दिवस. ऑपरेशन केलं तर बाळ मरुन जाईल आणि गुरुचं म्हणणं होतं, जेही होईल, ते नशिबानं होईल. आधी ऑपरेशन करावं.

गुरुची दाणाखिचडी मचत होती. मुलगी सरकारीत भरती होती व तिची आई खाजगीत. मुलगी वर शिक्यावर होती लटकलेली. जिथं गुरु होता. सलाईन लावली होती पायाला. डॉक्टरचं म्हणणं होतं, पाय हलू द्यायचा नाही. पकडून ठेवायचा. काय करावं सुचत नव्हतं. सलाईन जर ब्रेक झाली तर मुलगी जगणार नाही. परंतु त्याही

काळात ते इवलंसं बाळ त्याला हिंमत देवून गेलं. त्या सलाईन मधून डॉक्टर इंजेक्शन देत होते इतर बाळांना. तेव्हा ती बाळं रडत होती आणि गुरुचं बाळ रडत नव्हतं. तीच हिंमत. त्याच हिंमतीच्या भरवशावर गुरु त्यावेळेस तब्बल सहा दिवस झोपलाच नाही. दैवानं आणि देवानं त्याची झोप पळवून नेली होती लक्ष्मणासारखी. लक्ष्मणाकडे निद्रादेवी जेव्हा आली. तेव्हा तिनं म्हटलं की मला जागा दे. लक्ष्मणानं सरळ उत्तर दिलं होतं की आता मला प्रभू श्रीरामाचे काम करायचे आहे. मी जर तुला जागा दिली तर प्रभू श्रीरामाचे काम मला करता येणार नाही.

ते सहा दिवस अजुनही गुरुला आठवत होते. ते आठवले की गुरुच्या अंगावर आजही रोमांच उभे राहत होते. ते त्याच्या शाळेतील मुख्याध्यापकाचे बोलणे आठवत होते त्याला. तो म्हणत असे की त्या शाळेतील मुलांचे नुकसान होत आहे. ते आधी पाहा. ही जगणार तरी आहे का? अन् मरण पावलीच तर दुसरी पैदा करता येईल. परंतु विद्यार्थ्यांचं जर नुकसान झालंच तर ते कधीच भरुन निघणार नाही. तेव्हा अतिशय राग यायचा. परंतु गुरु तेव्हा ते आपलं प्रारब्धच आहे असं समजून त्या गोष्टी सोडून द्यायचा.

दिवसामागून दिवस जात होते. रात्र अन् दिवस एकच वाटत होता. ना शौचालयात जाता येत होतं. ना जेवन नीट करता येत होतं. अन्न गोड वाटत नव्हतं. काय करावं सुचत नव्हतं. अशातच सहा दिवस निघून गेले व त्याची पत्नी तिथं आली. आता मात्र त्याला थोडीशी विश्रांती मिळाली होती.

ते रुग्णालयातील दिवस. ते फार कठीण जात होते. अशातच त्याच्या मुलीला आज एकवीस दिवस पुर्ण झाले होते व तो आज ड्युटीवर गेला होता. त्यानंतर त्याला

यायला नेहमीप्रमाणेच आजही दोनच वाजले होते. अशातच तो जेव्हा रुग्णालयात आला. तेव्हा आरतीनं पुर्ण पिशव्या भरुन ठेवल्या होत्या. कारण विचारताच ती म्हणाली होती की आता आपली मुलगी जगूच शकणार नाही. डॉक्टर म्हणतात की तिला सलाईन लागत नाही. तीनदा डॉक्टरांनी सलाईन लावली. मग काढून ठेवली. सकाळपासून सलाईन गेली नाही बाईच्या पोटात. तशी ती सलाईनवरच जगते. काय करावं. दूध सुद्धा पीत नाही ती. तसं पाहिल्यास ती लहान असल्यानं व डॉक्टरांनी नकार दिल्यावर तिला दूधही पाजता येत नव्हतं.

तो वार मंगळवार होता. दूध बंद. सलाईन बंद. जगण्याचं साधन पार बंद. तसं ते लहानसं बाळ. वरणभात तोंडातून द्यावं तर तेही बंदच. काय करावं सुचत नव्हतं. अशातच त्या मंगळवाऱ्या दिवशी प्रत्यक्ष एक परिचारिका देवीचं रुप घेऊन आली. म्हणाली,

"का बसलात असे उदास? मी मगापासून बघतेय. दररोज आनंदात असता अन् आज?"

त्या परिचारीकेचं ते बोलणं. तशी ती बोलत होती. तोच आरतीनं हळूच डोळ्यातून अश्रू काढले. तशी ती परिचारीका म्हणाली,

"रडू नका. काय झालं ते सांगा. मी प्रयत्न करुन बघते. लागली तर लागली. देवाची इच्छा. जे काम डॉक्टरांना जमलं नाही. ते काम मला जमते का म्हणून बघते. परंतु कोणाला सांगाल नको."

गुरुनं त्या परिचारीकेला आपली सर्व कैफियत सांगीतली. तशी ती आपले प्रयत्न करायला तयार झाली. गुरुनं तशी ती गोष्ट गुप्त ठेवण्याचं आश्वासन दिलं. तशी

त्या परिचारीकेनं सलाईनची सुई लावून दिली व भाग्य खुलले. ती सलाईनची सुई प्रत्यक्ष देवीनंच लावल्यासारखी लागली व त्याच दिवसापासून भाग्य खुलले. आता ती सुई भरपूर दिवस चांगली होती व तेथूनच हाता पायाच्या सर्व नसा खुलल्या होत्या.

आज एक महिना झाला होता. जुना डॉक्टर बदलून नवीन डॉक्टर आला होता. गुरुनं त्याला आपली समस्या सांगीतली होती व म्हटलं होतं की मला एक महिना होत आहे. शिवाय मी कोणत्याही परिणामाला तयार आहे. आपण ऑपरेशन करावं. त्यावर डॉक्टरांनी म्हटलं, "आधी दोन बाटलीत रक्त गोळा करा. मग ऑपरेशन करतो. कारण रक्ताची आवश्यकता आपल्या मुलीला पडू शकते. त्यावेळेस गुरुनं पहिल्यांदाच रक्तदान केलं होतं आपल्या बाळीला वाचवायला. त्यावेळेस फार भीती वाटत होती. कारण त्यावेळेपर्यंत त्यानं कोणालाच रक्तदान केलेलं नव्हतं.

गुरुच्या मुलीचं ऑपरेशन झालं होतं. तिला काही टाके पडले होते. तशी आरती काही दिवस घरी होती. परंतु काही दिवसांनी ती नोकरीवर जाईंड झाली. दोन पैसे पुढे मिळतील. आपणालाही कायम स्वरुपाची नोकरी लागेल या हेतूनं. परंतु गणित चुकलं. संस्थाचालक फारच त्रास देणारा होता. त्यातच मुख्याध्यापकही. तो काम करुन घेत होता. परंतु बदल्यात तो तिला काहीही देत नव्हता. उलट आस दाखवत होता की तिला तो कायम करेल व कायम स्वरुपाची नोकरी लागेल. परंतु ते पोकळ आश्वासनच होतं. मागील दहा वर्षापासून मिळत असलेलं. तसंही त्याच्या मुलीचं मोठंच ऑपरेशन असल्यानं ते टाके थोडेफार दुखत होतेच. तिला आपल्या आईची सक्त आवश्यकता होतीच. शेवटी गुरुनं ठरवलं की आता नोकरीची आस

बाळगायची नाही. नोकरीवर पाणी फेरायचं. मग काय, तसा विचार त्या दोघांनीही पुर्णपणे केला व ती नोकरी सोडली.

काही दिवस बरे गेले. त्यानंतर गुरुनं विचार केला. आपल्या मुलीनं फारच त्रास भोगलाय तिच्या आयुष्यात. आता तिला जास्त दुःख होवू द्यायचं नाही. शिवाय तिचं प्रेमही विभाजीत होवू द्यायचं नाही. आपण एकच अपत्य ठेवायचं. दुसरं होवू द्यायचं नाही. तसा विचार करुन गुरुनं एकच अपत्य ठेवलं. शिवाय दुसरं एक कारण होतं. ते म्हणजे मुलीचा विवाह करतेवेळी लागणार असलेला हुंडा. परंतु आज त्याला कळलं होतं की हुंड्याचा मुकाबला आपण सहजपणे करु. कारण हुंडा घेणारा जसा दोषी. तसाच दोषी असतो देणाराही. अलिकडे जी एस टी प्रकार आल्यानं हुंडा देत असतांना जी एस टी बिलं लागतात. त्यामुळंच आपणही हुंडा मागणाऱ्याला जी एस टी बिलासह हुंडा देवू. जर त्याला मंजूर नसेल तर हुंडा द्यायचाच कशाला?

मुलीच्या विवाहाची चिंता ही त्याला आधीपासूनच सतावत होती. माहीत नव्हतं की काळ बदलणार आहे व मुलींना किंमत येणार आहे. परंतु काळ अगदी झपाट्यानं बदलला होता. भ्रूणहत्येनं शेकडो मुलींची हत्या झाली होती. त्यामुळंच अगदी सहजपणे मुली कमी झाल्या आणि मुलांची संख्या वाढली. आता वाढती मुलांची संख्या पाहून मुलींना भाव आला. हुंडा पद्धती कालबाह्य ठरली व गुरुच्या मुलीच्या विवाहाचा प्रश्न मिटला. मध्यंतरीच्या काळात एक वेगळीच समस्या उद्भवली होती गुरुच्या मुलीला. तिही कालांतरानं दूर झाली. मात्र हा गुरु भोगत असलेला काळ. या काळात गुरुला मार्गदर्शन करायला कोणी आलं होतं. ना कोणी मदतीला आलं होतं. तो स्वतःच आपली पावले टाकत होता आणि स्वतःच स्वतःच्या जीवनाचा रस्ता बांधत होता. आज सगळेच येतात. सगळे त्या बांधलेल्या

रस्त्यावरुन चालू पाहतात. कारण आता तो जीवनाचा रस्ता हा भव्यदिव्य बनलेला आहे. त्यावर आता कोणी घसरत नाही. ना त्या रस्त्यावर आता दगडधोंडे आहेत. आज तो रस्ता एकदम गुळगुळीत झालेला आहे.

काही लोकांना सवय असते, नुसते उपद्रवी कारनामे करायची. आपल्या बुद्धीचा वापर ते अशाही पद्धतीनं करीत असतात. परंतु बुद्धी आहेच तर नुसते उपद्रवी उद्योग करण्याऐवजी कामधंदे करावे. असे काहींचे मत आहे. जेणेकरुन कामात लक्ष लागून सुकार्य कार्य घडेल. उपद्रवी कार्य घडणार नाही. परंतु कधीकधी उपद्रवी कार्य करणंही शुभ लक्षण ठरु शकते. उदाहरणार्थ थॉमस अल्वा एडीसन.

थॉमस अल्वा एडीसन हे असे व्यक्तीमत्व होते की त्यांनी आपल्या शेतीतच असलेल्या धानाच्या गंजीला आग लावली होती. ते उपद्रवीच कार्य होतं. दुसऱ्या त्यांच्या कार्याबाबत बोलायचं झाल्यास त्यांनी रेल्वेत केलेले प्रयोग. त्या प्रयोगानंतरही रेल्वेगाडीला आग लागली होती. परंतु ते जरी उपद्रवी कार्य असलं तरी त्यातून वीज निर्माण होणं हे उपयोगी कार्य घडलं. त्यामुळंच कोणत्याही कार्याला उपद्रवी कार्य म्हणताच येत नाही.

कार्य कोणतंही असो, मग ते उपयोगी असो की उपद्रवी असो, कार्य कार्यच असतं. कधी त्या कार्याला कोणी वाईटही ठरवतात तर कोणी त्या कार्याला चांगलंही मानतात. काल वाईट असलेली कृती कदाचीत प्रदीर्घ कालावधीनंतर चांगलीही वाटू शकते आणि काल चांगली असलेली कृती कोणाला प्रदीर्घ कालावधीनंतर वाईटही वाटू शकते. तसं पाहिल्यास आज राजालाही शिव्या हासडणारे भरपूर आहेत. जरी त्याचं कार्य चांगलं असलं तरी. उदाहरण द्यायचं झाल्यास हापकिन या शास्त्रज्ञाचं

देता येईल. ज्यावेळेस पुण्यामध्ये प्लेग पसरला होता. त्यावेळेस हापकिन या शास्त्रज्ञाने प्लेगवर अथक परिश्रम करुन प्लेगची लस शोधून काढली होती. मग ती लस कोणीच घेईना. कारण लोकांचा त्या लसीवर विश्वास नव्हता. मग काय, आपण सुरक्षीत लस तयार केली आहे, हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सार्वजनीकरित्या आधी स्वतःला इंजेक्शन टोचून दाखवले. ही हापकिनची कृती उपद्रवीच होती. परंतु तद्नंतर तीच कृती जगाच्या दृष्टीनं कल्याणकारी ठरली. दुसरं उदाहरण कैकेयीचं देता येईल. तिनं रामाला वनवासात जा म्हणणं ही कृती उपद्रवीच होती. परंतु त्यातून चांगलं कार्य घडत गेलं. ते कार्य म्हणजे जगाला त्रास देणाऱ्या तमाम घटकाला नष्ट करता आलं. महाभारताचंही तेच उपहासात्मक विनोदाचं उदाहरण म्हणजे नरो वा कुंजरवा. तिही उपद्रवीच कृती. परंतु त्यानं द्रोणाचार्यसारखा व्यक्ती मारला जाणं हे पांडवांच्या दृष्टीनं चांगलं कार्य होतं.

एक महान व्यक्ती जेव्हा घडतो. त्याच्या विचारांची पुनर्बांधणी होते, तेव्हा त्याला बऱ्याच कृती कराव्याच लागतात. कधी कधी त्याला समाज रोषाला समोरे जावे लागते. परंतु तसं जात असतांना जरी त्याचं काही चूकत असेल तर चूक मानून पुढचं पाऊल टाकावंच लागतं. जर ते टाकलं नाही तर कार्यभाग संपतो. समाजात असेही घटक असतातच की जे कोणी पुढे जात असेल तर त्यांची पावले थांबवतात. कोणी जीवंत समाधी घ्यायला भाग पाडतात. नंतर त्यांचा उदोउदो करतात. कोणी इंद्रायणीत संबंध गाथाच बुडवतात. मग तीच गाथा पाण्यावर तरंगत होती हेही सिद्ध करतात.

एक शास्त्रज्ञ वा महान व्यक्ती तोच बनू शकतो की जो समाजाचा रोष सहन करतो. स्वतः संकटं झेलतो. लोकांचे बोलणे ऐकतो आणि आपली वाटचाल करीत

असतो. सावित्रीबाईंनी ज्यावेळेस महिला वर्गाला पुण्यात शिकवलं, तेव्हा तिच्यावर शाळेत शिकवायला जात असतांना शेणाचा व धसकटाचा मारा झाला व तो त्यांना सहन करावाच लागला. याचाच अर्थ महान जर बनायचं असेल तर 'कुत्ते भोके हजार, हाथी चले बाजार' असं वागायलाच हवं महान बनणाऱ्यांनी. कारण कधी कधी कुणाचे समज हे गैरसमज ठरु शकतात. कोणी स्वतःला श्रेष्ठ समजण्याच्या नादात दुसऱ्यांना कनिष्ठ समजत असतात. वैचारीक स्वतंत्र्यता असूनही त्यानं असं वागावं, त्यानं तसं वागावं असं सांगीतलं जातं. मग विचारांच्या फैरी व वादाच्या फैरी झडत असतात. त्यामुळंच त्या गोष्टीचा विचार जास्त न केलेलाच बरा. महाभारतातील युद्धादरम्यान नरो वा कुंजरवा या प्रसंगाच्या विनोदात्मक लेखनावर एक मित्र म्हणतो,

"विनोद म्हणजे निखळ मनोरंजन. समोरच्याला न दुखवता, वाईट न वाटू देता त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे म्हणजे विनोद होय. पण या लेखात विनोदाची सांगड तू चुकीच्या प्रसंगाशी जोडली आहे. कोणाचा मुत्यू किंवा त्याची बातमी हा विनोद असूच शकत नाही. रणांगणावर अश्वत्थामाचा मृत्यू झालेला आहे, हा विनोद नसून ती अफवा होती. हवं तर ते पांडवांनी रचलेलं षड्यंत्र होते. कारण त्यांना माहिती होतं की आचार्य द्रोणाचार्य हे सर्वश्रेष्ठ योध्दा आहे, पण त्याही आधी ते एक वडील आहेत. कारण कोणत्याच पित्याला त्याच्या मुलाच्या मृत्यूची अथवा विरहाची बातमी ऐकून आंनद अथवा विनोद होणारच नाही. तेव्हा तू दिलेला संदर्भ, उदाहरण हे विनोद या शब्दाच्या व्याख्याला अनुसरून नाही. हवं तर तू दुसरं समर्पक असं उदाहरण दे, जेणेकरून ते या लेखाला उचीत न्याय देईल."

विनोदात्मक भाषेत सांगायचं झाल्यास विनोद हे पाहात नाही की पुढील व्यक्ती हा मृत्यू पावलेला आहे की जीवंत आहे. कधीकधी मृत्यूच्या वेळेसही लोकं

विनोद करुन जातात. मग म्हणावं लागतं की चूप बसा, नाहीतर कोणी ऐकून घेईल. विशेष म्हणजे मृत्यू हा घटक सुखदता देणारा असो वा नसो विनोद हा अगदी सहजच घडून येत असतो.

महत्वाचं सांगायचं म्हणजे कोणत्याही गोष्टीला दोन बाजू असतात. आपण फक्त एकच बाजू समजून घेतो. दुसरी बाजू लक्षातच येत नाही. तसेच कोणतेही प्रसंग कुणासाठी थांबत नाही. जर एखादा वाईट प्रसंग घडलाच तर लागलीच त्यावर दोन पाऊल मागं टाकून पुढची वाट धरावी लागते. त्याचा बाऊ करीत कार्य करणं सोडून द्यावं लागत नाही. तरंच जीवनात यशाच्या शिखरावर जाता येतं. पश्चातापाचे अश्रू निरंतर रडत वा गात बसावे लागत नाही. कारण काळ हा कुणासाठीही थांबत नाही. तो पुढे पुढे सरकत असतो. म्हणूनच कार्य करतांनाही माणसानं हेच लक्षात घ्यायचं असतं. मग ते कार्य उपयोगी का असेना वा ते कार्य उपद्रवी का असेना. त्याची समीक्षा समाज करेलच. कारण विधात्यानं बरंवाईट म्हणणाऱ्यांचाही एक वर्ग बनवला आहे. तो वर्ग वाईट म्हणणारच नसेल तर बरंवाईट कसं कळेल. त्यामुळंच कोणी काहीही म्हणोत. आपलं बोलणं, आपलं वागणं, आपलं हसणं, आपलं लिहिणं संपवायचं नसतं. कारण ही सृष्टी आहे. या सृष्टीतही एक दिवस कोणीतरी मरणार आहे आणि कोणीतरी नवीन जन्म घेणारच आहे. म्हणूनच समाजाच्या कोणत्याही कृतीचा बरावाईट परीणाम स्वतःवर होवू देवू नये. कार्य निरंतर करीत राहावे. मग ते कार्य चांगले असो वा नसो. समाज आहे त्याची समीक्षा करायला. तो समाज बरेवाईट म्हणणारच आहे. त्याचा एवढा विचार करु नये व कधीच मनाला लावून घेवू नये. कारण काल रामाची कृती जरी चांगली असली तरी आज त्या रामावरही लांच्छन लावणारे जगात कमी नाहीत. यात शंका नाही. म्हणूनच कार्य

करीत राहावे. स्वतःला कार्यात गुंतवून ठेवावे व पुढे जाण्याची दिशा ठरवावी. मागचे काही घडलेले बरेवाईट विसरावे. जेणेकरुन पुढची पायरी चढता येईल. यशस्वीपणानं आणि तेवढ्याच ताकदीनं पाऊलही टाकता येईल हेही तेवढंच खरं आहे.

गुरुच्या मुलीला आलेली ऑपरेशनची वेळ. ही वेळ त्याच्या शाळेतील मुख्याध्यापकामुळंच आली होती. त्यानं आरती व गुरुला एकाच पाळीत नोकरीची शिप दिली नव्हती. ती एकाच पाळीत देता आली असती. परंतु त्यानं जाणूनबुजून गुरुला त्रास व्हावा म्हणून तशी योजनाच तयार केली होती. शिवाय आरतीलाही आस होती की आपल्याला नोकरी लागेल. आपल्यालाच आधार होईल. परंतु तद्नंतर तिला कळलं की तो आधार नव्हता तर ते एक विघ्न होतं आपल्या आयुष्यात येवू घातलेलं.

ती सकाळी होती आरतीची शाळा व गुरुची शाळा दुपारी होती. शिवाय तो मुख्याध्यापक जेव्हा गुरुची बाळी भरती होती. तेव्हा येवून म्हणायचा,

"ही काय वाचणार आहे का? हिला सोडा व विद्यार्थ्यांचं होणारं नुकसान सांभाळा."

असं त्या मुख्याध्यापकानं म्हणताच गुरुला अतिशय राग यायचा. परंतु त्याला तो ज्योतीसारखाच प्रारब्धच समजून त्यावर कानाडोळा करायचा. आज विशेष सांगायचं झाल्यास जो मुख्याध्यापक गुरुच्या मुलीबाबत असे म्हणायचा. तो आज जिवंत नव्हता. आज गुरुची मुलगी जिवंत होती.

तो महिलादिनच होता की गुरुला मुलगी झाली होती. आज तब्बल त्या गोष्टीला सोळा वर्ष झाली होती व ती बाळी, ते रुग्णालय, त्या रुग्णालयात मिळालेली

ती देवीरुपातील परिचारीका व तो गुरुनं केलेला सर्व संघर्ष, गुरुला आठवत होता व हेही आठवत होतं की ज्या काळात बाळंतिणीला मेव्याचे लाडू खायला मिळायला हवे होते, ज्या बाळंतिणीची त्या काळात काळजी वाहायला हवी होती. ज्या बाळंतिणीला जमीनीवर नाही तर पलंगावर आराम करणं भाग होतं. त्या काळात तिला तिचे अख्खे दिवस रुग्णालयात काढावे लागले, तेही जमीनीवर. ती थंड फरशी अंगाला भेदत होती. तसंच कोणी काळजी घेतली नव्हती आणि काळजी घेईल तरी कोण? ना त्या काळात सासू होती तिला, ना तिची आई. सासू आणि तिची आईही तिला सोडून केव्हाच्याच देवाघरी निघून गेल्या होत्या. त्यातच कोणी तिचे वा त्याचे नातेवाईकही त्या काळात त्यांना मदत करायला आले नव्हते. जसे आज मधमाशासारखे नातेवाईक पोळ्याला चिकटलेले दिसत होते. ते फक्त गोळा झालेल्या परागकणाचा लाभ घेत होते. ते मात्र याचा विचार करीत नव्हते की ते परागकण कुठून आलं असावं? कोणं आणलं असावं? कसं आणलं गेलं असावं? फक्त खाण्यातच मश्गुल होते.

आरतीही एक आईच होती की जिनं मातृत्व जपलं होतं. मातृत्वासाठी ती घरी सुख भोगत राहिली नव्हती. ती आली होती आपल्या बाळीची काळजी घेण्यासाठी. त्यातच तिनं पाहिलं होतं की तिथं बऱ्याचशा महिला अशा होत्या की ज्या महिला बाळाची काळजी घेत नव्हत्या. अशातच कितीतरी बाळ मातृत्वापासून बेदखल झाली होती. अर्थात मरण पावली होती.

आई जेव्हा क्रूर होते? तेव्हा असेच काहीसे प्रसंग घडत असतात. म्हणूनच आई व आईपणाला जीवनात फार महत्त्व आहे आणि आई कितीही कठीण प्रसंग येवो. ती क्रूर होत नाही वा आपलं मत बदलवीत नाही. ती आपल्या बाळाप्रती

अतिशय कर्तव्यदक्ष राहाते. ती आपल्या मुलाचं दुःख पाहू शकत नाही. असं नेहमीच घडतं. वडील हे मुलाशिवाय राहू शकतील. परंतु आई नाही. याबाबतीत एक उदाहरण आहे. एक मुलगी गरोदर होती. तिच्या गर्भात बाळच होतं, अशावेळेस तिच्या पतीनं तिला सोडून दिलं. मग काय, ती आपल्या बाळाचा जीव घेवू शकत नव्हती गर्भाशयात. कारण वेळ निघून गेली होती भ्रूणहत्येची आणि भ्रूणहत्येची भीतीही वाटत होती. मग तिनं ठरवलं की मुलीला जन्म द्यायचा आणि अशी मुलगी कोणाला तरी दत्तक द्यायची. ते बाळ दत्तक द्यायचं ठरवताच तिनं एक ग्राहक शोधला व त्याच्याशी करार केला. करार केला की आपल्याला जेही बाळ होईल. ते त्याला देणार. तसंही त्या दांपत्याला बाळ नव्हतंच. त्यामुळंच ते त्या आईच्या गर्भातील बाळ विकत घेणार होते. कालांतरानं ती मुलगी प्रसूत झाली. तिनं एका गोंडस बाळाला जन्माला घातलं. मग काय, तिला बाळ दाखवण्यात आलं. ते बाळ तिच्या हातात देण्यात आलं. त्यानंतर तिनं ज्या दांपत्याशी करार केला होता. ते आले. परंतु तिनं आपलं बाळ देण्याचं नाकारलं. कारण तिनं बाळाला जन्म देताच तिच्यात मातृत्व भरुन आलं होतं. हे झालं मातृत्वाचं मुर्तीमंत उदाहरण. परंतु असेही काही लोकं असतात की जे बाळाला कचऱ्यात फेकतात. विहिरीत टाकतात. नदीत टाकतात. कधीकधी नवजात अर्भकाला कचऱ्यात कुत्रे छिन्नविछिन्न करतांना दिसतात की त्याची कल्पनाच करता येत नाही. अशावेळेस मातृत्व कुठं हरपतं ते कळत नाही. वरवर गोष्टी सांगणारे भरपूर असतात. मी माझ्या गर्भातील बाळ जेव्हा होईल, तेव्हा देणार. परंतु प्रत्यक्षात बाळ होते, तेव्हा ते देता येत नाही. याला कारण आहे निर्माण झालेली मातृत्व भावना. ती भावना उन्मळून येते. मग बाळ देण्याची इच्छा होत नाही. प्रत्यक्षात जेव्हा वेळ येते. तेव्हा निर्णय काहीसे वेगळेच असतात.

कालचा हाच इतिहास, काल कोणतीच आई आपलं बाळ द्यायला कुचराई करायची. मग तिला कितीही बाळ होवोत. तेव्हा मात्र तिच्या पतीनं सोडल्यानंतरही ती कोणाला आपलं बाळ देत नसे आणि आज आपल्याला कचऱ्यात सापडतात बाळ. मोकाट... कुत्री छिन्नविछिन्न करीत असतांना. अशी बरीच उदाहरणं आहेत. यालाही काही उदाहरणं अपवाद आहेतच. हे विसरुन चालत नाही.

तो महिलादिन होता व त्या महिलादिनी एका पक्षाचं लहानसं पिल्लू रस्त्यावर सापडलं. ते तिथं कसं आलं, कसं नाही हे काही मला माहीत नव्हतं. आजुबाजूला कोणतं झाड नव्हतं ना घरटं. कदाचीत त्या पक्षानं आपल्या पिल्लाला सुरक्षीत ठिकाणी हलवीत असतांना ते पिल्लू त्याच्या चोचीतून सुटलं असेल. त्यानंतर त्या पक्षाला तिथं काही माणसं दिसली असतील व तो पक्षी पळाला असेल, त्या पिल्लाला तसंच मरणाच्या दारात सोडून. म्हणतात की पक्षाच्या पिल्ल्याला हात लावल्यास तो पक्षी त्याला मारुन टाकतो. परंतु सत्य काही वेगळंच आहे. सत्य हे आहे की पक्षी तर सोडा साधी चिमणी देखील आपल्या पिल्लाला मारत नाही. कारण यापुर्वी अशीच दोन पिल्लं सापडली होती व मी त्या पिल्लालाही हात लावला होता. परंतु त्यांना मी जसे दाणे चारत होतो. तसेच दाणे त्या पिल्लांचे मायबापही चारत होते व काही दिवसानंतर ते मोठे होताच त्यांना ते मायबाप घेवून गेले.

ते लहानगं पिल्लू. तसा मला पिल्लं मोठी करण्याचा अनुभव आहेच. परंतु विचार असा येतो की ही तर पक्षी आहेत की ज्यांची मुलं अशी अनवधानानं सुटतात. भीतीनं सुटतात. परंतु माणसाचं पिल्लू? ते का सुटावं भीतीनं? परंतु ते बाळ जेव्हा गर्भाशयात सामावतं. तेव्हा ते मायबापाला, तिला आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्या त्या मित्रालाही माहीत नसतं. फक्त ऐषआराम व मौज म्हणून ते प्रेम असतं. त्यातच

काही दिवसानं जाणवतं की आपण गरोदर राहिलेलो आहोत व त्या गोष्टीला आज तीन चार महिने झालेले आहेत. त्यानंतर ती मुलगी ज्याचेवर प्रेम करते, त्याचेजवळ जाते व त्याला आपली वेदना सांगते की ती गरोदर आहे. त्यानं तिच्याशी विवाह करावा. परंतु तो प्रेमी नकार देतो. अशावेळेस तिला काही सुचत नाही. ती बराच प्रयत्न करते भ्रृणहत्या करायचा. परंतु ती भ्रृणहत्या यशस्वी ठरत नाही व इथंच सारं बिघडतं. मग आपली बदनामी होईल. लोकं काय म्हणतील ही देखील एक प्रकारची भीतीच असते. शेवटी त्याच भीतीनं ती त्या बाळाला जन्म देताच त्याची विल्हेवाट कचऱ्यात लावते व त्याबद्दल त्याची आई मातृत्वाचा विचारच करीत नाही. ती आई क्रूर होते. यात तिला भीती वाटणं साहजीकच आहे. कारण यात बदनामी, त्यानंतर आपला विवाह, आपल्या बहिणभावाचा विवाह हे सारे प्रश्न असतात. त्यामुळंच त्यांच्याबद्दलचा प्रश्न नाही. परंतु आज असं निरीक्षणात येतं की चांगल्या चांगल्या घरच्या विवाह केलेल्या महिलाही पळून जातात दुसऱ्याच बरोबर. तेव्हा विचार येतो की हे मातृत्व कुठं जातं. कुठं हरवतं. काही पोलीस स्टेशन डायरीत कधी असा पती बेपत्ता तर कधी महिला बेपत्ता झाल्याची उदाहरणं नोंदीत दिसतात. विवाहानंतर कुठं जातात त्या आपल्या लेकरांना सोडून. तेच कळत नाही. मग पोलीस स्टेशनला नोंद केल्यावर ती सापडते व तिचं उत्तर असतं की मी स्वखुशीनं आली. मुलांचा ठेका काय मीच घेतला काय? तिचा पतीही कुणाला तरी घेवून पळून गेलेला असतो. तोही सापडतो व म्हणतो. मुलांचा ठेका काय मीच उचलला काय? आता यावर विचार येतो की दोघंही तेच उत्तर देतात. मग मुलांनी जावं कुठं? आज शेल्टर होम असल्यानं ठीक आहे. काल तर ते नसल्यानं हीच लहान मुलं रस्त्यावर भीक मागायची. परंतु ती मोठी असली तर...अन् नवजात अर्भक असले तर...त्यानं कुठं जायचं?

कचऱ्यात? कुत्र्यांचे शिकार होत मरायचं? इत्यादी प्रश्न अनाकलनीय आहेत. याचा विचार होण्याची गरज आहे.

लोकांनी मोठ्या थाटामाटात महिला दिन साजरा केला. स्री स्वातंत्र्याच्या गप्पा मारण्यात आल्या. मुक्त जीवनाचा पुरस्कार करण्यात आला राजा हिंदुस्थानी चित्रपटासारखा. परंतु हे जे मुलं सोडण्याचं विदारक सत्य होतं. याबाबत कोणीच बोललं नाही. हेच का महिला स्वातंत्र्य?

काल चांगोला नावाच्या राणीचं ऐकलं होतं की एका भिक्षुकाला तिनं आपल्या मुलांच्या मस्तकाचं जेवण चारलं होतं. मुलप्राप्तीसाठी वचनबद्ध झाली होती म्हणून. आज मात्र अशा अनेक चांगोला समाजात वावरत असतांना दिसतात की ज्या आपल्या मुलांच्या संपुर्ण शरीराचंच भोजन कुत्र्यांना करवतात. तेही विवाहापुर्वी आणि विवाहानंतरच्या चांगोला आपल्या मुलाचे हाल किती होतील? याचा विचार न करताच पळतात व विवाहबद्ध होतात. काही पहिला पती आवडत नसेल तर दुसरा पती करतात. आपल्या मुलांना घेवून. ज्या मुलांना तिनं केलेला दुसरा पती अजीबात आवडत नाही. ती मुलं वाम मार्गाला लागतात. परंतु आईला त्याचं काहीच लेणदेण नसतं. तिला लेणदेण असतं तिच्या नव्या पतीचं. तो कसाही वागत असला तिच्या लेकरांशी तरी चालतं. त्यामुळं तिला फरक पडत नाही.

समाजाची अशी मानसिकता. जो चांगला असतो, त्यालाच वाईट म्हणणारा हा समाज. त्याचीच मानसिकता रस्त्यावर काढून समाज पावले टाकत असतो व अशी पावलं टाकत असतांना तो समाज महिलादिनही साजरा करतो. परंतु वरील बाबींवर विचार करीत नाही. खरंच महिला सक्षम झाली की अधिकच सक्षम झाली

हा विचारच येतो. जर महिला अशा स्वरुपाची सक्षम होत असेल, जिला आपल्या लेकरांचाही विचार करता येत नसेल तर तिला महिलादिन साजरा करण्याचा अधिकार असावा काय? नक्कीच नसावा. परंतु महिलादिन साजरा करणाऱ्यांच्या यादीत अशाच स्वरुपाच्या महिला आघाडीवर असतात हेही न सांगीतलेलं बरं.

महत्वाचं सांगायचं झाल्यास महिलांनी सक्षम व्हावं. चंद्र सुर्यावर जावं. आपला विकास नक्कीच करावा. परंतु आपल्या लेकरांचाही विचार करावा की त्यांच्यावर माझ्यामुळं आपत्ती तर ओढवणार नाही. जर आपत्ती ओढवत असेल तर तिनं वेडवाकडं पाऊल टाकूच नये. त्यावर बराच विचार करावा. अन् विचार करता येत नसेल तर मुलं जन्मासच घालू नये हे तेवढंच खरं. जेणेकरुन कोणाला म्हणावे लागणार नाही की आई जेव्हा क्रूर होते तेव्हा...

आरतीचा त्याग आजही गुरुला आठवत होता आणि ज्यावेळेस तो आठवायचा. तेव्हा त्याला कसंबसं वाटत होतं. त्याचा जीव कासावीस होत होता.

********** ***************

तो होळीचा दिवस होता. ज्योती होळी खेळत होती. तिनं आमंत्रीत केलं होतं गुरुला व ठरल्याप्रमाणं गुरुही तिच्या घरी होळीच्या फराळाला गेला होता तर पाहतो काय, ज्योती नशेत धृतराष्ट्र होती. त्याला आश्चर्य वाटत होतं की ज्योती एक स्त्री असून नशेची धृतराष्ट्र बनलीच कशी? तसं त्याला वाटलं की आपण काहीही

बोलण्याऐवजी नाश्ता करुन परत यावं. मग विचारु. काय विचारायचं ते. त्यानंतर तो माघारी फिरला. तसे दोन तीन दिवस झाले होते.

दोन तीन दिवस झाले होते. तशी गुरुला परत ज्योतीची आठवण झाली व तो तिला म्हणाला,

"ज्योती, मी तुला त्या होळीच्या दिवशी पाहिलं की तू नशा केलेली होती. मला तर ते पाहून आश्चर्यच वाटलं की महिलाही नशा करतात. हं, महिला नशा करतात हे मी ऐकलंय आणि त्याचे व्हिडिओ देखील पाहिले. त्यात मला असं जाणवलं की नशा करणाऱ्या महिला ह्या काही संस्कारी नसतात. आता मला सांग की तू होळीचा दिवस होता, म्हणून नशा केली होती की नेहमीच अशी नशा करतेय?"

त्याचा तो प्रश्न. तसं ज्योतीनं उत्तर दिलं.

"अरे, आता नशा करणं ही बाब सामान्य बाब झाली आहे. तशी नशा आजकाल कोणीही करत असतं. त्यात आश्चर्य वाटण्यासारखं कारण नाही. आता तुझ्या दुसऱ्या प्रश्नांचं उत्तर. ते उत्तर असं आहे की मी नेहमीच पिते. परंतु बाहेर नाही. आपल्या पतीसोबत आणि मी बेवडी नाही की जास्त पिते. फक्त थोडीशीच पिते. आपल्या पतीसोबत एन्जॉय करते. आपल्या पतीला आनंद देते. त्यात वावगं काय? आपला पती बाहेर पिवू नये हाच यात माझा उद्देश आणि तेही बाहेर पितच नाहीत. घरीच पितात माझ्यासोबतच."

तिचं ते त्या नशेला धरुन समर्पक उत्तर. परंतु ते योग्य उत्तर न वाटल्यानं तो परत म्हणाला,

"अगं परंतु याचा परिणाम? याचा परिणाम तुझ्या मुलीवर होईल ना. मग? मग काय करणार?" त्यानं चिंता व्यक्त केली. तशी ती म्हणाली,

"मी मुलीबद्दलही चिंता करीत नाही. माझ्या मुलीनंही माझ्यासारखंच मोकळं जीवन जगावं. तिला जसं वाटेल, तसंच जीवन जगावं." तिनं तिच्या जगण्याला व जीवनाला धरुन समर्पक उत्तर दिलं.

गुरुला तिची होळीला केलेली नशा पाहून जेवढं आश्चर्य वाटलं नव्हतं, त्यापेक्षा कितीतरी वेगळं तिच्या त्या उत्तरांनी आश्चर्य वाटलं. तशी ती बालपणापासूनच मोकळा श्वास घेणारी होती. तिला बाईक सुद्धा चालवता येत असे. तिनं जीवनाला आपल्या मनात बंदीस्त केलं होतं व त्यातूनच ती जगणं शिकली होती. परंतु ती आपल्या मनाची बंदीस्त स्त्री बनली नव्हती. आजही ते मन तिच्या ताब्यात होतं. ती आपल्या मनाच्या ताब्यात नव्हती.

हसत खेळत जगलेली ज्योती... तिचं पुर्णच आयुष्य जरी दुःखदायी गेलं असलं तरी तिनं आपल्या दुःखाला दुःख दुःख करीत बसली नाही. त्यातून मार्ग काढला. तशीच काहीशी परिस्थिती गुरुचीही होती. गुरुची साळीही अशीच कोणतीही चिंता न करता आनंदीत जीवन जगत होती आणि गुरुची पत्नी आरती आजही सामान्यच जीवन जगत होती. त्यामुळंच गुरुला वाटत होतं की ज्योतीची बहिण पुजा, ती अतिशय साधं भोळं जीवन जगत असेल, ती नशाही करीत नसेल आणि मोकळा श्वासही घेत नसेल. कारण दोन भाऊ व दोन बहिणीमध्ये बरंच अंतर असतं.

गुरुला आठवत होतं ज्योतीचं जीवन. ज्योतीचा जसा पुजाच्या विवाहापुर्वीच विवाह झाला होता. तसाच विवाह आरतीच्या बहिणीचाही तिच्याच विवाहापुर्वी विवाह झालेला होता. त्याचं कारण होतं जबाबदारी. पुजा संपूर्ण जबाबदारीतून मोकळी होताच तिनं विवाह केला होता. त्यासाठी तिनं भरपूर वाट पाहिली होती. जेव्हा तिला सगळे सुखी झालेले दिसले. तेव्हाच तिनं मोकळा श्वास घेतला व आपला विवाह साजरा केला. परंतु जसा तिनं ज्योतीचा विवाह जेवढ्या थाटामाटात साजरा केला. तेवढा थाटमाट तिच्या विवाहात नव्हता. तीच गत आरतीचीही होती.

किर्ती या दोघांतूनही वेगळीच होती. तिचा विवाह साजरा झाला होता. परंतु जिनं जबाबदारी स्विकारली होती. त्या बहिणीनं आपला विवाह साजरा केला नव्हता. तिनं विवाहच केला नव्हता. इतर भावा बहिणींचे संसार बसवता बसवता वेळ निघून गेली होती आणि आज एवढं वय झाल्यानंतर आपला विवाह करण्याची तिची इच्छाच नव्हती.

आज किर्ती व ज्योती आपआपल्या वडील बहिणींची सेवा करीत होत्या. त्यांचं ऐकत होत्या. त्यांना त्रास देत नव्हत्या. कधीकाळी त्यांना काही झाल्यास त्या धावून जात होत्या. कारण त्यांचे उपकारच होते त्यांच्यावर. त्यामुळंच त्या जणू उपकाराची परतफेड करीत होत्या.

'रहे ना रहे हम, महका करेंगे हम, बनके वफा...' अशा गाण्याचा एक अल्बम. ममता नावानं तो अल्बम गाजला होता सन १९६६ ला. हे गाणं मजरुह सुलतानपुरीनं लिहिलं होतं. म्युझिक रोशनचं होतं व गायक स्वर लता मंगेशकरचे होते. ज्योतीच्या बाबतीतही अशीच गोष्ट. तिचं मोकळं वाटणारं जीवन. तिच्यापासून खरंच प्रेरणा

घेण्यालायक होतं. संकटं कितीही येवू द्या. ते येणारच. त्यामुळं घाबरायचं नाही. जगत राहायचं आनंदाचं जगणं. बंधन विरहीत जगणं. बंदीस्त जगणं जगून स्वतःच्या आयुष्याला बंदीस्त करुन टाकू नये. खरंच त्या गाण्याशी समर्पकच बसत होतं तिचं आयुष्य. तसं पाहता त्या गाण्याप्रमाणे तिही प्रामाणिकच होती आणि त्या गाण्याप्रमाणेच तिचं स्वप्नही होतं की ती जरी जगात नसेल, तरी तिचं वागणं जगाला प्रेरणा देणारंच असेल.

किर्तीही त्याच स्वभावगुणानुसार होती. तिलाही वाटत होतं की दुःख करुन काय सुख प्राप्त होणार आहे काय? मग ते जर सत्य नाही तर, दुःख का बरं करायचं? जे मिळालं, ते आपल्या प्रारब्धानंच मिळालं व जेही काही मिळणार, तेही प्रारब्धानंच मिळणार. मग ही चिंता का बरं करायची. चिंता सोडायची.

आज किर्तीही आनंदातच जीवन जगत होती ज्योतीसारखी आणि गुरुची मेव्हणीही. मात्र त्यांना आधार देणाऱ्या त्यांच्या बहिणी त्या आजही चिंता करीत होत्या गुरुसारख्याच. जसा गुरु आजही चिंता करायचा. भविष्याची पावलं टाकत असतांना. कारण आजही त्याचेवर जबाबदारी होती लेकराची. तसा तो विचार करीत होता की पुजाचंही तेच हाल असतील. ती आपल्या लेकराची चिंता करीत असेल आणि सोबतच आपल्या भावंडांचीही चिंता करीत असेलच. कारण त्याच भावंडांची जबाबदारी तिनं भविष्यात पेलवली होतीच.

********** ***************

ते सर्वचजण हळूहळू वार्ध्यक्याकडे जावू लागले होते. तसा त्यांच्याही मनात विचार होताच. तो विचार म्हणजे आपलं म्हातारपणात काय होईल? आपले म्हातारपणातील जीवन कसे जाईल याचा.

ज्योती आज मोकळेपणानं जगत होती. तसं पाहता तिच्या जीवनात दुःख येत असलं तरी तिला त्याचेशी काही सोयरसुतक नव्हतं आणि ती त्याची चिंताही करीत नव्हती. त्यावर ती विश्वासही करीत नव्हती. तिचा पतीवर विश्वास होता. जर पती जगलाच आणि तिला त्यापुर्वी मृत्यू आलाच तर त्यानं दुसरा विवाह करुन टाकावा असं तिला वाटत होतं आणि ती जर जगली तर तिही दुसरा विवाह करणार असं निश्चित होतं. असं एकंदर तिच्या वागण्यावरुन दिसून येत होतं.

गुरुची तर अवस्था सोने पे सुहागा अशीच होती. त्याची पत्नी तर त्याला ती जिवंत असतांनाच त्यानं दुसरा विवाह केला तरी चालेल असं म्हणत होती आणि किर्ती? तिला मात्र आपल्या पतीचा दुसरा विवाह नको होता. तेच मत होतं सुरेखाचंही. अशातच वार्धक्य आलं व नियती ते सगळं पाहात होती.

ज्योती आज म्हातारी झाली होती व तिच्या मुलीचाही विवाह झाला होता. तिला जावई चांगला मिळाला असला तरी तिची मुलगी आज विदेशात होती. ती मुलगी तिच्याचसारखी निघाली होती व तिला मायबाप नको होते. शिवाय मायबापाला जास्त दिवस तिच्याकडे राहता येत नव्हतं. त्यामुळंच ते देशातच राहात होते.

ज्योतीचा पती तिच्या मुलीच्या विवाहानंतर लवकरच निवृत्त झाला. त्यांना पेन्शन मिळत असल्यानं परिस्थिती शेवटपर्यंत चांगलीच राहिली. परंतु तो शेवटचा

काळ. त्या शेवटच्या काळात त्यांच्यानं कामंच जमत नव्हतं. हात थरथर कापत होते. मुलीची सारखी आठवण यायची. परंतु मुलगी काही जवळ नव्हती. कधीकधी ते बोलून घेत मुलीशी व्हिडिओ कॉलवर. परंतु मुलगी आता बोलायचं टाळायची. ती आपल्या मुलाबाळांवर खुश झाली होती. तिला आपल्या मायबापाशी बोलणं जड वाटत होतं. शिवाय तिला आपल्या मायबापाशी बोलायला कंटाळा येत होता.

ज्योतीची मुलगी तिच्या मायबापाशी बोलत नव्हती. त्याचं कारण होतं तिची नोकरी. तिच्या मुलीला नोकरी होती. तिची मुलगी नोकरी व घरचे काम करुन थकत होती. मग कुठून वेळ मिळणार?

ज्योती म्हातारी होती व आता तिला कधीकधी आपल्या आईची आठवण येत असे. तिला वाटत असे की तिनं आपल्या आईची सतत सेवा केली व सेवा करतांना तिचा स्वार्थही नव्हता. परंतु आपली मुलगी. आपली मुलगी आपल्याच कर्तृत्वामुळं आपल्याजवळ नाही. आपण काल तिच्यावर संस्कार करतांना केवळ तिच्या संसाराकडे लक्ष दिलं. तिनं फक्त आपलं पाहावं असंच वाटत होतं मला. परंतु आज वाटतंय की आपण त्यावेळेस चुकीचं पाऊल टाकले होते.

आज ती आपल्या जवळ नाही. याला जबाबदार आहोत आपणच. ती आपल्याजवळ असती तर कदाचीत आपली सेवा तिला करता आली असती आणि तिनं नाईलाजानं तरी आपली सेवा केली असती.

काही दिवस गेले होते. आता ज्योती संपुर्णपणे म्हातारी झाली होती व तिचे हात थरथरायला लागले होते. अशातच एके दिवशी तिचा पती गेला व तिला आठवायला लागलं, तो तिचा भूतकाळ. तिनं तिच्या पतीला म्हटलं होतं की मी

गेल्यावर त्यांनी दुसरा विवाह करावा. परंतु ते तर माझ्याच पुर्वी गेले मला सोडून. ज्या पतीवर मी अगाढ प्रेम करायची व तेवढाच विश्वास आणि तेवढीच मायाही. म्हणायची की मी जाताच तुम्ही विवाहबद्ध व्हावे आणि तुम्ही जाताच मिही विवाहबद्ध होणार. परंतु ते धांदात खोटं ठरलं व ते गेले आणि या वृद्धापकाळात माझ्याशी तरी विवाह कोण करेल.

ज्योतीजवळ आज भरपूर काही होतं. गाडी, बंगला व सर्वकाही. हाती नोकरही होते. परंतु नोकरांनी तिला मदत केली, ती तिचा पती जिवंत असेपर्यंत. परंतु जसा तिचा पती मरण पावला. तसे सारेच नोकर गेले तिला हळूहळू सोडून. त्या बंगल्यात ती आता एकटीच राहात असे. आता तिला तो बंगला अगदी खायला धावत होता एखाद्या स्मशानागत. तिथं करमत नव्हतं आणि रात्रीची झोपही येत नव्हती.

ज्योती जगली होती पुर्ण आयुष्य अगदी निवांतपणानं. तिच्या आयुष्यात भरपूर दुःखाचे प्रसंग आले होते व दुःख म्हणजे काय? हे तिला चांगलंच माहीत होतं. परंतु ते दुःख तर येणारच. ते प्रारब्धच, असं म्हणत ती आतापर्यंत जगली होती. आता तिच्याच्यानं ते एकाकी आयुष्य सहन होत नव्हतं. अशातच तिला आधाराची आवश्यकता वाटत होती. परंतु आधार देईल कोण? शिवाय आत्महत्या करुन आपला जीव संपवावा तर ती त्यातील नव्हतीच. ती हिरीरीनं जगत होती तेही एकाकी आयुष्य. मग कोणी आधार देवो अगर न देवो. अशातच कोणीतरी सांगीतलं तिला की तिनं वृद्धाश्रमात जावं. तशी तिला ती युक्ती आवडली व ती वृद्धाश्रमात गेली.

ते वृद्धाश्रम...ते तिच्यासारख्या समवयस्क व्यक्तींसाठीच बनवलेलं एक आधारगृह होतं. तिथं तिच्या वयातील बरीच मंडळी होती. ज्यांची मुलं त्यांच्या मायबापाची सेवा करीत नव्हते. तीच मंडळी तिथं होती. तशीच ज्योतीसारखीही मंडळी त्याच वृद्धाश्रमात होती. ज्यांची मुले विदेशात होते. जे आपल्या मायबापाला आपल्यासोबत नेवू शकत नव्हते.

ज्योती त्या आश्रमात गेली होती. काही दिवस राहिली होती. आता तिला अगदी हायसं वाटू लागलं होतं.

तिची मुलगी तिच्या संसारात रममाण झाली होती. ती आता तिला फोन करीत नव्हती. तशी महिन्यातून एखादा फोन उचलून म्हणत असे की आई, तू खुश राहा. मी तुला माझा फावला वेळ देवू शकत नाही. कारण माझ्याकडे भरपूर कामं आहेत. माझ्याकडे तुझ्याशी बोलायला वेळच नाही. मग काय, ते मुलीच्या तोंडून ऐकताच तिला फार वाईट वाटत असे. वाटत असे की काश! माझ्या मुलीला कमीच शिकवले असते तर...हा तिला शिकविण्याचा व तिचा विवाह विदेशात करून देण्याचाच परिणाम आहे.

गुरुचीही हालत ज्योतीसारखीच होती. त्यानंही मुलीला राबराब शिकवलं होतं. त्याचीही मुलगी शिकून मोठी झाली होती आणि तिचाही विवाह झाला होता. परंतु ती काही विदेशात गेली नव्हती. ती देशातच होती. परंतु तिही आपल्या आईवडीलांची सेवा करीत नव्हती. अशातच ते दोघंही वृद्धाश्रमात राहात होते. मात्र किर्तीचं तसं झालं नव्हतं. तिची मुलगी दिव्यांग असली तरी आजही तिच्यासोबत

होती. ती आपल्या मायबापाची सेवा करीत होती. त्यांच्या सुखदुःखात मदत करीत होती.

आज किर्तीला आपल्या मुलीचा हेवा वाटत होता. कारण ती एक प्रसिद्ध नृत्यांगणाच नाही तर प्रसिद्ध सुसंस्कारी मुलगीही बनली होती. जिचा संसार तर होताच. परंतु संस्काराव्यतिरीक्त तिच्यात सुसंस्कारही होते. ज्या सुसंस्काराच्या भरवशावर तिनं भवसागर पार केला होता.

आज गुरु व त्याची पत्नी वृद्धाश्रमात होते. त्याच वृद्धाश्रमात की जिथं आधीपासूनच ज्योतीही दाखल झाली होती. थोडासा चेहरा बदल झाला होता. तसे तेवढे ठसेही चेहऱ्यावर नव्हते. कारण चेहऱ्याची पुर्ण ठेवण बदलली होती.

गुरु आपल्या मुलीच्या त्रासानं वृद्धाश्रमात आला. तशी ज्योतीही त्याच वृद्धाश्रमात होतीच. तिही त्याच्या समोरासमोर आली. दोघांनीही आजपर्यंत कधीही लहानपणापासूनच एकमेकांना पाहिलेलं नव्हतं. तशी दोघांचीही नजर एकमेकांना भेटली. मनात असंख्य विचार घोळू लागले. हं, बोलणं होतं थोडसं. परंतु प्रत्यक्षात पाहिलेलं नसल्यानं चेहऱ्याची ओळख नव्हतीच. तसं एकमेकांचा चेहरा पाहताच आधी ज्योतीच उत्तरली.

"तुम्हाला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतंय. जरा परिचय सांगता काय?"

"मलाही अगदी तसंच वाटतंय. कोण तुम्ही?"

"मी ज्योती. मी अमूक अमूक विद्यालयात शिकले."

"हं, आठवलं तर..."

"काय आठवलं?"

"आठवलं... ती शाळा, ते तुमचे डबे, अन् तो मोकळा श्वास. परंतु सारंच बदललं."

"काय बदललं?"

"तुझा चेहरा आणि त्यावर आलेल्या सुरकृत्याही. आता तुझा चेहराच अजिबात ओळखायला येत नाही."

"हो का?"

"होय."

"परंतु तू कोण रे ? आधी तुझा तर परीचय सांग बरं ?"

"मी...मी गुरु. तुझ्याच शाळेत शिकणारा मुलगा. आपण दहावीपर्यंत एकाच वर्गात होतो. आठवलं का ?"

"होय, आठवलं. अन् तुला कोण ओळखणार नाही रे."

ज्योतीनं त्याला ओळखलं व तशी ओळखल्याची पुष्टीही दिली. आता गतकाळातील विचारांचं काहूर त्याच्या डोक्यात माजलं होतं व ते संवाद करु लागले होते. तिचा चेहरा पार बदलला होता. तरीही परीचय सांगताच ज्योतीला गुरुनं

ओळखलं. चेहरा पुसटसा ओळखीचा वाटत होताच. तशी तोंडओळख झाली व गुरुनं विचारलं की ती कशी काय वृद्धाश्रमात आली?

गुरुचा तो प्रश्न. तशी ज्योती म्हणाली,

"मी माझ्या मुलीला भरपूर शिकवलं. लहानाचं मोठं केलं. कोणत्याही गोष्टीची कमी केली नाही. तिच्या सर्व इच्छा पुरवल्या. परंतु माझा नाईलाज झाला. माझी मुलगी विदेशात आहे. चांगल्या पोष्टींगवर आहे. भरपूर पैसाही कमवते. परंतु माझ्याकडे वेळ द्यायला तिच्याकडे वेळ नाही. साधी ती फोनवर बोलतही नाही. एवढी सवड नाही तिला."

ज्योती बोलून गेली. तसं तिच्या डोळयाला पाणी आलं व ते नकळत जाणवलंही. तसा तो म्हणाला,

"ज्योती डोळे पुस. या जगात तू एकटीच नाही तर, तुझ्यासारखे भरपूर आहेत की ज्यांची मुलं आजही वृद्धाश्रमात आहेत. ती मुलं त्याच मायबापामुळं वर चढली व नोकरीच्या आकाशात उंच भरारी मारायला लागलीत. उडू दे त्यांना. कारण त्यांना पंख फुटलेत. त्यांनाही उत्तूंगभरारी मारु दे व आनंद व्यक्त करु दे. हं, एक सांगतोय. या वृद्धाश्रमात आहे ना. मग हाही काळ बरा की ही माणसं पैसे घेतात आणि पैशासाठी सेवा करतात. यांना जास्त पैसा मिळत नाही सेवेचा. परंतु जो आशीर्वाद मिळतो ना. तो उच्च कोटीचा आहे. हीच माणसं पुढील जन्मी आपल्याच पोटाला यावी अशी आशा बाळग. ज्योती, आपण काय मिळवलं जीवनात असा जर विचार केलाच तर आठवतं फक्त पैसा नि पैसाच कमवला. सुख नाही कमवू शकलो. तू त्या सुखाला नशीब समजली आणि आम्ही त्याच सुखाला भवितव्य. तुझी मुलगी तर

विदेशात आहे. म्हणूनच ती आज बोलत नाही परंतु माझी मुलगी? माझी मुलगी इथंच आहे की जी माझ्याच मालमत्तेवर ताबा घेवून बसली. परंतु ती तरी काय करणार?"

गुरु थोडासा थांबला. तशी ज्योती म्हणाली,

"म्हणजे?"

"अगं, आज आपल्या देशात म्हणतात की मुलगी सक्षम आहे. तिला कोणताच त्रास नाही. ती कमवू शकते व आपल्या पायावर उभी राहू शकते. त्यानंतर ती आपल्या मतानं चालू शकते. वागू शकते. परंतु ते सगळं खोटं आहे. त्या बोलायच्याच गोष्टी आहेत."

ज्योतीला त्या गोष्टी समजल्या नव्हत्या. त्यामुळं ती पुन्हा म्हणाली,

"गुरु, मला समजलं नाही, तुला काय म्हणायचं ते? आता तरी असा कोड्यात बोलू नकोस. जरा स्पष्टपणे बोल."

"अगं, मी माझ्या मुलीचा विवाह करुन दिलाय व ती सासरी गेली. परंतु सासरचे लोक एवढे हरामखोर आहेत की ते माझ्या मुलीच्या मनानं वागत नाहीत. हिला कवडीचंही स्वातंत्र्य नाही. बिचारी राब राब राबते. तसा वेळही नसतोच तिला. भरल्या कुटूंबातच आहे ना. सकाळपासून घरची कामं करते व दुपारी नोकरीवर जाते. सायंकाळी पुन्हा स्वयंपाक. मग कुठे वेळ मिळते तिला. तसं पाहिल्यास आम्ही तिचे मायबाप. आमचा तेवढा हक्कं नाहीच तिच्यावर. आम्ही जर तिच्यावर आपला हक्कं दाखवत बसलो तर, तिचा संसार तुटेल. शेवटी आम्ही निर्णय घेतला. निर्णय घेतला की जेव्हापर्यंत आपल्यानं आपली स्वतःची पोळी भाजता येते. तेव्हापर्यंत

भाजायची स्वतःच्या हातानं पोळी. ज्यावेळेस थकलो. त्यावेळेस वृद्धाश्रमात जावून बसायचं. म्हणूनच आलोय आता आम्हीही वृद्धाश्रमात. काय करणार. आता शरीर साथ देत नाही. हातपाय थरथरतात. डोळ्यांना नीट दिसत नाही. पायानं नीट चालणं होत नाही. घरी कामं करुन घेण्याची सोय उरलेली नाही. परंतु आम्हाला तेवढं दुःख नाही. ना मुलीची आठवण येत आम्हाला, ना जावयाची, ना कोणत्याच नातेवाईकांची. जे नातेवाईक पोटभरु असतात."

गुरु बोलत होता व ज्योती ऐकत होती. ती काय समजायचं ते समजली. तिलाही वाटत होतं की गुरुला आपल्या मुलीची आठवण कशी येणार? त्याच्यासोबत त्याची पत्नी आहेच एक प्रकारची ढाल बनून. परंतु माझं काय? माझ्यासोबत कोण आहे माझी ढाल बनायला.

तिचा विचार रास्तच होता. कारण पत्नी ही पतीची ढाल असते व पती पत्नीची. अगदी वृद्ध अवस्थेत देखील. जेव्हा त्या जोडीतील एखादा जातो ना. तेव्हाच कळतं की सत्य काय असतं ते आणि तेव्हाच त्याचं महत्व कळत असतं. ज्योतीला तिचा पती जिवंत नसल्यानं त्याचं महत्व अधिक वाटत होतं. मात्र त्याबद्दल गुरुला त्याचं काहीच वाटत नव्हतं.

आरती, गुरु आणि ज्योती...ते तिघेही जण त्याच वृद्धाश्रमात राहात होते. तिघांचे कमरे वेगवेगळे होते. गुरु आणि आरतीला एकच कमरा होता तर ज्योतीला वेगळा कमरा होता. आरती थोडी वयानं लहान होती. त्यामुळंच ती रोज सकाळी उठत असे. ती परीसरातील झाडांची सकाळीच फुलं तोडत असे व सकाळीच आंघोळ करुन देवाला चढवीत असे. तशी लवकरच ती आपली पुजा पाठ

आटोपवीत असे. त्यानंतर ती सर्व वृद्ध स्त्रियांच्या व माणसांच्या कमऱ्यात जात असे. त्यांना दोन दोन फुलं देत असे व सांगत असे की त्यांनी खुश राहावं फुलांसारखंच. घरची आठवणही अजिबात करु नये. कधी एखाद्याला आठवण आलीच तर ती आठवण दूर करीत असे ती. परंतु ती त्यांच्या घरची आठवण असायची. जी सतत यायचीच. कधीकधी त्यांच्यात चर्चाही होत असत. त्या चर्चा संस्काराविषयीच्या असायच्या.

********** ***************

संस्कार, संस्कार, संस्कार? संस्कार म्हणजे नेमका काय हो? एका स्त्रिनं विचारलेला प्रश्न. तसं पाहिल्यास संस्कार म्हणजे नेमकं काय? असा प्रश्न साहजीकच कोणालाही पडू शकतो.

संस्कार हे बिरुद कोणी आपल्या संसारालाही लावू शकतात. म्हणतात की संस्कार म्हणजे चांगला संसार. ज्या व्यक्तीचा संसार जर चांगला चालत असेल, तर त्या व्यक्तीला संस्कारी पुरुष समजतात व त्याच संसाराला संस्कारमय संसार समजतात.

तसं पाहिल्यास आज बऱ्याच लोकांचा संसार चांगला चालतो. त्याला संस्कारमय संसार म्हणता येईल काय? यावर कोणी नक्कीच म्हणतील की होय तर कोणी नक्कीच म्हणतील की नाही. होय, याचा अर्थ आजच्या काळात पती पत्नीचं चांगलं पटणं. तसं पटणं हे चांगल्या भाग्याचं लक्षण आहे. ते चांगलं पटतं ना. मग ते

चांगले संस्कार आणि नाही याचा अर्थ पती पत्नीचं चांगलं पटून उपयोग काय? असं मानणं. यात पुढं त्याला काही लोकं पुष्टी लावतात. ती म्हणजे पती पत्नीचं चांगलं पटणं हा संस्कार नाही तर ते आपल्या मायबापाची सेवा करतात काय? ते पाहुण्यांचं आदरातिथ्य करतात काय? ते इतर लोकांशी वर्तणुकीतून कसा वर्तनबदल करतात? हे मानणं वा समजणं चांगल्या संस्काराचं उत्तम उदाहरण आहे.

संस्काराबाबतीत सांगायचं झाल्यास संस्काराचे सोळा प्रकार आहेत. ते संस्कार धार्मीक बाबींना धरुन आहेत. ते सोळा संस्कार खालीलप्रमाणे आहेत.

(१) गर्भाधान संस्कार, (२) पुंसवन संस्कार, (३)सीमन्तोन्नयन संस्कार, (४)जातकर्म संस्कार, (५)नामकरण संस्कार, (६)निष्क्रमण संस्कार, (७)अन्नप्राशन संस्कार, (८)मुंडन संस्कार, (९)कर्णवेधन संस्कार, (१०)विद्यारंभ संस्कार, (११)उपनयन संस्कार, (१२)वेदारंभ संस्कार, (१३)केशांत संस्कार, (१४)सम्वर्तन संस्कार, (१५)विवाह संस्कार (१६)अन्त्येष्टी संस्कार.

हे सर्व संस्कार धार्मीक ग्रंथात आहेत. परंतु या गोष्टींना खरं म्हणजे संस्कार मानावे काय? काही लोकं याही बाबतीत मते मतांतरे व्यक्त करतील. याला संस्कार म्हणता येईल काय? तर याचं उत्तर नाही असंही देता येईल आणि हो असंही देता येईल. नाही असं देतांना त्यात धार्मीक रंग जो भरला जातो. तो लोकांना मान्य नाही. शिवाय आजच्या पुरुषत्ताक कुटूंब पद्धतीत पुरुष मंडळी कान टोचून घेत नाही.

संस्कार हे आपल्या परीसरातील लोकं रुजवत नाहीत. तसेच संस्कार आपले परीजनही करुन घेत नसतात. ना शाळा रुजवून घेत. मग संस्कार कोण रुजवत असतं असाही एक प्रश्न पडतो. संस्कार हे शाळा, परीसर, समाज रुजवून घेत असतात. परंतु

त्यासाठी खुद्द आपले आईवडील त्या संस्काराला स्विकार करणारे असावेत. त्यांचा त्या गोष्टीला आक्षेप नसावा. ते बदलाला स्विकार करणारे असावेत. संस्कार रुजवायला प्रतिसाद देणारे असावेत. तरच संस्कार घडतात. जर आपले आईवडील बदलाचा स्विकार करणारे नसतील तर संस्कार मुळात रुजणारच नाहीत. शिवाय आपल्या मुलाचं भवितव्य कसं घडवायचं हे मायबापांनीच ठरवायचं असतं व मायबापांनीच त्यासाठी प्रयत्न करायचा असतो. याबाबतीत आतिशयोक्ती न केलेली बरी.

आपले मायबापच आपल्यावर संस्कार करीत असतात. ते फुलवीत असतात. याबाबतीत एक उदाहरण देतो. आपण थॉमस अल्वा एडीसनचं नाव ऐकलं असेलच. म्हणतात की थॉमस शाळेतच गेला नाही. मग तो शास्त्रज्ञ कसा झालाय? त्याचं अस्तित्व की त्याच्या आईला त्याला प्रेरणा देण्यासाठी थोडसं खोटंही बोलावं लागलं. यातील थॉमसची कथा अशीच.

थॉमस शाळेतच जात होता. तो शाळेतील शिक्षकांना प्रश्न विचारायचा. ते प्रश्न ऐकून शाळेतील शिक्षकांना आश्चर्य वाटायचं. तसे ते टाळाटाळ करायचे. शेवटी त्याचे ते प्रश्न विचारुन ते कंटाळले व त्यांनी एका चिठ्ठीत काहीतरी लिहून ती चिठ्ठी थॉमसला देवून म्हटलं की ही घेत व आपल्या आईशिवाय कोणालाही देवू नकोस. ती चिठ्ठी घेवून थॉमस घरी आला. त्यानं ती चिठ्ठी आईच्या हातात दिली. त्यानंतर त्याने आपल्या आईला विचारलं, "आई, असं काय लिहिलं आहे चिठ्ठीत?"

ते मुलाचं बोलणं. तशी आई रडली. तिनं आपल्या बाळाला कवटाळून म्हटलं,

"बाळ, त्या चिठ्ठीत असं लिहिलं की आपला थॉमस विलक्षण बुद्धीमत्तेचा धनी आहे. आम्ही शिक्षक त्याला शिकवू शकत नाही. आपणच त्याला शिकवावं. कारण आम्ही तेवढ्या मोठ्या व्यक्तीमत्वाला शिकविण्याच्या लायक नाही."

थॉमसनं ते ऐकलं व त्यानं आपल्या आईवर विश्वास ठेवला. त्यानंतर तो आपल्याच आईजवळून शिकू लागला. आता विचार हा की त्याच्या आईनं त्याला काय शिकवलं असेल? एबीसीडी की एखादं अंकगणित की अ आ इ ई. याबाबतीत सांगतांना एवढंच म्हणता येईल की त्या आईनं त्याला वरीलपैकी काहीच शिकवलं नाही. मग काय शिकवलं असेल आईनं? आईनं त्याला शिकवली जिद्द, चिकाटी, निरीक्षण क्षमता, पराभव, कितीही वेळेला का होईना, हार न मानणारी वृत्ती, तसेच प्रयत्नांची पराकाष्ठा. याच गोष्टीच्या आधारे थॉमस अल्वा एडीसन शिकले व त्यांना विजेचा शोध लावता आला. तसंच त्यांना जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ बनता आलं. मात्र त्याच्या आईनं ती चिठ्ठी सांभाळून ठेवली होती संदूकात. जेव्हा त्याची आई मरण पावली. त्यानंतर काही वर्षानं जेव्हा संदूक उघडलं गेलं आणि ती चिठ्ठी उघडली गेली होती शिक्षकांनी दिलेली. तेव्हा त्या चिठ्ठीत लिहिलं होतं.

'थॉमस हा एक मुर्ख स्वरुपाचा मुलगा असून त्याला आम्ही शिकवू शकत नाही. त्याची स्वतःची बुद्धीमत्ता तर चालत नाही. व्यतिरीक्त तो आमच्याही बुद्धीमत्तेला सुरुंग लावतो. त्यामुळंच त्याला आम्ही शाळेतून काढून टाकत आहोत.'

आई...आई बाळाची ती प्रेरणा असते की त्या बाळाला ती शुन्यातून शतकापर्यंत नेते. ती आई आपल्या बाळाला झिरोतून हिरोही बनवते. जसं थॉमसच्या आईनं थॉमसचं केलं होतं. ती संस्कारही शिकवते बाळाला. त्याला आपल्या

स्वतःचा संसार व्यवस्थीत चालवता यावा यासाठी. ती खोटीही बोलते कधीकधी. ते बोलणं खोटं नसंतच. परंतु मुलं चांगल्या संस्कारी गोष्टी शिकत नाहीत. ते शिकतात वात्रट गोष्टी. माहीत नसतं मायबापांना ते कोणाची संगत धरतात ते. मग त्याच कुसंगतीचा परिणाम म्हणून एक दिवस ते आपल्या स्वतःच्या आयुष्याची राखरांगोळी करीत असतात.

अलिकडील काळ हा कलिकाळ आहे. थॉमसची आई नक्कीच खोटी बोलली होती. परंतु ती खोटी बोलली आपल्या बाळाचं भवितव्य बनविण्यासाठी आणि ते बनलंही. परंतु अलिकडच्या कलिकाळात चांगल्या गोष्टीसाठी खोटं बोलणारे आईबाप नाहीत. अलिकडच्या काळात आपल्या मुलांवर कुसंस्कार करणारेच मायबाप आहेत, असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. मला मुलगाच हवा. मुलगी नाही आणि मुलगी झालीच तर सुनेला घरातून हुसकावून लावणारे मायबाप आज आहेत. शिवाय एखाद्या मुलीला बाळ झालं नाही आणि ती जर वांझ असेल तर चक्कं सोडचिठ्ठी मागावयास भाग पाडणारे मायबाप आहेत. याही पलीकडे जावून मुलानं आपलंच ऐकावं, म्हणून त्याचेवर अंधश्रद्धेच्या आहारी जावून भानामती करणारे मायबाप आहेत आणि पुत्रवधू आवडली नसल्यानं पहिल्याच दिवशीपासून तिच्यावर अत्याचार करणारे व करायला लावणारे मायबाप आहेत. शिवाय आपली मुलगी, आपली मुलगी व आपली सुन, परायाची मुलगी असा भेदभाव करणारेही मायबाप आहेत.

सुसंस्कार फुलत असतांना कुसंस्कार फुलविण्यासाठी सदैव तत्पर असणारे जसे मायबाप या कलिकाळात आहेत. तशीच मुलंही त्याचप्रकारची कलिकाळात आहेत. अशी मुलं मायबापाचं ऐकून स्वतः विचार न करता जबरदस्तीनं आपल्या

पत्नीला विष देतात वा तिच्या गळयाला गळफास लावून तिचा जीव घेतात. शिवाय या सर्व भानगडीत सुनाही मागं नाहीत. काही ठिकाणी संधी मिळताच सासवांना घराच्या बाहेर काढणाऱ्या सुनांची या जगात वानवा नाही. तसंच आपल्या पतीच्या कधी कानाशी लागून लाडी गोडीनं वा कधी धमकीनं आपल्या सासू सासऱ्यांना वृद्धाश्रमात पाठवणाऱ्या सुनांची काही कमी नाही. खरंच याला संस्कार म्हणता येईल काय? संसार तरी? आजच्या काळात मी, माझी पत्नी आणि माझी मुलं यालाच संसार मानल्या जातो व त्यांचं चांगलं पटत असल्यानं त्याला संस्कारासह चांगला संसारही समजल्या जातो. परंतु तो संस्कार नसतो, तर कुसंस्कार असतो. तो संसारही नसतो, तर कुसंसारच असतो. कारण त्यांचे मायबाप हे वृद्धाश्रमात असतात. ही मंडळी, त्याच विभक्त कुटूंब पद्धतीलाच संस्कारही मानते आणि मायबाप वृद्धाश्रमात पाठवते. जिथं मायबाप कुढत कुढत मरण पावतात. ना कोणी त्यांच्याकडे फिरकत ना कोणी त्यांच्या मयतीलाही जात. मग मरण पावल्यावर सारेच दाहसंस्कार. तेच ते कावळयाला घास चारणे व तेच ते पिंडदान. कावळा येतोही व सुग्रास अन्न खावून जातोही. तद्नंतर समजलं जातं की मी जरी सेवा केली नसेल, तरी मी टाकलेल्या पात्रातील अन्न कावळा येवून खावून गेला. माझ्या मातापित्यानं मला आशीर्वादच दिला. याही व्यतिरीक्त काही लोकांचं म्हणणं. काही काही लोकं असे असतात की जे हिंदू धर्मातील सोळाही संस्कार करतात. अतिशय शास्त्रोक्त पद्धतीनं करतात आणि मायबाप कुठं? तर ते वृद्धाश्रमात असतात. खरंच अशा महाभागांना संस्कारी माणसं तरी म्हणता येईल काय?

महत्वाचं सांगायचं झाल्यास एखादी मुलगी प्रसंगी देवधर्म पुजत नसेल, डोक्यावर सेव जरी घेत नसेल, केस मोकळे सोडून गावभर फिरत असेल. ती लाली

लिपस्टिक लावत असेल. शिवाय अर्धनग्न कपड्यातही फिरत असेल, तर तिला आपण दुषणे देतो. 'काय वाह्यात मुलगी आहे. हिला तिच्या मायबापानं साधे संस्कारही शिकवले नाहीत. महाविद्यालयातही ती तशाच अवस्थेत आली. ही शिक्षण करायला आली की आपले रुपडे दाखवायला' असे सहज उद्गार आपल्या तोंडातून बाहेर पडतात. परंतु ती जर मायबापाची सेवा करीत असेल, म्हाताऱ्या माणसांची सेवा करीत असेल वा अनाथ, अपंगांची ती दया घेत असेल तर तिला तिनं मॉडर्न जरी कपडे परिधान केले वा मॉडर्न पद्धतीनं जरी ती वागली तरी तिला संस्कारी मुलगी म्हणता येईल आणि मानताही येईल. याऊलट जर एखादी मुलगी मॉडर्न जरी वाटत नसली, रोज मंदीरात जात असली, पुजापाठ करीत असली, डोक्यावर पदर (घुंगट) घेवून राहात असली, भांगात कुंकू भरत असली तरी ती जर आपल्या मायबापाची, आपल्या सासूसासऱ्याची, वयोवृद्ध माणसांची तसेच अपंग, अनाथांची सेवा करीत नसेल तर ती संस्कारी नसते आणि तसं समजण्याचं कारणही नाही. तिचा संसार जरी चांगला होत असला तरी ती संस्कारी होवूच शकत नाही यात दुमत नाही.

विशेष सांगायचं झाल्यास संस्कार व संसार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जर या दोन्ही बाजू सुसंगत असल्या तरच तो व्यक्ती सुसंस्कारी ठरतो आणि त्या दोन्ही बाजू जर परस्पर विरोधी ठरल्या तर तो व्यक्ती तेवढाच कुसंस्कारी ठरतो. आता आपल्याला ठरवायचंय की आपण साधेभोळे राहून कुसंस्कारी बनायचे की मॉडर्न राहून सुसंस्कारी. हे मात्र आपल्याच हातात आहे. आपण नेहमीच कुसंस्कारानेच वागतो आणि ज्यावेळेस आपल्याला शहाणपण येते व आपण सुसंस्काराने वागायला लागतो, तेव्हा वेळ निघून गेलेली असते. म्हणूनच अशी वेळ

निघून जाण्याच्या पुर्वीच आपण सावधान झालेलं बरं. आपली मॉडर्न जरी वागायची इच्छा असली तरी सुसंस्कार सोडू नये आणि आपली साधी भोळी पद्धत जरी आपल्याला आवडत असली तरी कुसंस्कार धरु नये. शिवाय हिंदू धर्मात सांगीतलेले सोळा प्रकारचे संस्कार हे जरी खरे असले तरी त्याचा केवळ दिखावा करुन प्रदर्शन मांडू नये. त्या पद्धतीनं वागावे, तरंच खऱ्या संस्काराला महत्व प्राप्त होते व संसारही चांगला फुलतो, बसतो. कारण त्याला थोरामोठ्यांचा, पुर्व पिढीचा आशीर्वादच लाभलेला असतो यात शंका नाही.

ज्योती वाटत होती एक संस्कार नसलेली मुलगी. तसं तिच्या पोशाखावरुन दिसून येत होतं. कारण ती आधुनीक स्वरुपाची वस्त्र परिधान करायची. शिवाय तिच्या केसाची केससज्जाही आधुनीक स्वरुपाची होती. वागणं बोलणंही आधुनीकच. त्यामुळंच तिच्या एकंदरच त्या गोष्टीवरून तिच्यावर संस्कार नसलेलेच वाटायचे. परंतु तिही संस्कारी होती. तिचे संस्कार वाखाणण्याजोगेच होते.

ज्योती आज वृद्धाश्रमात होती. तिला त्या वृद्धाश्रमात तिच्या तरुणपणातील घरची परिस्थिती आठवत होती. तसं पाहिल्यास तिची जशी घरची परिस्थिती बेताचीच होती. तसं पाहता त्या बेताच्या परिस्थितीनं ज्योतीला कसं वागायचं व कसं नाही याची जाणीव झाली होतीच. त्यानंतर ती त्याच बेताच्या परिस्थितीनं सासरी गेली. तेव्हा तिच्या सासरची परिस्थितीही बेताचीच होती. शिवाय तिचा पती म्हणजे तीन भावंडं होती व ज्योती ही मधली स्नुषा होती.

ज्योतीनं विवाहापुर्वी विचार केला होता की सासरी गेल्यानंतर तिला भन्नाट सुख येईल. कारण ती मधली स्नुषा आहे. परंतु तो तिचा आशावाद होता. तिला

सुरुवातीपासूनच सासरच्या माणसांची सेवा करावी लागली होती. तिचे सासरे व सासू ती मधली असूनही तिच्यातच होते. जवळपास तिच्या विवाहाच्या अठरा वर्षपर्यंत ते तिच्याकडेच होते व तिच्या हातून आपली सेवा करुन घेत होते. तिही माहेरी तिनं जी परिस्थिती भोगली होती, त्याच परिस्थितीनुसार ती आज सासरीही वागत होती नव्हे तर वागायला लागली होती. ती सासू सासऱ्यांची सेवा करीत असे. अशातच तिला एक पुत्ररत्न प्राप्त झालं होतं.

ते पुत्ररत्न. ती पुत्रीच होती व ती मुलगी लहानपणापासूनच आपल्या आईचं वागणं पाहू लागली होती. ज्योतीची मुलगी ज्योतीचं सासू सासऱ्यांची सेवा करणं पाहात होती. तेच संस्कार पडत होते तिच्यावर.

ज्योतीच्या मुलीचं नाव सायली होती. सायली आपल्या आईवडीलांपासून सुसंस्कारी गोष्टी शिकलीच होती. शिवाय त्याही गोष्टी शिकली होती. ज्या आयुष्याच्या वळणावर मोकळा श्वास घ्यायला अडथड्याच्या ठरणार नाहीत. तिनं काळानुसार कसं वागायचं? ह्या गोष्टीचाही बोध घेतला होता.

सायली मजबूर होती. म्हणूनच ती आपल्या आईची सेवा करु शकत नव्हती, जरी तिच्यावर संस्कार चांगले असले तरी. तिलाही आपल्या आईची आठवण यायचीच. परंतु ती तरी काय करणार? कामाच्या व्यस्ततेनं तिला साधं आईला फोन करणंही जमत नव्हतं. शिवाय ती विदेशात असल्यानं तिच्यावर बंधनही तेवढंच होतं. तिला आपल्या पतीचं ऐकणं भाग होतं.

ज्योती वृद्धाश्रमात होती. तशी ती वृद्धाश्रमात सुखीच होती. कारण ती कोणत्याच दुःखावर विचारच करायची नाही, तर दुःखाला प्रारब्धच समजून ते तर येणारच. मग त्याचा बाऊ का करावा? अशाचप्रकारचे तिचे विचार होते.

आज वृद्धाश्रमातही असतांना ती आपल्या मुलीच्या कर्तृत्वाला दोष देत नव्हती, ना आपल्या प्रारब्धालाही दोष देत होती. उलट गुरुला, आरतीला व इतर वृद्धाश्रमातील लोकांना मार्गदर्शन करायची. म्हणायची की दुःख तर येणारच आहे. मग त्यावर रडत बसून काय उपयोग? त्या दुःखाला दुःख न मानता त्याचा तेवढ्याच ताकदीनं सामना केलेला बरा. म्हणजेच कोणत्याही दुःखाची वा दुःखदायक घटनांची तीव्रता कमी होईल.

ते अनमोलच विचार होते तिचे. आलेल्या संकटांवर मार्ग काढण्याचे. अगदी सहजपणे त्यातून कोणालाही मार्ग काढता येईल. तसं पाहिल्यास त्या संकटांवर ती मार्ग काढण्याचा जणू उपाय सांगत नव्हती, तर प्रत्यक्ष वागून दाखवत संकटांचा सामना कसा करायचा? याचं प्रात्यक्षीकही दाखवत होती. ती वृद्धाश्रमात राहात असतांना तिनं केलेलं मार्गदर्शन सर्वांना पटत होतं. तसं पाहिल्यास तिचा स्वभाव गोड होता.

तिचा स्वभाव गोड असणे ही एक आश्चर्याचीच गोष्ट वाटत होती गुरुला. तशी आश्चर्याचीच ती गोष्ट वाटल्यानं तिचा स्वभाव कसा गोड आहे? ती काय खाते? काय पिते? हे पाहण्यासाठी एकदा गुरुनं तिला काही प्रश्न केले होते, ज्यात तिनं जी उत्तरं दिली होती. ती उत्तरंही आश्चर्यच करणारी होती.

एकदा गुरुनं तिला विचारलं,

"तुला सर्वात जास्त काय आवडतं?" त्यावर तिनं रबडी असं उत्तर दिलं होतं. ते उत्तर ऐकून वाटलं होतं की तिला कदाचीत राग येत नसेल. परंतु एकदा कोणतीतरी वस्तू तिला कमी पडल्यानं ती रागावलीही होती. तसा त्यानं तद्नंतर तिला दुसरा प्रश्न केला होता. तो म्हणजे तिला तिखट खाणं आवडतं का आणि ते तिखट कितपत खाणं आवडतं? त्यावर ती म्हणाली की तिला तिखट खाणं फार आवडतं व ते तिखट खाणं तिच्या पतीलाही आवडत होतं. त्यांना तर रसदार तिखट आवडायचं.

तिखट हा एक स्वभावगुणांचा भाग होता. तो तामसी गुणांचा एक घटक होता. तो घटक व्यक्तींमध्ये राग जास्त पसरवत होता. मग गुरुला आश्चर्य वाटलं की ती आणि तिचा पती जर जास्त तिखट खात होते, तर तिचा स्वभाग गोड बनलाच कसा? त्यावर ती कदाचीत गोडच वस्तू खात असेल असा निष्कर्ष गुरुनं काढला होता.

आरती जशी उत्साही होती. तशीच उत्साही होती ज्योतीही. आरतीला ज्योतीच उत्साही ठेवत असे. वृद्धाश्रमात दररोज सकाळ सायंकाळ प्रार्थना होत असे. ती प्रार्थना झाली की त्यानंतरच जेवनखावण मिळायचं. शिवाय ज्योती आणि आरतीनं सकाळी सकाळीच सर्वांना फुले देण्याची पद्धत सुरु केलेली असल्यानं सर्वांचा दिवस आनंददायी जात असे. रात्रीला जेवन झाल्यावर दोन चार दिवसाच्या आडमध्ये मनोरंजनाचे कार्यक्रम असायचे. कधी त्यात किर्तन तर कधी भारुड, कधी पोवाडे तर कधी भक्तीगीते असायची. कधीकधी कवीसंमेलनही व्हायचं. या सांस्कृतिक कार्यक्रमात कधी बाहेरील वक्ते बोलावले जायचे.

वृद्धाश्रमातील ते सांस्कृतीक कार्यक्रम. त्या सांस्कृतीक कार्यक्रमात कधीकधी त्या वृद्धाश्रमातील ती म्हातारी माणसंही भाग घ्यायची. त्यामुळंच तो कार्यक्रम अगदी

रोचक बनायचा. शिवाय त्या वृद्धाश्रमात वयोवृद्ध व्यक्तींच्या अभिव्यक्तीला वाव असल्यानं ते वृद्धाश्रम वृद्धाश्रमासारखं वाटत नव्हतं तर ते अतिशय मनोरंजक वाटत होतं. मनोरंजक बनलं होतं. याशिवाय वयोवृद्ध मंडळींना औषधं सुद्धा वेळोवेळी व वेळेवर दिली जात असत.

ते वृद्धाश्रम... त्या वृद्धाश्रमात खाण्यापिण्याचंही नियोजन असायचं. वयोवृद्ध मंडळींसाठी जास्त तेलकट, जास्त तिखट पदार्थ मिळायचे नाहीत. ज्यामुळं कोणत्याही स्वरुपाचे आजार वाढतील. ज्योतीला तर सुरुवातीला ते पदार्थ खाणंच होत नव्हते. कारण तिला जास्तीत जास्त तिखट खाण्याची सवय होती. तिला गोडही तेवढंच आवडत असे. तिच्या खाण्यात दररोज एखादा तरी गोड पदार्थ असायचाच. परंतु वृद्धाश्रमात दररोज गोड पदार्थ नसायचा. शिवाय गोड द्यायचंच झालं तर फक्त राष्ट्रीय सणाच्या दिवशीच दिलं जायचं. त्यामुळंच वृद्धाश्रमातील वयोवृद्धांना तऱ्हेतऱ्हेच्या खाण्यावर बंधन ठेवावंच लागत होतं. कधीकधी एखादा समाजसेवक वृद्धाश्रमात येई व तो एखाद्या वेळेस फळवाटप करुन जाई. कधी अंथरुण पांघरुणही दानात मिळत होतं.

ते तिचं म्हातारपण. तशी एकाकी असलेली ती. तिला आता जगावंसंच वाटत नव्हतं. आयुष्य संपल्यागत तिचं जगणं व जीवन होतं. पती होता, तेव्हापर्यंत तिला आधार तरी होता. परंतु पती मरण पावताच तिचा आधार संपला होता. ती इतर वृद्धाश्रमातील लोकांना आधार द्यायची आपल्या विचारानं. परंतु ती स्वतः असहाय्य होती, ती स्वतःला असहाय्य समजत नसली तरीही. आता ना तिला तिच्या मुलीचे फोन येत होते. ना ती आता मुलीला फोन करीत होती. मध्यंतरी एकदा लावून पाहिला होता तिनं आपल्या मुलीला फोन. परंतु व्यस्तच दाखवत होता.

सायली अशी कशी व्यस्त होती, ते कळत नव्हतं. तसा सायलीच्या फोन न उचलण्यावरुन काळजी न करणारी ज्योतीही काळजी करायला लागली होती. आयुष्याच्या त्या उतारवयात. ती आधार शोधत होती सायलीचा नव्हे तर सायलीच्या बोलण्याचा. परंतु सायलीचा एवढाही आधार नव्हता की तिच्याशी मनमोकळेपणानं गप्पा मारता येतील. अशातच ती आजारी पडली. ती एवढी आजारी पडली की ती त्यातून सावरलीच नाही.

ज्योती आजारी होती त्या उतारवयात. तसं पाहता तिचं आजारपण वाढत चाललं होतं. गुरु आपण पत्नी आरतीसह तिला दररोजच भेटायला जात असे. तिचे हालहवाल विचारत असे. तो तिला भेटायला येताच तिला थोडं बरं वाटत असे. कोणी माहेरचा व्यक्ती आपल्याला भेटायला आला असंही जाणवू लागलं होतं.

दिवसेंदिवस तिचा आजार वाढतच चालला होता व तसा तोही एक दिवस उजळला. त्या दिवशी आरती सकाळीच उठून नित्यनेमानं तिच्या कमऱ्याकडे गेली. तशी ती दररोजच फुलं देत असे ज्योतीला. आजही ती तिला फुलं द्यायलाच गेली होती. तिनं तिला फुल देण्यासाठी बराच आवाज दिला. परंतु सगळा प्रयत्न फोल झाला. ते पाहून तिनं दार उघडलं तर पाहते काय, ती पलंगावरच निपचीत पडली होती. तिचं अंग गारगार झालं होतं. तिला चिरविश्रांतीची झोप लागली होती. जिनं आजपर्यंत जणू सर्वजणांना दुःख म्हणजे काय? याविषयी मार्गदर्शन केलं होतं. ती ज्योती ज्योत बनून केव्हाच देवाघरी निघून गेली होती.

तिचं नाव ज्योती होतं व तिनं आपल्या ज्योती नावानं ज्ञानज्योतच लावली होती. जगाला तिनं दुःख कधीच करायचं नाही, असं सांगून जणू दुःख निर्वाणाचाच

मार्ग सांगीतला होता. दुःख आलंच तर हरळून जावू नये नव्हे तर त्याचा प्रतिकार करावा असं तत्वज्ञान तिनं आपल्या संबंध आयुष्यात मांडलं होतं. ती आपल्या तत्वज्ञानानं जगाची धात्री बनली होती.

आज ज्योती जगात नव्हती. परंतु तिचं तत्वज्ञान जगात होतं. ते जगात प्रत्येकाच्या श्वासात होतं. त्याचबरोबर ते प्रत्येकांच्या हृदयातही होतं. शिवाय प्रत्येकांच्या हृदयातून ओसंडून वाहात होतं.

********** ***************

आरतीनं ज्योतीला निपचीत पडलेलं पाहिलं. तसा तिनं हंबरडा फोडला. तो हंबरडा एवढ्या मोठ्या प्रमाणात होता की तो आवाज आजुबाजूला पसरला. तसं काय झालं म्हणून त्या वृद्धाश्रमातील मंडळी तिथं गोळा झाली. ते भिरिभिरी पाहायला लागले. ज्यात गुरुचाही समावेश होता. सर्वजणं पाहात होते की ज्योती पलंगावर निपचीत पडली आहे.

आरतीसह सर्वजणांनी तिला पाहिलं. प्रत्येकांनी हरहळ व्यक्त केली. ज्योती मरण पावली आहे याची शहानिशा झाली. त्यानंतर कोणीतरी म्हटलं की तिची मुलगी सायली विदेशात आहे. जरा तिला बोलावणं पाठवावं. ठरल्याप्रमाणे सायलीला आधी फोन करुन पाहिला. परंतु फोनवर काहीही जबाब आला नाही. त्यानंतर मेल करण्यात आला व त्याचं उत्तर लगेच आलं. 'मी फार लांब असून मला

यायला उशीर होईल. आपण प्रत्यक्षात मरण आटोपवून टाकावं. मात्र अस्थीरक्षा विसर्जन करु नये. मी येत आहे.'

सायलीचा आलेला मेलवरचा संदेश. तो माहीत होताच त्या वृद्धाश्रमातील प्रशासनानं हळहळ व्यक्त करीत ज्योतीच्या मृतदेहाला अग्नीच्या स्वाधीन केलं. त्यानंतर सायलीनं म्हटल्यानुसार तिच्या मृतदेहाला अग्नी दिल्यानंतर ती रक्षा व त्या अस्थी ती येईपर्यंत ठेवून राखल्या. तशी सायलीही लवकरच देशात परत आली. ती वृद्धाश्रमात गेली व तिनं अस्थीकलश आपल्या ताब्यात घेतला व तिनं त्यावर योग्य संस्कार करुन त्या अस्थी व रक्षा नदीत शिरवून टाकल्या. त्यानंतर तिनं निर्णय घेतला. निर्णय हा होता की तिचं घर. ते घर तिनं वृद्धाश्रमातील लोकांना राहण्यासाठी वृद्धाश्रमाला दान दिलं होतं.

ज्योतीचं ते घर आज दिपवून जात होतं. ती केवळ नावानंच ज्योती नव्हती तर जणू इतरांना प्रकाशमान करणारीच एक ज्योत होती.

आज सायलीनं दान दिलेल्या त्या ज्योतीच्या घरात शेकडो वृद्ध माणसे राहात असत. त्या वृद्ध माणसांना तिनं ते घर हक्काचं घर म्हणून दिलं होतं. कधीकधी तिला जेव्हा जेव्हा सवड मिळत असे. तेव्हा तेव्हा ती देशात येत असे आणि ती त्या घराला आवर्जून भेट देत असे. त्यातच ती जेव्हा त्या वृद्ध व्यक्तींना पाहात असे. तेव्हा तिचंही मन उचंबळून यायचं. ती ओक्साबोक्सी रडायची. तेव्हा त्याच वृद्धाश्रमातील एखादी म्हातारी तिच्या खांद्यावर हात ठेवायची आणि रडू नको बाळ म्हणायची. तेव्हा आपलं रडणं थांबवून वर पाहताच तिला त्यात आपली आई दिसायची.

ज्योती गेल्यानंतर गुरु आणि आरतीही जास्त दिवस जगले नाहीत. तेही काळाच्या ओघात निघून गेलेत आपला संसार संपवून. परंतु ते जेव्हा जिवंत होते. तेव्हा त्यांची मुलगी त्यांना भेटायला यायची. परंतु तिनं ते गेल्यानंतरही आपली जागा ना कोणाला दान दिली होती सायलीसारखी, ना कोणाला राहू दिलं होतं. ती जागा तिनं स्वतः आपल्याच ताब्यात ठेवली होती. आईवडीलांची सेवा न करता. मात्र त्या मकानाला तिनं नवीन नाव दिलं होतं आरतीप्रभूंचा आधार. त्या मकानात आता ती वाचनालय चालवीत होती व त्या वाचनालयातून आतापर्यंत शेकडो मुलं ऑफिसर होवून बाहेर पडले होते.

ते वृद्धाश्रम म्हणजे आधारच होतं ज्योती, गुरु आणि आरतीसाठी. वृद्धाश्रमापुर्वी ज्योतीला तिच्या पतीनं आधारच दिला होता. परंतु ते गेल्यानंतर ती घाबरली नाही. दुःख येणारच होते असं म्हणत तिनं वृद्धाश्रमाला आपला आधार बनवले होते आणि दिशा आखल्या होत्या जगण्याच्या. गुरुही त्याची मुलगी आपली आपल्या उतारवयात सेवा करीत नाही म्हणून चलबिचल झाला नाही वा डगमगला नाही. त्यानंही सायलीसारखीच आपली मुलगी असहाय्य समजून स्वतःच्या दिशा आखल्यात व त्यावर तो चालत राहिला. शेवटी अंतिम समयी डोळेही मिटलेत. परंतु ज्योतीसारखीच त्यानंही आपल्या मुलीबद्दल कुरकूर केली नाही. कारण तो गुण ज्योतीनंच त्याला दिला होता.

आज गुरु जिवंत नव्हता ना आरती अन् ना ज्योती. परंतु त्यांच्या आठवणी आजही जिवंत होत्या. त्या आठवणी केवळ सायलीच्याच आणि गुरुच्या मुलीच्याच नाही तर जगाच्या प्रेरणा झाल्या होत्या. आता जग त्यांच्या विचारावर किंबहूना चालत होतं नव्हे तर कोणत्याही स्वरुपाच्या संकटाच्या वेळेस दिशा ठरविण्यासाठी

त्यांनी प्रसवलेल्या तत्वज्ञानाचा उपयोग केल्या जात असे नव्हे तर वापरच. ते तत्वज्ञान आज जणू जगाची गरजच झालं होतं नव्हे तर आयुष्याचा आधारच. असंच तत्वज्ञान ज्योती आणि गुरुनं साक्षात मांडलं होतं, आपल्या मुलांसाठी नाही तर जगासाठीच. जे तत्वज्ञान जगाला प्रेरणाच देत होतं आणि तेवढाच प्रकाशही तद्वतच आधारही...

***********समाप्त***********



# *अंकुश रा. शिंगाडे

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

## *प्रकाशित छापील साहित्य:

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्त्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***


१)आक्रमण


***प्रवासवर्णन***


१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती


*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*


**अंकुश शिंगाडे यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.**






अंकुश शिंगाडे
चांद्रयान
कादंबरी


अंकुश शिंगाडे
शापित नदी
सरस्वती



अंकुश शिंगाडे
प्रवास
तिरुपती बालाजीचा



अंकुश शिंगाडे
सुजाता


अंकुश शिंगाडे
संस्कार



अंकुश शिंगाडे
मृत्यूदंड
मृत्यूदंड



अंकुश शिंगाडे
NOT FOR SALE
वारांगना


अंकुश शिंगाडे
कोहीनूर


अंकुश शिंगाडे
संजय




अंकुश शिंगाडे


यांची ई साहित्यवर


उपलब्ध ईपुस्तके


ज्या कव्हरवर एक

क्लिक कराल ते पुस्तक

उघडेल.

















http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bappa_rawa
df

































अंकुश शिंगाडे
भुताटकी



रा जा दा हि र
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
घटस्फोट



अंकुश शिंगाडे
महाराणी संयोगीता आणि
पृथ्वीराज


अंकुश शिंगाडे
मा र्ग अर्जूनचा


अंकुश शिंगाडे
लेखक


अंकुश शिंगाडे
लिखीत
गोविंद गोपाळ गायकवाड
कादंबरी


अ स्ति त्व
अंकुश शिंगाडे


अंकुश शिंगाडे
कामगार

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष.
# श्री अंकुश शिंगाडे यांचे ईसाहित्यवर हे एकोणचाळीसावे पुस्तक.

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (५१

पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (६), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (३९), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (४), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (३), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (२), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य

प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।